अकोला । बुधवार
दि. १४ मे २०२५
वर्ष : १९ अंक : ७३
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

आज छत्रपती संभाजी महाराज जयंती



www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



## तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 37.9 | 27.5 |
| अमरावती | 35.0 | 24.3 |
| भंडारा | 39.0 | 27.0 |
| बुलढाणा | 32.0 | 23.0 |
| ब्रम्हपूरी | 42.1 | 27.0 |
| चंद्रपूर | 41.2 | 27.2 |
| गडचिरोली | 38.6 | 25.4 |
| गोंदिया | 39.4 | 26.0 |
| नागपूर | 39.8 | 26.1 |
| वर्धा | 40.0 | 28.5 |
| वाशिम | 35.6 | 00.0 |
| यवतमाळ | 38.0 | 25.0 |

## दहावीतही कोकण विभागच अव्वल; एकूण निकाल ९४.१० टक्के

# पुन्हा सावित्रीच्या लेकींचीच बाजी!



**पुणे, दि. १३** वृत्तसंस्था

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. राज्याचा दहावीचा एकूण निकाल ९४.१० टक्के इतका लागला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत१.७१ टक्क्यांनी घटला आहे. यंदा एकूण १५ लाख ६० हजार १५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

दहावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी १४ लाख ६८ हजार ५८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात कोकण विभागाने सर्वाधिक तर नागपूर विभागाने सर्वात कमी निकालाची टक्केवारी नोंदवली आहे. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात यंदा दहावीची परीक्षा दिलेल्यांपैकी ९४.१० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात १.७१ टक्के घट झाली. विभागनिहाय निकालांमध्ये पुन्हा एकदा कोकण विभागाने बाजी मारली. कोकण विभागातून ९८.८२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जिल्हानिहाय निकालात सिंधुदुर्ग जिल्ह्याने कमाल केली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ९९. ३२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदा दहावीच्या परीक्षेत राज्यातील २११ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून एकूण १४ लाख ५५ हजार ४३३ उत्तीर्ण झाले आहेत. यंदा मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ टक्के आहे तर मुलांची टक्केवारी ९२.३१ आहे. या वर्षी १५ लाख ४६ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले. माध्यमिक शालांत परीक्षा एकून ६२ विषयांसाठी घेण्यात आली होती त्यापैकी २४ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. राज्यात ४ लाख ९७ हजार २७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सोप्या भाषेत सांगायचे तर ६० टक्क्यांपेक्षा जास्त आणि ७५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवून ४ लाख ९७ हजार २७७ जण उतीर्ण झाले आहेत. राज्यात ३ लाख ६० हजार ६३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत म्हणजे ४५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त पण ६० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवून उत्तीर्ण झाले. एकूण ८६ हजार ६४१ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा देण्याची संधी आहे. यंदा फेरपरीक्षेचा अर्ज १५ मे २०२५ पासून भरण्यास सुरुवात होईल आणि परीक्षा २४ जूनपासून सुरु होईल.

### विभाग निहाय निकाल

- कोकण : ९८.८२ टक्के
- कोल्हापूर : ९६.८७ टक्के
- मुंबई : ९५.८४ टक्के
- पुणे : ९४.८१ टक्के
- नाशिक : ९३.04 टक्के
- अमरावती : ९२.९५ टक्के
- छत्रपती संभाजीनगर : ९२.८२ टक्के
- लातूर : ९२.७७ टक्के
- नागपूर : ९०.७८ टक्के

## थोडक्यात

### शोपियानमध्ये तीन दहशतवादी ठार



**जम्मू :** दक्षिण काश्मीरमधील शोपियानमध्ये सुरू असलेल्या चकमकीत किमान तीन दहशतवादी ठार झाले आहेत. मंगळवारी सकाळी या भागात गोळीबाराचे आवाज ऐकू आले होते. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने या भागात दहशतवादी असल्याची पुष्टी केली होती, कारवाईदरम्यान सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. भारतीय लष्कराने सोशल मीडियावर पोस्ट करत या कारवाईबद्दल माहिती दिली आहे. या मोहिमेला 'ऑपरेशन केल्लर' असे नाव देण्यात आले आहे. भारतीय लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, १३ मे २०२५ रोजी, राष्ट्रीय रायफल्स युनिटला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, शोपियानमधील शोएकल केल्लर परिसरात दहशतवादी असल्याची माहिती मिळाली होती. यानंतर भारतीय सैन्याने या भागात शोध मोहीम सुरू केली. या मोहिमेदरम्यान दहशतवाद्यांनी जोरदार गोळीबार केला. या भीषण चकमकीत तीन कट्टर दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. ऑपरेशन सुरू आहे.

### ताडोबात दोन वाघांच्या झुंजीत एकाचा मृत्यू

**चंद्रपूर :** ताडोबात अधिवास आणि वाघिणीवरील हक्काच्या लढाईतून दोन वाघांमध्ये झालेल्या झुंजीत एका वाघाचा मृत्यू तर दुसरा जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना ताडोबाच्या व्याघ्रप्रकल्पाच्या खडसंगी वनपरिक्षेत्रात घटना सोमवारी बुध्द पौर्णिमेच्या रात्री साडेसात ते आठच्या सुमारास घडली. जखमी झालेला वाघ हा छोटा मटका असल्याचे सांगितले जात आहे.ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील रामदेगी क्षेत्रात छोटा मटका, नयनताराचे आर्कषण आहे. नयनतारा ही वाघीण तिच्या निळ्या डोळ्यांमुळे पर्यटकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. त्यामुळे तिला पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते. काही वर्षांपासून या क्षेत्रात छोट्या मटका नावाच्या वाघाचे वास्तव्य आहे. त्यामुळे तो अन्य वाघांना या क्षेत्रात येऊ देत नाही. आलेच तर त्यांची तढाई ठरलेली आहे. यापूर्वीही येथे येणाऱ्या नवीन वाघांसोबत त्याची लढाई झाली आहे. काल सोमवारी बुध्द पौर्णिमेचा दिवस असल्याने कोअर व बफर झोन वन्यप्राणी गणनेची वनविभागाची जय्यत तयारी सुरू होती. यामध्ये ब्रम्हा या वाघाचा मृत्यू झाला आणि छोटा मटका हा वाघ गंभीर जखमी झाला. छोटा मटका हा वाघ बाहेर आला तेव्हा त्याचे तोंड पूर्णपणे रक्ताने माखलेले होते. त्याचा पायाला गंभीर जखमा आढळून आल्या. सफारी आटोपून येणाऱ्या काही पर्यटकांना ही झुंज आढळून आल्याने त्यांनी स्थानिक वन कर्मचाऱ्यांना माहिती दिली.

# काश्मीरच्या मुद्यावर कुणाचीही मध्यस्थी चालणार नाही

## भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने ठणकावले

**नवी दिल्ली, दि. १३** वृत्तसंस्था

**भारत-पाकिस्तान तणाव निवळल्यानंतर आज पुन्हा एकदा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काश्मीरच्या मुद्द्यावर तिसऱ्या व्यक्तीच्या हस्तक्षेपाची गरज नाही, असं म्हटलं. काश्मीरच्या प्रश्नावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. पाकिस्तानने भारताच्या जागेवर ताबा केला आहे. पाकिस्तानने भारताची जागा खाली करावी, अशी आमची मागणी आहे. याबाबत गेल्या अनेक काळापासून दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरु आहे. याबाबतच्या चर्चेत तिसऱ्या देशाची आवश्यकता नाही, असं म्हणत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेला ठणकावलं आहे.**



आमचा अनेक वर्षांपासून हेच राष्ट्रीय लक्ष्य राहिलेलं आहे की, भारतीय केंद्र शासित प्रदेश जम्मू-काश्मीरशी संबंधित कोणत्याही मुद्द्याला भारत आणि पाकिस्तानला द्विपक्षीय पद्धतीने चर्चा करुन सोडवायचा आहे. या स्थितीत कोणताही बदल झालेला नाही. तुम्हाला माहिती आहे की, हा मुद्दा पाकिस्तानकडून भारताच्या भूभागांवर अवैधपणे कब्जा केल्याचा आहे. पाकिस्तानने भारताची कब्जा केलेली जागा खाली करावी. पाकिस्तानने पीओके खाली करावं. या मुद्द्यांवर कुणाच्याही मध्यस्थीची आवश्यकता नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं.

भारताने २२ एप्रिलला पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं. भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले केले. त्यांचे प्रशिक्षण केंद्र उद्ध्वस्त केले. पाकिस्तान आधीपासूनच दहशतवाद्यांना खतपाणी घालत आलेला आहे. भारतात २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला. त्यानंतर भारताने ६ मे ला दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण केंद्रांना उद्ध्वस्त केलं. आता पाकिस्तानच्या सैन्याने पुन्हा गोळीबार किंवा हल्ला केला तर भारताकडून त्याला चोख प्रत्युत्तर देईल. पण पाकिस्तान शांत राहिला तर भारताकडूनही काहीच प्रतिक्रिया दिली जाणार नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केलं.

### टीआरएफला घातक दहशतवादी संघटनांच्या यादीत टाका!

भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांच्या डीजीएमओंची चर्चा झाली, असंही परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेने घेतली होती. त्यामुळे टीआरएफला घातक दहशतवादी संघटनांच्या यादीत टाकावं, अशी आमची मागणी आहे, अशीदेखील भूमिका रणधीर जयस्वाल यांनी मांडली.

# आम्ही घरात घुसून मारु!



### मोदी यांचा आदमपूर एअरबेसवरुन इशारा

**आदमपूर, दि. १३** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आदमपूर एअरबेसवर जावून भारतीय जवानांची भेट घेतली.नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय जवानांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी तीनही सैन्य दलांचं कौतुक केलं. विशेष म्हणजे नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला आम्ही घरात घुसून मारु, असा इशारा दिला. पाकिस्तानकडून आदमपूर एअरबेसवर हल्ला करुन एअरबेस उद्ध्वस्त केल्याचा दावा केला जात होता. पण याच एअरबेसवर जावून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी जवानांचं कौतुक केलं. तुमच्या पराक्रमामुळे आज ऑपरेशन सिंदूरची गुँज प्रत्येक कानाकोपऱ्यात ऐकू जात आहे. या प्रत्येक ऑपरेशन दरम्यान प्रत्येक भारतीय आपल्यासोबत उभा राहिला. प्रत्येक भारतीयाची प्रार्थना आपल्या सगळ्यांसोबत राहिली आहे. आज प्रत्येक देशवासी आपल्या सैनिक आणि त्यांच्या परिवारांप्रती कृतज्ञ आहे. त्यांचा ऋणी आहे, अशी भावना मोदींनी व्यक्त केली. भारत माता की जय या जयघोषाची ताकद आाताच दुनियाने पाहिली आहे. भारत माता की जय ही फक्त उद्घोषणा नाही. **(पान २ वर)**

# कृत्रिम वाळू धोरणास मंजुरी, फिरते पथक योजना!

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

**मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय :** रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर. (महिला व बालविकास विभाग); नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना 'होम स्वीट होम' अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार. (महसूल विभाग ); कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम-सँड तयार करणाऱ्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार. (महसूल विभाग); राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार. (वित्त विभाग); राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग); राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय (महसूल विभाग).

# वाशिम : दगडफेक प्रकरणात सहा जणांना अटक

## आरोपी वाढण्याची शक्यता : पोलीस अधीक्षकांची माहिती

**वाशीम, दि. १३** वृत्तसंस्था

शहरात सोमवारी दोन गटामध्ये झालेल्या दगडफेक प्रकरणातील २० ते २५ आरोपींची ओळख पटली असून यामधील सहा आरोपींना पोलीसांनी अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. सदर प्रकरणात पोलिसांनी तपासाला गती दिली असून यामध्ये आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक अनुज तारे यांनी आज १३ मे रोजी पत्रकार परिषदेत दिली.



यासंदर्भात अधिक माहिती देतांना पोलिस अधीक्षक अनुज तारे म्हणाले की, शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या पाटणी चौकात सोमवार १२ मे रोजी सांयकाळी दोन व्यक्तीमध्ये किरकोळ वादावरून हाणामारी झाली . या वादाची शहरभर अफवा पसरल्याने जुन्या शहरात दोन गटामध्ये दगडफेक झाली . यामध्ये तीन जण जखमी झाले आहेत. सदर वादाची माहिती पोलीसांना मिळताच पोलीसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही गटांना पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, सिसिटीव्ही फुटेज आणि काही व्हिडीओच्या आधारे या प्रकरणातील २० ते २५ आरोपींची ओळख पटली आहे. यातील सहा आरोपींना पोलिसांनी अटक करून त्यांच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. तसेच पोलिसांनी तपासाला गती दिली असून यामध्ये आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत परिस्थिती नियंत्रणात असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या पाटणी चौकातील रस्त्यावरील फेरीवाले व वाहतुक व्यवस्था बघता जिल्हाधिकारी मॅडम, आरटिओ आणि नगर पालिकेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन या प्रश्नावर चर्चा झाली. यामध्ये वरील सर्व प्रश्वावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्या संदर्भात एकमत झाले आहे. असेही एका प्रश्नाच्या उत्तरात पोलिस अधीक्षक अनुज तारे यांनी सांगितले.

### अफवांवर विश्वास ठेवू नका - अनुज तारे

वाशीम शहरात सोमवारी झालेल्या दोन गटातील वादाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कुठलीही अफवा पसरवू नये. सोबतच अफवावर विश्वास ठेवू नये. यासंदर्भात आपल्याला काही माहिती मिळाली तर, कृपया पोलिस विभागाशी संपर्क साधून खातरजमा करून घ्यावी. कुठल्याही अफवावर विश्वास ठेवू नये. असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक अनुज तारे यांनी केले आहे.

# निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन!

## यंदा पावसाळा लवकर येणार; हवामान विभागाची माहिती

**नवी दिल्ली, दि. १३** वृत्तसंस्था

**मे महिन्याच्या उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. यावर्षी मान्सून हा एक आठवडा लवकरच महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान विभागानेच याबाबत गुड न्यूज दिली आहे. विशेष म्हणजे दक्षिण बंगालच्या उपसागरातील काही भागामध्ये मान्सून आजच दाखल झाल्याची माहिती आहे. तसेच मान्सून अंदमान निकोबार बेटावरही दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे.**



निकोबार बेटांवर गेल्या दोन दिवसांत मध्यम ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडल्याची माहिती आहे. त्याचबरोबर पुढच्या तीन ते चार दिवसांत मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात आणि अंदमान समुद्रात वाटचाल करणार असल्याचीदेखील महत्त्वाची माहिती समोर आली आहे. नियोजित वेळेच्या किमान एक आठवडाआधी मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात, अंदमान आणि निकोबारच्या बेटावर दाखल झाला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून येत्या काही दिवसात दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, कुबोरिय परिसर, अंदमान आणि निकोबरसह मध्य बंगलाच्या उपसागरात अधिक प्रमाणात विस्तारणार आहे. त्यामुळे तसाच तो हळूहळू केरळ आणि नंतर महाराष्ट्राच्या दिशेला देखील वाटचाल करण्याची शक्यता आहे.

पुणे हवामान विभागाचे तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनीदेखील मान्सूनबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून त्याच्या नेहमीच्या वेळेपेक्षा लवकर येण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे, असं के. एस. होसाळीकर म्हणाले आहेत.

# ट्रम्प यांच्याशी 'ती' चर्चा झालीच नाही!

## भारताने अमेरिकेचा दावा फेटाळला

**नवी दिल्ली, दि. १३** वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्या संघर्षात यशस्वी मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. दोन अण्वस्त्र संपन्न राष्ट्रांमधील युद्ध टाळल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून करण्यात आला होता. दोन्ही देशांना व्यापार रोखण्याचा इशारा दिल्यानंतर त्यांनी शस्त्रसंधीची तयारी दर्शवली. व्यापार रोखण्याची धमकी दोन्ही देशांमधील संघर्ष रोखण्यात महत्त्वाची ठरली, असं ट्रम्प म्हणाले होते. मात्र त्यांचा दावा भारतानं स्पष्टपणे खोडून काढला आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला.



पाकिस्तानविरुद्ध सैनिकी कारवाई सुरु असताना अमेरिकेसोबत झालेल्या कोणत्याही चर्चेत व्यापाऱ्याचा मुद्दा नव्हता, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केलं. पाकिस्तानसोबतचे संबंध ताणले गेलेले असताना , सैनिकी कारवाई सुरु असताना भारत आणि पाकिस्तानचं नेतृत्व संपर्कात होतं. पण त्यांच्यामध्ये व्यापाराबद्दल कोणतीही चर्चा झालेली नाही, असं जयस्वाल यांनी स्पष्ट केलं. ७ मे रोजी ऑपरेशन सिंदू झाल्यानंतर १० मे रोजी सैनिकी कारवाई थांबेपर्यंत, त्यासाठी सहमती होईपर्यंत, भारत आणि अमेरिकेच्या नेत्यांमध्ये लष्करी परिस्थितीवर बातचीत झाली. त्यांच्यात सातत्यानं संवाद सुरु होता. पण यातील कोणत्याच चर्चेत व्यापाऱ्याचा विषय चर्चिला गेला नाही, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संभाव्य अणूयुद्ध रोखल्याचं श्रेय ट्रम्प यांनी घेतलं. तशी माहिती त्यांनी ट्विट करुन दिली. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं स्पष्टीकरण दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाआधी एक भाषण केलं. त्यात त्यांनी भारत-पाकिस्तानबद्दल महत्त्वाचा दावा केला. दोन्ही देश शस्त्रसंधीसाठी तयार झाल्यास अमेरिका त्यांना व्यापारात मदत करेल आणि दोन्ही देशांनी शस्त्रसंधीची तयारी न दर्शवल्यास अमेरिका त्यांच्याशी कोणताही व्यापार करणार नाही, अशी भूमिका मी भारत-पाकिस्तानच्या नेतृत्त्वाशी संवाद साधताना घेतली.

# पान 1 वरुन...

## आम्ही घरात घुसून मारु!

ही देशाच्या प्रत्येक सैनिकाची शपथ आहे, जी भारतमातेच्या मर्यादेसाठी जीवाची बाजी मारतो. हा देशाच्या प्रत्येक त्या नागरिकाचा आवाज आहे जो देशासाठी जगतोय, देशासाठी काहीतरी करु पाहतोय. भारत माता की जय ही घोषणा मैदानातही गुँजते आणि मिशनमध्येही गुँजते. भारताचे सैनिक जेव्हा भारतमातेचा जय म्हणतात तेव्हा शत्रूची छाती फाटते. आपल्या मिसाईल जेव्हा सनसन निशाण्यावर पोहोचते तेव्हा शत्रूला भारत माता की जयचा आवाज ऐकू येतो. आमच्या फौजा जेव्हा अणूबॉम्बच्या धमकीची हवा काढतात तेव्हा आकाशापासून पाताळपर्यंत एकज आवाज गुँजतो तो म्हणजे भारत माता की जय, असं नरेंद्र मोदी म्हणाले. तुम्ही सर्वांनी प्रत्येक भारतीयाची छाती अभिमानाने उंचावली आहे. तुम्ही प्रत्येक भारतीयाचा माथा गर्वाने उंचावला आहे. तुम्ही इतिहास रचला आहे. मी आज सकाळीच आपल्याकडे आपलं दर्शन घेण्यासाठी आलो आहे. जेव्हा शूरवीरांचे पाय धरतीवर पडते तेव्हा धरती धन्य होते. जेव्हा शूरवीरांचे दर्शन करण्याचं भाग्य मिळतं तेव्हा जीवन धन्य होतं. त्यासाठी मी आज सकाळीच आपल्या दर्शनासाठी इथे पोहोचलो आहे. आजपासून अनेक दशकांनंतरही भारताच्या या पराक्रमाची चर्चा होईल तेव्हा त्याचा सर्वात प्रमुख अध्याय तुम्ही आणि तुमचे सहकारी असतील. आपण सर्व वर्तमानासोबतच देशाच्या येणाऱ्या पिढ्यांसाठी एक नवी प्रेरणा बनले आहात. मी शूरवीरांच्या या धर्तीवरुन आज हवाईदल, नौदल आणि बीएसफ आणि भारतीय सैन्याच्या सर्व शूरवीरांना सॅल्यूट करतो, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. ऑपरेशन सिंदूर ही सामान्य सैन्य अभियान नाही. ही भारताची नीती, नियत आणि निर्णायक क्षमतेची त्रिवेणी आहे. भारत बौद्धांचीदेखील धरती आहे. तसेच गुरु गोबिंद सिंह यांचीदेखील धरती आहे. धर्मासाठी शस्त्र उठवणं ही आमची परंपरा आहे. जेव्हा आमच्या बहीणी, मुलींच्या कपाळावरील कुंकू हिरावलं गेलं तेव्हा आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात शिरुन मारलं.

## प्रभात किड्सचा गौरव: युवराज महल्ले याचे दहावीत घवघवीत यश, इस्रो भेटीत विदर्भाचे प्रतिनिधित्व

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १३:** प्रभात किड्स, अकोला शाळेचा विद्यार्थी युवराज विठ्ठल महल्ले याने २०२५ च्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९०.४०% गुण मिळवून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. युवराजच्या या उत्तुंग यशाचे शाळा, शिक्षक, पालक आणि संपूर्ण अकोला जिल्ह्यातून सर्वत्र कौतुक होत आहे.

शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी युवराज महल्ले याने मिळवलेले ९०.४०% गुण हे केवळ गुणांपुरते मर्यादित नाहीत, तर हे त्याच्या सातत्य, चिकाटी आणि ज्ञानप्रेमाचे प्रतीक आहेत. अभ्यासात सातत्यानं केलेल्या प्रयत्नांना मिळालेलं हे यश त्याच्या उज्वल भवितव्यासाठी एक भक्कम पायरी ठरत आहे.

इस्रो भेटीत विदर्भाचे प्रतिनिधित्व शैक्षणिक क्षेत्रासोबतच युवराजने विज्ञान प्रदर्शनातही आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली. विदर्भ स्तरावरील विज्ञान स्पर्धेत प्रभात किड्सचे युवराज महल्ले आणि देवाशिष परांडेकर यांनी सादर केलेल्या मॉडेल्सना प्रथम क्रमांक प्राप्त झाला. विदर्भातील एकूण ३५ स्पर्धकांपैकी त्यांच्या कल्पकतेला विशेष दाद मिळाली. या यशामुळे युवराज आणि देवाशिष यांची भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) भेटीसाठी निवड झाली असून, हे दोघंही विदर्भातून इस्रोला भेट देणारे प्रतिनिधी ठरले आहेत. त्यांच्या या अनोख्या यशामुळे प्रभात किड्सच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन व संस्थेचा अभिमान युवराजच्या या दोन्ही क्षेत्रांतील यशामागे प्रभात किड्सचे विज्ञान विभागप्रमुख मिता इंगळे, तसेच शिक्षक आनंद पदमन, मुनम फातेमा, प्रतिक वाघ, अर्चना राठी, अनिरुद्ध डेकाटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, आणि संपूर्ण शिक्षकवृंद यांनी युवराज व इतर विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. समारोप युवराज महल्ले याचे हे यश फक्त गुणांमध्ये नव्हे तर कल्पकतेत, संशोधनवृत्तीत आणि देशसेवा प्रेरणेतही दिसून येते. अशाच प्रेरणादायी वाटचालीसाठी त्याला भावी आयुष्यासाठी अनंत शुभेच्छा!

## प्राजक्ता विद्यालयाची निकालाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी







**अकोला, दि. १३ :** नुकत्याच लागलेल्या एसएससी परीक्षेमध्ये प्राजक्ता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवीन खेताननगर कौलखेड अकोला चा निकाल ९०% लागला असून शाळेने उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. एकूण ८४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८ विद्यार्थ्यांनी ८५% टक्के च्यावर गुण प्राप्त केले. १५ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत तर २५ विद्यार्थी प्रथम श्रेणी उत्तीर्ण झाले. आनंदी लवकुमार कांगणे ही ९२.८०% टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम आली. विद्यालयातून द्वितीय पायल प्रेमसिंग चौहान-८९.२०%, तृतीय तृषाली राजेश राहुडकर-८८.८०%, चौथी पूर्वा अनिल देशमुख-८८.४०%, तर अथर्व लक्ष्मण कचवे हा ८७.८०% गुण घेऊन पाचवा आला आहे. प्राचार्य सागर देशमुख व मुख्याध्यापिका प्रांजली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.स्वप्नगंधा जगताप, प्रा.संजय गोळे, प्रा.विठ्ठल पवार, सौ.मीनाक्षी देशमुख, यश देशमुख तसेच पवित्र पोर्टल मधून नवनियुक्त झालेल्या सौ.अंजली शेटे मॅडम व कु.अपेक्षा तिडके मॅडम यांच्या व विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नाने शाळेला हे यश संपादित करता आले. संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रकाशराव देशमुख व संस्थेच्या सचिव सौ.नलिनीताई देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले आहे. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्रीराम विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :**कौलखेड स्थित श्रीराम विद्यालयाने दरवर्षी प्रमाणे यंदाही आपल्या उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी श्रीराम विद्यालयाच्या इयत्ता १० वी चा निकाल ७५% लागला आहे. श्रीराम विद्यालय या शाळेतील कु. सायली दिनेशराव कावरे हिने विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला तसेच कु. प्रतीक्षा अरूनराव प्रधान हिने द्वितीय क्रमांक व वैभव मोहनराव मदनकार याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. श्रीराम विद्यालयातील शिक्षक श्रीमती मंजूषा भांबूरकर, प्रेमा खंडाते, नलिनी मेहरे, वर्षा निलगम, अंकिता पवार, भाग्यश्री निरगुडे, राज्वी गवई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय शाळेतील सर्व शिक्षक, पदाधिकारी व पालकांना दिले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना बहुमोलाचे मार्गदर्शन गजानन चौधरी यांनी केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष शिवा मोहोड यांनी मुलांचा सत्कार करून कौतुक केले.

## स्कूल ऑफ स्कॉलर्सचा उत्कृष्ट निकाल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी





**अकोला, दि. १३ :** १३ मे २०२५ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून स्कूल ऑफ स्कॉलर्स ने यंदाही उज्वल कामगिरी करत आपली यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. शाळेचा प्रथम क्रमांक सुरज राहुल इंगळे याने ९१.८% गुण मिळवत शाळेचे नाव उज्वल केले. त्याचबरोबर चैताली खैरनार, दुसऱ्या क्रमांक ८९.८% तिसऱ्या क्रमांकावर स्मित अरसड याला ८८.% चौथ्या क्रमांकावर किती सिन्हा ८७.४% तसेच पाचव्या क्रमांकावर चैतन्य खैरनार याला ८५.८% गुण मिळाले. वाणिज्य शाखेमध्ये अव्वल स्थानावर असणारे विद्यार्थी - प्रथम क्रमांक हमझा वाघ ८०.२% दुसऱ्या क्रमांक युग अग्रवाल ८०% शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा उंबरकर, प्रशासकीय अधिकारी एड. सुमित बोकाडे, उपमुख्याध्यापिका कोमल लहरिया यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षकवर्ग आणि पालकांचे विशेष आभार मानले. त्यांनी सांगितले की, ही यशस्वी कामगिरी विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास आहे.'' विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापिका व पालकांना दिले आहे.

## सनराईज ज्ञानपीठचा १० वीचा सलग ८ व्या वर्षी १०० टक्के निकाल !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चतारी, दि. १३ :** पातुर तालुक्यातील सस्ती येथील सनराईज ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज सस्ती चा सलग ८ व्या वर्षी १०० टक्के निकाल लागलेला आहे. १० वी च्या विद्यार्थ्यांनी सुद्धा १२ वी प्रमाणे सलग ८ वर्षांपासूनची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

सत्र २०२४-२५ च्या माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. या विद्यालयाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केली आहे.

यामध्ये प्रथम क्रमांक तरुण ताले ९७.२०, द्वितीय क्रमांक स्नेहल ताले ९६.८०, तृतीय क्रमांक मानसी म्हैसने ९६, चतुर्थ क्रमांक अंशराज गाडेकर व रामप्रसाद खुरद ९४.६०, पाचवा क्रमांक स्नेहल घाटोळ ९४.४०, अनुराधा काळे ९४.२०, कल्याणी शेळके ९३.८०, मनस्वीनी अवचार ९३.४०, रोहन ताले ९३.२० अशी विद्यार्थ्यांनी टक्केवारी मिळवलेली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, संस्था अध्यक्ष, प्राचार्य व शिक्षक यांना दिलेले आहे. सर्व विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये उत्तीर्ण झाल्यामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष श्रीकांत ताले, शेख इरफान, उमाकांत ताले,, प्राचार्य इंगळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

## भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३:** महाराष्ट्र उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल दिनांक ५ मे,२०२५ रोजी घोषित झाला. यामध्ये जुने शहरातील भिकमचंद खंडेलवाल उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखीत या वर्षी सुद्धा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली. विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ८० टक्के लागला..विज्ञान शाखेमधून शाळेतून प्रथम कुमारी चैताली अरबट ६३.५० टक्के, द्वितीय क्रमांक श्रेयस सरकटे ६१.८३ टक्के, तृतीय क्रमांक वेदांती देशमुख प्राप्त केला. तर कला शाखेमधून रोहित तायडे, स्वराज थोटे यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा डॉ. तारा ताई हातवळणे,सचिव श्री गोपालजी खंडेलवाल, उपाध्यक्ष श्री नानासाहेब कुलकर्णी, प्राचार्य श्री अभय वानखडे सर उपमुख्याध्यापक रवींद्र राठोड सर, पर्यवेक्षक श्री रमेश धुळे सर प्राध्यापक डॉक्टर मंगल सोनोने डॉ. वर्तिका श्रीवास्तव , प्रगती बारबदे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी व कर्मचारी वृंद यांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## संच मान्यता रद्द करण्यासाठी विमाशी संघाच्यावतीने आज धरणे, निदर्शने आंदोलन

### शिक्षक बंधू-भगिनींनी सहभागी व्हावे - जयदीप सोनखासकर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १३:**शिक्षण क्षेत्रावर गदा आणणारा दिनांक १५ मार्च २०२४ संच मान्यतेचा अन्याय कारक शासन निर्णय रद्द करावा यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने संपूर्ण विदर्भात आज धरणे व निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. याबाबतचे निवेदन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना विमाशी संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले, प्रांतध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या मार्फत शासनाला पाठवले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस तथा माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात हे आंदोलन होत आहे.

नागपूर व अमरावती विभागातील शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्या कार्यालयासमोर आज दिनांक १४ मे २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ या कालावधीमध्ये हे धरणे/ निदर्शने आंदोलन संपन्न होवून निवेदन सादर करण्यात येत आहे. ह्या नवीन संच मान्यतेमुळे अनेक शाळांवरील शिक्षकांची पदे शून्य झाली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शाळा, शिक्षक व शिक्षण वाचवण्यासाठी समस्त शिक्षक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर यांनी केले आहे.

अमरावती विभागात सदर आंदोलनामध्ये आपापल्या जिल्हा शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर निवेदन देण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर, उपाध्यक्ष विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, अकोला जिल्हाअध्यक्ष जी.आय. शहा, कार्यवाह नितीन गायकवाड, महानगराध्यक्ष अजय काळे, कार्यवाह वसंत माळी, अमरावती जिल्हाध्यक्ष दशरथ रसे, आशिष इंगळे, महानगराध्यक्ष अतुल देशमुख, कार्यवाह अरविंद चौधरी, वाशिम जिल्हाध्यक्ष रामेश्वर वाळले, कुलदीप बदर, यवतमाळ जिल्हाध्यक्ष पवन बन, रामकृष्ण जीवतोडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष विष्णू अवचार, सतीश शेळके आदींनी केले आहे.

## न्यू इंग्लिश हायस्कूल अकोलाची यशाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२५ मध्ये न्यू इंग्लिश हायस्कूल अकोलाने दर वर्षी प्रमाणे या वर्षीही यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. परीक्षेला एकूण १३६ विद्यार्थी बसले होते त्यातून ११७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कु. प्राची रविंद्र मुंढे ही ९६.८० % गुण घेऊन शाळेतून प्रथम आली. द्वितीय क्रमांक यशोदीप संदीप खरे याने ९३.४० % घेऊन पटकवला.

शाळेतून तृतीय क्रमांकाची मानकरी कु. लतिका राजेश मेश्राम हिने ९०.६० % गुण घेऊन पटकविला. नियमित अभ्यास, भरपूर सराव तसेच शाळेतील ग्रंथालयचा वापर* ही त्रिसूत्री यशाचे गमक ठरल्याचे शाळेचे मुख्याध्यापक श्री. माधव मुनशी यांनी सांगितले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे *या वर्षी शाळेच्या एकूण ३९ विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबात शालेय क्रीडांगणावर नियमित सराव करून क्रीडा क्षेत्रात विभागीय व राज्यस्तरावर चमकदार कामगिरी करत क्रीडा शिक्षक तथा उपमुख्याध्यापक श्री. उदय हातवळणे, श्री संजय पांडे, श्री श्रीकांत खंडारे यांच्या मार्गदर्शनात क्रीडा गुण सवलतीचे अतिरिक्त गुण मिळविले.

## अकोट शहरातील स्वामी विवेकानंद इंग्रजी शाळेचा निकाल १००टक्के

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १३ :** तालुक्यातील एसएससी बोर्डाच्या परीक्षेच्या निकालात सालाबाद प्रमाणे स्वामी विवेकानंद इंग्लिश हायस्कूल अकोट ने १००% निकालाची परंपरा सतत चौदाव्या वर्षी सुद्धा कायम ठेवली असून दर्जेदार शिक्षणाचे माहेरघर असल्याचे सिद्ध केले आहे. श्री गजानन महाराज व नर्सिंग महाराजांची तपोभूमी असलेल्या या हायस्कूल मधून दरवर्षी गुणवंत विद्यार्थी उज्वल यशस्वी होऊन उच्च शिक्षणासाठी शिक्षण जगतात झेपावत आहेत .शैक्षणिक सत्र २०२४ २५ मध्ये या शाळेतून ७७ विद्यार्थ्यांनी एसएससी परीक्षा दिली होती त्यात शंभर टक्के सर्वस्व विद्यार्थी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात श्रेया गायकवाड ९६.२०% ,मोहित नराजे ९५.२०% रसिका अवंडकर ९४.२०%, ऋतुजा मोहोड ९४% घेऊन यशस्वी झाले तर एकूण ७७ विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थी ९०% च्या वर , ते २३ विद्यार्थी ८०% च्या वर व दहा विद्यार्थी प्राविण्य प्राप्त २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झाले आहेत. अकोट शहरात ३५ वर्षापासून शिक्षण क्षेत्रात यशस्वी यशोशिखराकडे वाटचाल करणाऱ्या या शाळेतून हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन जगाच्या विविध देशात, विविध क्षेत्रात ,शाळेचा ,शहराचा ,आपला आई-वडिलांचा लौकिक वाढवत आहेत गुणवंत विद्यार्थ्यांना अध्यक्ष अशोक मंगलानी ,उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुरकुटे ,सचिव प्रा.मोबीन शेख कोषाध्यक्ष मुरलीधर रामनाणी यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले आहे याप्रसंगी मुख्याध्यापक सचिन धांडे व शिक्षक रुंद पालक वर्ग उपस्थित होते सर्वच गुणवंताचे कौतुक केले जात आहे.

## लढवय्या भाविक चौधरीचे दहावीत घवघवीत यश

**तेल्हारा:** तेल्हारा शहरातील वृत्तपत्र प्रतिनिधी धर्मेश चौधरी यांचा मुलगा भाविक याने सर्व समस्यांवर मात करून जिद्द चिकाटी व आत्मविश्वासाच्या बलावर दहावीच्या परीक्षेमध्ये समाधानकारक व प्रेरणादायी ७०.२० टक्के गुण घेऊन यश संपादन केले. एकांड्रॉप्लासिया या आजाराने त्रस्त भाविकच्या मणक्यामध्ये नस हाडाच्या अपुऱ्या वाढीमुळे दबल्या होत्या हळूहळू त्याच्या पायातील ताकद कमी होत होती त्याला चालणे सुध्दा जड होत होते अश्या स्थितीत डॉक्टरांनी भाविकच्या वडिलांना त्याच्यावर लवकर शस्त्रक्रिया करणे गरजेचे सांगितले. दहावीचे वर्ष, अभ्यासाची चिंता अशातच मुंबई येथील सर एच एन रिलायन्स हॉस्पिटल येथे त्याला त्याच्या वडिलांनी उपचारासाठी नेले असता त्याच्या पाठीमध्ये आणि मानेच्या मणक्यामध्ये नस दबत असल्याचे एमआरआय मध्ये दिसून आले तसेच मेंदूतून निघणारा सीएसएफ कॉड चे होल हे अगदी लहान असल्याचे दिसले त्यामुळे त्याचेवर प्रथम शस्त्रक्रिया करण्यात आली. मॅगनम फोरामन व मानेमागील मणक्याची ची ही शस्त्रक्रिया अतिशय अवघड होती ही शस्त्रक्रिया दहा तास चालली त्यानंतर लगेच दीड महिन्याने त्याचेवर पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली.

**Change of Name**

I have changed my name from-Mohd Aminaullah Mohd Niamatullah to Mohd Aminaullah Mohd Niyamatullah
Address :- R/o Mana, Tq. Murtizapur, Dist. Akola, now residing at Sarode plot, Old city, Murtizapur, Tq. Murtizapur Dist. Akola,

**Change of Name**

I have changed my name from - Sabeena Parveen Mohd Roshan shah to Sabeena Parveen Roshan shah & From :- Sabeeha Parveen Farzana bee to Sabeeha Parveen Farzana bano
Address :- R/o Borgaon Manju Tq. & Dist. Akola,

**Change of Name**

I, Kalabai Digambar Umale,Mother of NO-JC-573626H Nb/Sub. Umale Satyapal Digambar,Resi. Villege Borwakadi,Post Paras, Tehsil Balapur Dist Akola ( Maharashtra )pin 444109 have Change my name from Kalabai to Kalabai Digambar Umale and my Date of Birth from 28.08.1960 to 01.01.1969. vide Affidavit before Notary ( Govt. of India )at Akola. ( No. 3164/13.05. 25)

**Change of Name**

I, Digambar Vishwanath Umale,father of No-JC-573626H Nb/Sub.Umale Satyapal Digambar Resi. Villege Borwakadi,Post Paras, Tehsil Balapur Dist. Akola (Maharashtra) pin 444109. have Change my name from Digambar to Digambar Vishwanath Umale and my Date of Birth from 07.11.1956 to 01.01.1951. Vide Affidavit before Notary ( Govt. of India) at Akola ( No. 1365/ 13.05.25 )

## प्रभातची श्रावणी महल्ले व जान्हवी देशमुख दहावीत (सीबीएसई) अव्वल

### गणित, मराठी व इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या विषयात १०० पैकी १००

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १३ :**सीबीएसई बोर्डादहावीचा निकाल मंगळवार दि. १३ मे रोजी जाहीर झाला असून प्रभातच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम ठेवून घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये श्रावणी महल्ले व जान्हवी देशमुख यांनी ९७.८० टक्के गुण मिळवून अव्वल ठरल्या आहेत तर ११५ विद्यार्थ्यांनी ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून यश प्राप्त केले आहे. १६ विद्यार्थ्यांनी विविध विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून त्या विषयात सीबीएसई बोर्डातून मेरीट ठरले आहेत. सामाजिक शास्त्र विषयात ९० आणि ९० पेक्षा जास्त गुण ७० विद्यार्थ्यांनी मिळविले आहेत. गणित या विषयातुन २ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले तर ३ विद्यार्थ्यांनी ९९ गुण आणि ३३ विद्यार्थ्यांनी ९० व त्यापेक्षा जास्त गुण मिळविले. मराठी विषयामध्ये ५ विद्यार्थी हे पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. तर ७ विद्यार्थी ९९ गुण आणि ३३ विद्यार्थी ९० च्या वर गुणांनी पास झाले. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या विषयामध्ये ९ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. तसेच ९ विद्यार्थी हे ९९ गुणांनी आणि १३५ विद्यार्थी ९० आणि त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले. विज्ञान विषयामध्ये सुद्धा ३३ विद्यार्थी हे ९० आणि त्यापेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी गुणवंतांचे प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक मो. आसिफ यांनी अभिनंदन केले.

## थोडक्यात

### पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ.सुब्बन्ना अय्यप्पन यांचा संशयास्पद मृत्यू



**नवी दिल्ली :** पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. सुब्बन्ना अय्यप्पन यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. डॉ. सुब्बन्ना अय्यप्पन यांचा मृतदेह कर्नाटकमधील श्रीरंगपट्टण येथील कावेरी नदीवर आढळून आल्याच्या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर कर्नाटक पोलिसांनी सुब्बन्ना अय्यपन यांच्या संशयास्पद मृत्यूचा तपास सुरु केला आहे.डॉ.सुब्बन्ना अय्यपन हे कृषी आणि मत्स्यव्यवसाय शास्त्रज्ञ होते. तसेच ते भारतीय कृषी संशोधन परिषदेचे अध्यक्ष देखील राहिलेले आहेत. दरम्यान, ते म्हैसूरमध्ये राहत होते. मात्र, काही दिवसांपूर्वी डॉ.सुब्बन्ना अय्यपन हे बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर त्यांचा शोध घेतला जात होता. पण ते कोठेही आढळून आले नव्हते. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, श्रीरंगपट्टणा जवळील कावेरी नदीत त्यांचा मृतदेह आढळून आला होता अशी माहिती शनिवारी समोर आली होती. तसेच त्यांची दुचाकीही नदीकाठी आढळून आल्याचं बोललं जात आहे. त्यांच्या मृत्यूचं गूढ वाढलं असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

### गुंतवणूकदारांना चार कोटींना गंडा

**मुंबई :** सर्वसामान्य गुंतवणूकदारांची ४ कोटींची फसवणूक करून फरार झालेल्या गोरेगाव येथील सराफाला दिंडोशी पोलिसांनी सात महिन्यांनंतर नाट्यमयरित्या अटक केली. पोलिसांना चकवा देण्यासाठी तो ओळख बदलून राजस्थान येथे रहात होता. गुंतवणूकदारांच्या फसवणुकीतून मिळालेल्या रकमेतून त्याने राजस्थानमध्ये एक ढाबा सुरू केला होता. पोलिसांनी ग्राहक बनून ढाब्यातच सापळा रचला आणि त्याच्या मुसक्या आवळल्या. त्याच्या अन्य दोन साथीदारांनाही पोलिसांनी अटक केली. कुशल दलपतसिंग राठोड उर्फ कमलेश चौहान (३०) असे या सराफाचे नाव आहे. त्याने गोरेगाव पूर्व परिसरातील संतोष नगर मार्केटमध्ये श्री ज्वेलर्स नावाने दुकान उघडले होते. दागिने आणि रोख रक्कमेच्या गुंतवणूकीवर आकर्षक परतावा देण्याच्या नावाखाली त्याने विविध योजना जाहीर केल्या होत्या. १२ महिन्यांसाठी गुंतवणूक केल्यास ४ महिन्यांचा बोनस, गुंतवणूक केलेल्या रकमेएवढे सोन्याचे दागिने अशा या योजना होत्या. तसेच रोख रक्कम गुंतविल्यास चांदिच्या दागिन्यांवर ५० टक्के सवलत केडीए, हॉल मार्क सोन्याचे दागिने विनामूल्य बनवून दिले जातील, अशी विविध प्रलोभने त्याने दाखवली होती.त्याच्या या योजनांना भुलून ९० गुंतवणूकदारांनी २०२३ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत गुंतवूणूक केली होती. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी विशेष दिवाळी बोनस, लॉटरी सोडत काढली जाईल अशा भूलथापाही त्याने मारल्या होत्या.

### डोंबिवलीत कन्व्हेअन्स डीडच्या नावाखाली सोसायटी पदाधिकाऱ्यांची २४ लाखांची फसवणूक

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेतील टंडन रस्ता भागातील एका सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना तुमचा सरकारी जमिनीवरील सात बारा उतारा तुमच्या सोसायटीच्या नावे करून देतो. या बदल्यात शासन शुल्क वगळून इतर खर्चासाठी सोसायटीतील एकूण १५ सदस्यांच्या माध्यमातून एका मध्यस्थाने (एजंट) सोसायटी पदाधिकाऱ्यांकडून मागील तीन वर्षात २८ लाख ९३ हजार रूपये वसूल केले. त्यानंतर सोसायटी चालकांना बनावट सात बारा उतारा आणि महसूल विभागाची काही कागदपत्रे सादर करून सोसायटी पदाधिकाऱ्यांची एकूण २४ लाख ९३ हजार रूपयांची फसवणूक केली आहे.मध्यस्थाने घेतलेल्या एकूण २८ लाख ९३ हजार रूपयांच्या रकमेपैकी मध्यस्थाने सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या तगाद्यानंतर चार लाख रुपये सोसायटीला परत केले. उर्वरित रक्कम अनेक वेळा मागणी करूनही मध्यस्थाने परत न केल्याने मध्यस्थाने आपली फसवणूक केली म्हणून सोसायटी पदाधिकाऱ्याच्या तक्रारीवरून रामनगर पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला. डोंबिवली पूर्वेतील टंडन रस्त्यावरील ओम चिदानंद सोसायटीच्या अध्यक्षा आरती सडेकर यांनी कन्व्हेअन्स डीडचे काम करून देणारा मध्यस्थ वैभव वामन गावाले (रा. कल्याण) यांच्या विरुध्द तक्रार केली आहे. वैभव गावाले यांनी यापूर्वी डोंबिवलीतील ओम समर्थ कृपा सोसायटी पदाधिकाऱ्यांची अशाच प्रकारे फसवणूक केली होती.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा युद्धबंदीच्या कारणाचा दावा खोटा?

## भारताच्या डीजीएमओ यांनी सांगितली 'अंदर की बात'

**नवी दिल्ली, दि.१३** वृत्तसंस्था

नवी दिल्ली: पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम फत्ते करत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केली. भारताच्या या कारवाईने पाकिस्तानचा जळफळाट झाला होता. यानंतर पाकिस्तानने भारताच्या पश्चिम भागातील राज्यांमध्ये हवाई हल्ले करण्यास सुरूवात केली, मात्र भारताने पाकिस्तानचा एकही डाव यशस्वी होऊ दिला नाही. दरम्यान १० मे रोजी पाकिस्तान आणि भारताच्या डीजीएमोने चर्चा करुन युद्धबंदीची घोषणा केली.
परंतु दोन्ही देशांकडून युद्धबंदीची घोषणा होण्यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर अमेरिकेच्या मध्यस्थीने भारत-पाकमध्ये युद्धबंदी झाल्याची घोषणा केली होती. तसेच ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानने युद्ध थांबवले नाही तर अमेरिका त्यांच्यासोबत व्यापार करणार नाही, असेही म्हटले होते. परंतु भारताने डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. भारताने म्हटले की, केवळ दोन्ही देशांच्या डीजीएमोमध्ये युद्धविरामावर चर्चा झाली, यामध्ये तिसरा कोणताही पक्ष सामील नव्हता. ट्रम्प यांचे विधान निराशाजनकच नव्हे तर जागतिक स्तरावर भारताची भूमिका कमजोर करणारी आहे.भारतीय



अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ऑपरेशन सिंदूर नंतर अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस यांनी पतंप्रधान नरेंद्र मोदींशी ९ मे ला चर्चा केली होती. तसेच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी ८ मे आणि १० मे रोजी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि एनएसए अजित डोभाल यांच्याशी चर्चा केली होती. परंतु या चर्चेदरम्यान भारताने किंवा अमेरिकेने व्यापारावर कोणतीही चर्चा केली नाही. ट्रम्प यांनी दावा केला होता की, भारत आणि पाकिस्तानने युद्ध थांबवले नाही, तर अमेरिका त्यांच्याशी कोणताही व्यापार करणार नाही. जर संघर्ष थांबला तर आम्ही तुमच्यासोबत व्यापर करुन. आमच्यासारखा व्यापर व्यावसाय कधीही अन्य कोणी केला नसेल. ट्रम्प यांनी म्हटले की, दोन अण्वस्त्रधारी देशामधील वाढता तणाव कमी करण्यात अमेरिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. व्हाईट हाऊमध्ये पत्रकारांशी बोसतान ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राजनैतिक प्रयत्नांमुळे दोन्ही देशातील तणाव निव्वळला असल्याचे त्यांनी म्हटले होते.तसेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानच्या काश्मीर मुद्द्यामध्येही ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी म्हटले होते की, मी दोन्ही देशांमध्ये काश्मीर मुद्द्यावरही तोडगा काढण्यासाठी मदत करणार आहे.

## एअर इंडियासह इंडिगोने सीमावर्ती शहरातील उड्डाणे केली स्थगित

**नवी दिल्ली दि.१३** वृत्तसंस्था

सध्या भारत आणि पाकिस्तान सीमेवर शांतता आहे. मात्र, तरी देखील दोन्ही देशातील तणावाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेतली जात आहे. याच पार्श्वभूमीवर एअर इंडिया आणि इंडिगोने आज (१३ मे) रोजी अनेक शहरांमधील उड्डाणे स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही देशातील तणाव आणि हवाई निर्बंध व सुरक्षेच्या कारणास्तव खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.इंडिगोने श्रीनगर, जम्मू, अमृतसर, लेह, चंदीगड आणि राजकोटला जाणाऱ्या आणि येणाऱ्या विमानांची सर्व उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, एका निवेदनात एअरलाइनने म्हटलं की, ''काही शहरातील विमानांची उड्डाणे स्थगित केल्यामुळे तुमच्या प्रवासाला कसा व्यत्यय येऊ शकतो याची आम्हाला कल्पना आहे. झालेल्या गैरसोयीबद्दल आम्हाला खेद आहे. एअर इंडियाने जम्मू, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोट येथे जाणाऱ्या आणि येणाऱ्या विमानांची सर्व उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पाकिस्तानला शस्त्र पुरवठा केल्याचा दावा चीनने फेटाळला

**नवी दिल्ली दि.१३** वृत्तसंस्था

पाकिस्तानला मालवाहतूक करणाऱ्या विमानातून लष्करी मदत पाठवल्याचा दावा चीनने फेटाळला आहे. अशी अफवा पसरवणाऱ्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही चीनने दिला आहे. चीनकडून पाकिस्तानला मदत म्हणून मोठ्या प्रमाणावर लष्करी साहित्य घेऊन शियान वाय-२० हे मालवाहू विमान पाठवल्याचे वृत्त इंटरनेटवर प्रसिद्ध झाले होते. त्यावर पीपल्स लिबरेशन आर्मी एअर फोर्सने हे स्पष्टिकरण दिले आहे. इंटरनेटवर प्रसिद्ध झालेल्या वृत्तात करण्यात आलेला दावा खोटा आहे, असे चीनच्या संरक्षण मंत्रालयाने आपल्या वेबसाईटवरच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचे काही फोटो आणि वाक्यांचे स्क्रीनशॉट देखील पीएलएएफने आपल्या वेबसाईटवर शेअर केले आहेत. या वृत्तामध्ये असलेले उल्लेख असत्य असल्याचे म्हणून त्यावर अफवा असा शिक्का देखील मारण्यात आला आहे. ज्यांनी कोणी सैन्यदलाशी संबंधित ही अफवा पसरवली आहे, त्यांना कायदेशीर मार्गाने जबाबदार धरण्यात येईल, असेही या अहवालात म्हटले गेले आहे. चीनचे पाकिस्तानशी जवळचे संबंध असूनही पाकिस्तानला लष्करी मदत न पाठवल्याचे स्पष्टिकरण चीनकडून देण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये सर्व लष्करी कारवाया थांबवण्याचा निर्णय सामंजस्याने घेतला गेल्याच्या दोनदिवसांनंतर हे स्पष्टिकरण देण्यात आले. चीनकडून पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर शस्त्र पुरवठा केला जात असला तरी गेल्या काही दिवसात भारत- पाकिस्तान दरम्यानच्यलष्करी संघर्षाच्या बातम्यांना चिनी माध्यमांकडून जरा जास्त प्रसिद्धी दिली गेली.
विशेषतः पाकिस्तानच्या आत खोलवर असलेल्या नऊ दहशतवादी ठिकाणांवर भारतीय हवाई दलाने केलेले हल्ले आणि त्यानंतर रडार सिस्टीम आणि हवाई तळांवर केलेले हल्ल्यांनंतर भारताची विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानकडून केला गेला होता. हे वृत्त चिनी माध्यमांनी ठळकपणे प्रसिद्ध केले होते. पण भारतीय दूतावासाने पाकिस्तानच्या दाव्यातील तथ्य पडताळून पाहण्याची सूचना चीनच्या ग्लोबल टाईम्स या सरकारी नियतकालिकाला केली. भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी घडवून आणण्यासाठी मध्यस्थी करण्याची तयारीही चीनने दाखवली होती.
चीनकडून पाकिस्तानला सर्वात जास्त शस्त्र पुरवठा केला जातो. २०२० ते २०२४ या कालावधीत चीनच्या शस्त्र उत्पादनांपैकी ८१ टक्के शस्त्र खरेदी एकट्या पाकिस्तानकडूनच केली गेली होती. त्यामध्ये अत्याधुनिक लढाऊ विमाने, रडार, नौदलाची जहाजे, पाणबुड्या आणि क्षेपणास्त्रांचाही समावेश आहे. दोन्ही देशांनी मिळून जा-१७ विमानांची निर्मिती केली. ही विमाने पाकिस्तानच्या हवाई दलातील प्रमुख विमाने आहेत, असे स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्युटने म्हटले आहे.

## भारताच्या हल्ल्यानंतर दहशतवादी हाफिज सईद पाकिस्तानातून गायब; ठार की फरार?

**इस्लामाबाद, दि.१३** वृत्तसंस्था

भारताने पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणांना उद्ध्वस्त करुन टाकले. यामध्ये शेकडो दहशतवादी ठार झाले असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान पाकिस्तानी दहशतवादी हाफिज सईद बद्दल अद्याप कोणताही सुगावा लागेलाला नाही. यामुळे सईद हल्ल्यात ठार झाला की फरारा असा प्रश्न उपस्थित होतो. दरम्यान पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांनी याबाबत मोठा विधान केले आहे. माध्यमांना दिलेल्या एका मुलाखतीत पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांनी म्हटले आहे की, पाकिस्तानमध्ये मी आत्मविश्वासाने सांगू शकतो की सध्या पाकिस्तानंमध्ये एकही दहशतवादी नाही. दरम्यान त्यांच्या या विधाननंतर दहशतवादी हाफिज सईद बद्दल अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.



हाफिज सईद पाकिस्तानमधून नक्की पळाला कुठे? की भारताच्या हवाई हल्ल्यात ठार झाला आहे? असे प्रश्न निर्माण झाले आहे.यापूर्वी बीबीसीला दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान आसिफ ख्वाजा यांनी म्हटले की, १९८० च्या दहशतकात पाकिस्तानने अमेरिका आणि ब्रिटनसाठी दहशतवाद्यांना प्रोत्यासहन दिले होते. मात्र सध्या पाकिस्तानच्या भूमीवर एकही दहशतवादी नाही. ख्वाजा यांच्या म्हणण्यानुसार, युरोप आणि अमेरिका त्यांच्या सोयीनुसार, दहशतवाद्यांची व्याख्या करतात. अफगाणिस्तानचे गृहमंत्री पूर्वी दहशतवादी होते, पण नंतर त्यांना मौलवी बनवण्यात आले.पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांच्या विधानानंतर दहशतवादी हाफिज सईदबद्दल तीन प्रश्न उपस्थित झाले आहे. पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यामागे हाफिजची दहशवादी संघनाच लष्कर-ए-तैयबाचा हात होता. यामुळे काही प्रश्न तज्ज्ञांकडून उपस्थित करण्यात आले आहे.पहिला प्रश्न म्हणजे ७ मे रोजी भारताने हाफिज सईदच्या मुरीदकेवर हल्ला केला होता. यानंतर येथे अनेक दहशतवादी मारले गेल्याचे वृत्त समोर आले. परंतु हाफिज बद्दल कोणतीही पुष्टी झाली नाही. दरम्यान पाकिस्तान सरकराने देखील याबद्द कोणती माहिती उघड केलेली नाही, की हल्ल्यात मारले गेलेले लोक नेमकं कोण होते?दुसरा प्रश्न असा की, काही दिवसांपूर्वीच हाफिज सईच्या मुलाने त्याचे वडिल सुरक्षित असल्याचे म्हटवले होते. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, पाकिस्तानच्या भूमीवरुन हाफिज कुठे गायब झाला.

## भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना निवृत्त

**नवी दिल्ली, दि.१३** वृत्तसंस्था



भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आज निवृत्त झाले असून सकाळीच त्यांनी सर्वोच्च न्यायालयातील त्यांच्या सहकाऱ्यांना निरोप दिला. तसंच, न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्याकडे त्यांच्या पदाची सूत्रे सोपवली. निवृत्तीच्या दिवशी खंडपीठाला संबोधित करताना संजीव खन्ना निशब्द झाले होते. परंतु, यावेळी त्यांनी त्यांचे उत्तराधिकारी बी. आर. गवई यांचं कौतुक केलं. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.
संवीज खन्ना म्हणाले की, जनतेचा विश्वास सहज मिळत नाही, तो मिळवावा लागतो. सर्वोच्च न्यायालयामुळे मला तो मिळवता आल. मी नि:शब्द आहे. माझ्या मनात खूप आठवणी आहेत. एकदा तुम्ही वकील झालात की, तुम्ही आयुष्यभर वकीलच राहता. न्यायव्यवस्था ही एक सामान्य संज्ञा आहे, जी खंडपीठ आणि बारचे प्रतिनिधित्व करते. बार हा विवेकाचा रक्षक आहे.'' खन्ना पुढे म्हणाले, न्यायाधीश वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून सर्वोच्च न्यायालयात येतात आणि या विविधतेमुळे न्यायालयीन निर्णय घेण्यास मदत होते.

## जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक

**शोपियान, दि.१३** वृत्तसंस्था

'ऑपरेशन सिंदूर' नंतर आणि पाकिस्तान आणि भारतातील शस्त्रविरामाच्या घोषणेनंतर पहिल्यांदाच जम्मू आणि काश्मीरच्या शोपियान जिल्ह्यात मंगळवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये मोठी चकमक झाल्याची माहिती समोर आली आहे. दक्षिण काश्मीरच्या शुक्रू केलर परिसरात दहशतवादी असल्याची गुप्त माहिती सुरक्षा दलाच्या जवानांना मिळाली होती. त्यानंतर जवानांनी शोध मोहीम राबवली असता दहशतवाद्यांनी गोळीबार केला.दहशतवाद्यांनी गोळीबार केला असता सुरक्षा दलाकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात आलं. दहशतवादी आणि सैन्यामध्ये चकमक सुरु असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. सध्या



सुरक्षा दलांनी शुक्रू केलर परिसरात घेराव बंदी करत दहशतवांच्या विरोधात शोध मोहिम हाती घेतली असल्याची माहिती समोर येत आहे.शोपियान जिल्ह्यातील एका परिसरात लपून बसलेल्या दहशतवाद्यांना सुरक्षा दलाच्या जवानांनी दहशतवाद्यांना घेरलं असून शोध मोहीम राबवली जात आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर सुरक्षा दलाकडून पहिल्यांदाच मोठी कारवाई करण्यात येत आहे. शुक्रू केलर परिसरात घेराव दोन ते तीन दहशतवादी लपून बसल्याची माहिती सांगितली जात आहे.

## चीन-अमेरिकेमध्ये व्यापारविषयक ऐतिहासिक करार

### वाढीव आयात शुल्काला ९० दिवसांची स्थगिती

**जिनिव्हा , दि.१३** वृत्तसंस्था

अमेरिका आणि चीन दरम्यान व्यापार विषयक कराराची निश्चिती झाली असून आता दोन्ही देशांनी एकमेकांवर लावलेल्या वाढीव आयात शुल्काला ९० दिवसांची स्थगिती देण्यात येणार आहे. तसेच व्यापार विषयक तंटे मिटवण्यासाठी अधिक व्यापक चर्चा देखील केली जाणार आहे.
चीनच्या उत्पादनांवर अमेरिकेकडून लावण्यात आलेले १४५ टक्के आयात शुल्क ११५ टक्क्यांनी कमी करून अवघे ३० टक्के करण्यात येणार आहे. तर चीननेही अमेरिकेतल्या उत्पादनांवर लावलेले आयात शुल्क देखील तेवढ्याच प्रमाणात कमी करून १० टक्के केले जाणार आहे.कर कपातीच्या या निर्णयाला अमेरिकेने मान्यता दिली असल्याचे अमेरिकेचे व्यापारी प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी म्हटले



आहे. दोन्ही देशांनी मिळून आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतल्याचे जेमिसन ग्रीर आणि अमेरिकेचे अर्थ मंत्री स्कॉट बेसेंट यांनी जिनिव्हामध्ये पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केले.दोन्ही बाजूंकडून चर्चा सुरू ठेवण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. वाढीव आयात शुल्कामुळे प्रत्येकाच्या उत्पादनांची मोठी कोंडी झाली होती. या निर्बंधांमुळे कोणाचीही फायदा होणार नव्हता.हे कोणालाही नको होते, यावर दोन दिवसांच्या वाटाघाटींनंतर एकमत झाले. आम्हाला समतोल व्यापार हवा आहे. दोन्ही बाजू हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहेत, असे बेसेंट यांनी सांगितले.दोन्ही बाजूंनी ९० टक्के आयात शुल्क रद्द करण्यास मान्यता दिली आहे. तर आगामी ९० दिवसांसाठी अतिरिक्त २४ टक्के आयात शुल्कालाही स्थगिती दिली जाणार आहे.त्यामुळे एकूण ११५ टक्क्यांनी आयात शुल्क कमी होणार असल्याचे चीनच्या व्यापार मंत्रालयाने सांगितले. अमेरिकेकडून एकतर्फीपणे आयात शुल्क वाढवले जाणार नाही आणि चीनच्या अन्य अर्थकारणांच्या विकासासाठी चीनबरोबर मिळून काम केले जाईल, अशी आशाही चीनने व्यक्त केली आहे.

## रणथंभोरमधील वाघांना लागली जिवंत मांसाच्या आहाराची सवय

**नवी दिल्ली, दि.१३** वृत्तसंस्था

रणथंभोर व्याघ्र प्रकल्पात वाघिणीच्या हल्ल्यात वन अधिकारी देवेंद्र चौधरी यांचा मृत्यू झाला आहे. वाघिणीने देवेंद्र चौधरी यांना जबड्यात धरून जंगलात नेले होते. मात्र, त्यानंतर देवेंद्रचा मृतदेह सापडला आहे.
राजस्थानच्या प्रसिद्ध रणथंबोर व्याघ्र प्रकल्पात सफारी दरम्यान, एका अनुभवी इतिहासकाराने काहीतरी वेगळाच प्रकार पाहिला. यामध्ये, पदम तालब, राजबाग आणि मलिक तालब तलावांच्या आसपासच्या पर्यटन क्षेत्रांकडे जाणाऱ्या जोगी महाल गेटपासून काही मीटर अंतरावर असलेल्या झुडपांजवळ वाघ बसलेले दिसले.
यानंतर इतिहासकाराच्या लक्षात आले की, या वाघांचे भिंतीच्या मागे असलेल्या दोन लहान खोल्यांपैकी एका खोलीवर लक्ष होते. जवळून पाहिल्यावर त्यांना बंद दाराच्या पलीकडे म्हशीचा मंद आवाज



ऐकू आला. त्यांना समजले की, वन कर्मचारी त्या खोलीचा वापर जिवंत म्हशी ठेवण्यासाठी करत होते. ते ॲरोहेड नावाच्या वाघिणीसाठी या म्हशीचा वापर आमिष म्हणून करायचे. हा प्रकार सुरू असताना वाघांच्या इतक्या जवळ जाण्याची किंमत त्यांना चुकवावी लागू शकते, असा इशारा एका तज्ज्ञाने ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना दिला होता.
, वन अधिकारी देवेंद्र सिंग चौधरी यांच्या म्हशी ठेवलेल्या खोल्यांपासून अवघ्या काही मीटर अंतरावर वाघिणीने हल्ला केला. ज्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत रणथंबोरमध्ये हा दुसरा मृत्यू आहे.यापैकी ९ वाघांना जिवंत मांसाच्या आहाराची सवय आहे. यापैकी ६ वाघांना थेट जन्मापासूनच जिवंत मांसाचा आहार घेण्याची सवय आहे. सुमारे दोन वर्षांपासून या वाघांना म्हशींच्या वासरांना सतत जिवंत चारा देत आहे. आठवड्यातून एकदा तरी. वाघांच्या असामान्य वर्तनाच्या अनेक घटनांकडे दुर्लक्ष केले गेले. गेल्या महिन्यात वाघिणीने एका रक्षकावर हल्ला करून एका सात वर्षांच्या मुलाला ठार मारल्यानंतरही तिला स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाचा विचार करण्यात आला नाही.नरभक्षकांना मुक्तपणे फिरू देणे हे आपले काम नाही
वाल्मिकी थापर गेल्या पाच दशकांपासून रणथंबोरमध्ये वाघांचे निरीक्षण करत आहेत. जर वाघाने माणसाला मारले तर त्याला दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित केले पाहिजे, असे ते म्हणाले. वाघांचे भविष्य सुरक्षित ठेवणे हे आपले काम आहे, पण नरभक्षक आणि नरभक्षकांना मुक्तपणे फिरू देणे हे आपले काम नाही. काही वाघ धोकादायक मारेकरी होतात आणि त्यांना मानवांना मारल्याबद्दल ज्याप्रमाणे तुरुंगवास भोगावा लागतो त्याचप्रमाणे त्यांनाही तुरुंगात टाकायला पाहिजे.

### वाघांना जिवंत मांसाच्या आहाराची सवय

या प्रकरणावर बोलताना तज्ञ म्हणाले की, हा निष्काळजीपणाचा परिणाम आहे. जोगी महाल, रणथंबोर किल्ला आणि गणेश मंदिराभोवती सुमारे पाच चौरस किलोमीटर परिसरात १५ वाघ फिरत आहेत. ही अशी ठिकाणे आहेत जी दररोज पर्यटकांना आकर्षित करतात.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण नकोच!

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात जम्मू-काश्मीरमध्ये पठाणकोट, उरी, पुलवामामध्ये दहशतवादी हल्ले झाले होते. त्यावेळी सरकारने त्यास कठोर, पण मर्यादित प्रतिसाद दिला होता. मात्र पहलगाममधील निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडानंतर भारत सरकारने घणाघाती कारवाई करून पाकिस्तानचे डोके ठिकाणावर आणले आहे. अर्थात तरीही पाकचे शेपूट शेवटी वाकडे ते वाकडेच! त्यामुळे शस्त्रसंधीनंतरही पाकिस्तानने कुरापती काढल्याच. त्यावेळी भारताला त्यास सणसणीत प्रत्युत्तर देणे भाग पडले. आता 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानचे ३५ ते ४० सैनिक मारले गेल्याची माहिती लष्करी संचालनालयाचे महानिदेशक (डीजीएमओ) लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी दिली आहे. यापुढे कोणतीही आगळीक झाली तर त्यास तीव्र प्रत्युत्तर दिले जाईल, असेही पाकिस्तानला सुनावले आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर २४ तासांनी तिन्ही सैन्य दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन चार दिवस चाललेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेची पुराव्यांसह माहिती दिली, हे बरेच झाले. पाकिस्तान मात्र कोणत्याही पुराव्याविना पोकळ दावे करत असतो. त्यामुळे त्याच्या वल्गना कोणी गंभीरपणे घेत नाही. उलट भारताने लष्कर, हवाई दल आणि नौदलाच्या उत्तम समन्वयातून भेदक मोहिमा फत्ते केल्या. पण भारताच्या सार्वभौमत्वाला यापुढे कोणी आव्हान दिले तर निर्णायक कारवाई केली जाईल, असा इशारा भारताने दिला आहे; तर 'वहाँ से गोली चलेगी, तो यहाँ से गोला चलाओ'. आताची परिस्थिती ही पूर्णतः भिन्न असून, यापुढे कोणत्याही हल्ल्याला अधिक ताकदीने उत्तर द्या, असे निर्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्यदलांना दिले आहेत. म्हणजे काश्मीर खोऱ्यात सतत दहशतवादी घुसवून कधीही सामान्य माणसाची वा पोलिसांची अथवा एखाद्या सैनिकाची हत्या करायची आणि पळून जायचे, तर कुठे बॉम्ब टाकून इमारतींना नुकसान पोहोचवायचे आणि सटकायचे, हे यापुढे खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा देणे गरजेचेच होते. दहशतवाद्यांकडून करण्यात आलेला कोणताही हल्ला भारतीय भूमीवरील हल्ला मानला जाईल आणि त्यास युद्धानेच तोंड दिले जाईल, अशी भारताची नवी भूमिका आहे. सीमापार दहशतवादाला उत्तर देण्याची व्याख्या बदलली असून, एकीकडे दहशतवाद पोसायचा आणि दुसरीकडे सोयीच्या क्षेत्रात सहकार्य करायचे, हे पाकचे धोरण यापुढे सहन केले जाणार नसल्याचे भारताने ठणकावले आहे. आता काश्मीरबाबत आमची भूमिका सुस्पष्ट असून, पाकव्याप्त काश्मीर (पीओके) परत मिळवणे, हेच आमचे लक्ष्य आहे. आधी पीओके ताब्यात द्या, मगच पाकशी बोलणी होऊ शकतात, अशी थेट भूमिका पंतप्रधान मोदी यांनी मांडली आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जम्मू-काश्मीरचे महाराजा हरिसिंह यांच्यापुढे दोन पर्याय होते. एक तर भारतात येण्याचा किंवा पाकिस्तानात जाण्याचा. पण हा निर्णय घेण्यासाठी हरिसिंह यांनी बराच वेळ घेतला. काश्मीर भारतात किंवा पाकिस्तानात विलीन न करता, स्वतंत्र देश म्हणून राहावा, अशी त्यांची इच्छा होती. पण त्यावेळी पाकिस्तानातून आलेल्या काही मुस्लिम टोळीवाल्यांनी हरिसिंह यांच्याविरोधात आघाडी उघडली. राज्य धोक्यात आल्याचे लक्षात येताच हरिसिंह यांनी भारत सरकारचा धावा केला. जम्मू-काश्मीर हे भारताचे राज्य म्हणून स्वीकारावे लागेल. संरक्षण, परराष्ट्र धोरण आणि दळणवळणावरील भारत सरकारचे अधिकार स्वीकारावे लागतील, हे भारत सरकारचे म्हणणे हरिसिंह यांनी ते मान्य केले. पण तोपर्यंत पाकिस्तानातून आलेल्या बंडखोरांनी मोठा भाग ताब्यात घेतला होता. काश्मीरचा तो भाग आजही पाकच्या ताब्यात आहे आणि तो म्हणजे पीओके. पीओकेचे एकूण क्षेत्रफळ १३ हजार चौरस किलोमीटर आहे आणि तेथे सुमारे ४० लाख लोक राहतात. पाकव्याप्त काश्मीरमध्येही पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशी दोन पदे आहेत. पीओकेचे सरकार आहे तसेच सर्वोच्च न्यायालयही. पण प्रत्यक्षात पीओके पाकिस्तान सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. स्थानिक सरकारला फारसे स्वातंत्र्य नसल्यामुळे तेथील लोक प्रचंड अस्वस्थ असून, त्यांना भारतात सामील व्हायचे आहे. अलीकडेच तेथे दहशतवाद्यांचा महामेळावा भरला होता आणि तेथून भारतविरोधी वक्तव्ये करण्यात आली. भारताच्या गुप्तचर यंत्रणांचे त्यावर बारीक लक्ष असून, दहशतवादी तळ एकापाठोपाठ एक उद्ध्वस्त केले गेले. पीओकेचा भाग हा पूर्वेला पाकिस्तानचा पंजाब प्रांत, अफगाणिस्तानचा वाखान कॉरिडॉर, चीनच्या शिनजियांग आणि भारताचा काश्मीर यांना लागून आहे. पीओकेचा मोठा भाग म्हणजे हंझा गिलगिट, शक्सगाम व्हॅली आणि रक्सम. बाल्टिस्तानचा भाग पाकिस्तानने १९६३ मध्ये चीनला दिला. या हस्तांतरित क्षेत्राला 'ट्रान्स काराकोरम' म्हटले जाते. पाकिस्तानात कोणत्याही पक्षाचे सरकार असले, तरी 'काश्मीर' हा वादाचा मुद्दा असून, त्याबाबत चर्चा करावी लागेल, अशीच भूमिका घेतली जाते. पण आता या प्रश्नावर कोणतीही चर्चा नाही. पीओकेचा अनधिकृत ताबा पाकिस्तानने सोडावा, हा एकमेव चर्चेचा मुद्दा बाकी असल्याची भूमिका भारताने घेतली आहे. सामंजस्याच्या नावाखाली मिळमिळीत भूमिका घेण्याचे सोडून दिले असून, जम्मू-काश्मीरबद्दल बोलूच नका, उलट तुमच्या ताब्यातील पीओके कधी देता ते सांगा, असा आक्रमक पवित्रा भारताने घेतला असून, तो कौतुकास्पदच आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्या नेतृत्वाबरोबर काश्मीरच्या मुद्द्यावर बोलून मध्यस्थी करण्यास मी तयार आहे, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. मात्र यासंदर्भात अन्य कोणाच्याही मध्यस्थीची गरज नाही, अशी रोखठोक भूमिका भारताने घेतली. अमेरिकेची मध्यस्थी स्वीकारली आहे का, असा प्रश्न काँग्रेसने विचारला होता. पण काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, ही भारताची परंपरागत भूमिका कायम आहे. त्यामुळे कोणीही वृथा काळजी करण्याचे कारण नाही. पाकिस्तानने पीओके भारताच्या स्वाधीन करणे आणि दहशतवाद्यांना आश्रय देणे बंद करणे या गोष्टी घडून आल्यास दोन देशांतील वादच संपू शकेल.

## दहावी निकाल





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

कोकण विभाग पुन्हा
नंबर एकच ठरला
त्यातही मुलींचाच
बोल बाला झाला

लागला दहावीचा
बोर्डाचा हा निकाल
घ्या पुन्हा मुलींचा
नंबर आला अव्वल

सर्व उत्तीर्ण यांचे
मनस्वी अभिनंदन
अपयश जरी आले
पुन्हा करावा प्रयास

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



लढणे म्हणजे
जिंकणे नसते ।
हरणे नसते
लक्षात घ्या ॥

करून देतसे
अस्तित्व जाणीव ।
लढणे उणीव
मिटवून ॥

लढणे असते
हक्कासाठी मित्रा ।
न्यायासाठी मित्रा
सत्यासाठी ॥

लढताना कधी
मागे हटू नये ।
नि मिटवू नये
स्व अस्तित्व ॥

# युद्धासाठी जहाल विचारच कारणीभूत!



संवाद

गीता देव्हारे - रायपुरे
चंद्रपूर



युद्ध नको बुद्ध हवा...म्हणत अख्ख्या विश्वाला शांतीचा संदेश देणाऱ्या तथागतला आपण वंदन करतो. तरीही युद्धाशिवाय तरणोपाय नाही अशी स्थिती निर्माण होतेच. परंतु युद्ध हा कोणत्याही समस्येवरील अंतिम उपाय नसतोच. युद्ध होणार म्हणजे हानी होणे निश्चित..!

विविधतेत एकता...बालपणी पुस्तकात वाचताना फार आनंद व्हायचा. अभिमानही वाटायचा ,की आपला देश एकतेच्या रुळावर घट्ट रुतून बसलेला आहे. परंतु ; विविधतेत एकता हे आनंददायी ब्रीद आता निरर्थक वाटायला लागलेलं आहे. या जगाच्या पाठीवर विविधता आहे; मात्र एकता कुठेच नाही. एकतेच्या नावावर स्वार्थ आणि छुप्या लढाया आहेत. एकतेच्या नावावर ढोंगी बाजार आहे. केसाने गळा कापणारी प्रवृत्ती आहे. विनाकारण जीवितहानी आहे. जशास तसे वर्तन आहे पण माघार घेऊन समायोजनाची वृत्ती नाही. ही विविधता जात, धर्म, पंथ, वंश, आरक्षण , पक्ष आणि गट यामध्ये आहे. एवढेच नव्हे ,तर घराघरात सदस्यांच्या वर्तणुकीत देखील आहे. परंतु एकतेचा सूर गवसत असतानाच त्यात पोकळी निर्माण होऊन स्वर विखुरले जाण्याची अनेक उदाहरणे देखील आपल्या नजरेसमोर येतात.

एका घराने दुसऱ्या घरात वैवाहिक संबंध जोडल्यावर घरातील प्रत्येकाचा प्रत्येकाशी संबंध जुळत जातो. मित्रत्वाचेही संबंध जुळले की घरचेही संबंध जुळतात. व्यक्ती तितक्या प्रवृत्तीचे दर्शन घडत जाते. काही योग्य ,काही अयोग्य वर्तन कळत जाते. कधी कधी नकोसे होते. कधी कधी जिव्हारी होऊन जाते आणि जगणेच नकोस वाटायला लागते. कधी कधी इच्छा नसतानाही आणि गरज नसतानाही भांडणाची स्थिती निर्माण होते. मने दूषित होतात. क्लेश वाढत जातो. एखादा जहाल विचारच युद्धाची परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत असतो. व्यक्ती रक्ताच्या असोत वा बिनरक्ताच्या संबंध नष्ट करण्याच्या निर्णयापर्यंत आपली मजल जाते. यास आपण नाही,तर परिस्थिती , विचार, मतमतांतरे कारणीभूत असतात. आलेले अनुभव कारणीभूत असतात. एखाद्याने सहकार्यवृत्ती ठेवल्यावर त्याचे सहकार्य विसरून त्याने जे केले ते विनाकारण, निरर्थक अशी त्याल जाणीव करून दिल्या जाते व शुल्लक गोष्ट वादावर येऊन ठेपते. कधी कधी प्रचंड टोकाचा वाद होऊन ताटातूट होते. असे लक्षात आल्यावर दोन देशात चाललेल्या युद्धजन्य परिस्थितीवर लक्ष जातं. त्यातही काही वेगळी गत नाहीच. तुम्ही आमचं डोकं फोडा आम्ही तुमचं फोडतो. तुम्ही आमचा देश उध्वस्त करा ...आम्ही तुमचा देश नेस्तनाबूत करतो. अशा नीतीचा जयघोष केला जातो आहे. घरातही आर्थिक कारणेच आहेत ज्यामुळे वाद निर्माण होतो आणि देशादेशांमध्ये सुद्धा आर्थिक बाबींमुळेच युद्ध परिस्थिती निर्माण होते किंवा विरोधी गटांकडून युद्ध परिस्थिती निर्माण केल्या जाते. पूर्वीच्या काळाचा विचार केल्यास असे लक्षात येईल की पूर्वीही संपूर्ण सत्ता हस्तगत करून त्यावर राज्य करणे आणि तेथील रयतेकडून कर गोळा करण्यासाठीच लढाया लढल्या गेलेल्या आहेत. म्हणजेच आर्थिक मुद्दाच युद्धामागे कारणीभूत असतो. आता ज्या दोन देशांत युद्ध चालले आहे त्यांच्यात कदाचित आर्थिक मुद्दा कारणीभूत नसेल परंतु तिसऱ्याच देशाचा युद्धसामग्री विकण्याचा डाव असू शकतो काय? असेही एक विचार पुढे येतो.

मुळात राष्ट्रीय सुरक्षेचे धोरण आखल्याशिवायच युद्धे जिंकण्या - हरण्याचा विचार सुरू होतो. लोकसत्ताच्या बातमीत महत्वाचं वाक्य वाचलं की, उत्तम धोरण तेच, जे युद्धजन्य परिस्थिती निर्माण होणार नाही अशा स्वरूपाचा वचक शेजारी देशांवर राखू शकेल. हीच बाब घरातल्या परिस्थितीलाही लागू पडते. यात एखादी व्यक्ती युद्ध संपुष्टात आणण्यासाठी कुठलेही प्रयत्न करीत असेल तर त्या व्यक्तीस तोवर अनुमोदन मिळत नाही जोवर ती व्यक्ती कुठल्याही नफ्याची तजवीज करणार नाही. जशी बतावणी शस्त्रसंधी करून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली.

व्यापाराच्या दृष्टीने त्यांचं हे वक्तव्य अत्यंत महत्वाचं होतं. यांस विरोधी पक्षांच्या नेत्यांनी विरोध दर्शविला. नकारात्मक बोलल्या गेले. परंतु; युद्धाने निर्माण होणारी अवस्था कधीही दयनीयच असते. अनेक वर्षे युद्धाच्या झळा युद्धात सहभागी होणारे वीर, त्यांचे कुटुंब आणि सामान्य जनता सोसतच असतात. अनेक वर्षे ते युद्धातच जगत असतात आणि ही युद्धामुळे झालेली सर्वात मोठी हानी आहे. हाच आशय माधव सरकुंडे यांच्या कवितेतही आलेला आहे. त्यामुळे हे युद्ध कुठेतरी थांबणे अनिवार्य होते . युद्धानंतर काय परिस्थिती उद्भवेल याची निती आखूनच ट्रम्प यांनी शस्त्रसंधीचा विचार पुढे आणला असावा.

# संभाजी महाराज - धगधगता लाव्हा, स्वराज्याचा छावा!



जगदीश वाघ
अकोला

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज म्हणजे अलौकिक बौद्धिक क्षमता. अचूक निर्णयक्षमता धर्मकारण. अर्थकारण. राजकारण. अशा विविध सर्वच बाबतीत प्रभूत्व असलेले जगातील एकमेव अद्वितीय छत्रपती होय. छत्रपती संभाजी महाराजां सोबत जगातील इतर राजे यांची तुलना तर सोडाच. त्यांच्या समोर जगातील कोणत्याही राजाचे नाव सुद्धा आपण लावू शकत नाही. एवढे संभाजी महाराजांचे कार्य हे गौरवशाली व स्फुर्तिदायी आहे. याचा आम्हांला अभिमान आहे.

संभाजी महाराज म्हणजे राजमाता जिजाऊ मा .साहेब व शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या यांच्या शिकवणीतून तयार झालेले असे निडर .स्वाभिमानी. प्रखर देशाभिमान . संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक. संस्कृत .इंग्रजी. हिंदी. मराठी . ब्रज. अरबी. पोर्तुगीज. अशा जवळपास त्यावेळच्या सर्वच भाषां राजांना अवगत होत्या. छत्रपती संभाजी महाराज म्हणजे एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात लेखणी घेऊन इतिहास घडविणारे आणि इतिहास लिहिणारे छत्रपती होते.

छत्रपती संभाजी महाराज यांनी बुद्धभूषण नखशिखां. नाइकाभेद सातसतक हे ग्रंथ त्यावेळी लिहिले. जे आमच्यासारख्या इतिहास अभ्यासकांना आजही प्रेरणादायी आहेत. याचा आम्हांला खूप खूप अभिमान आहे. काशीचे गागाभट्ट यांनी छत्रपती शिवपुत्र संभाजी महाराजांचे ज्ञान पाहून स्वतः ग्रंथ भेट दिला. त्याकाळी संभाजी महाराजांची बरोबरी करेल. असा एकही योद्धा जगाच्या पाठीवर नव्हता . नवे आजपर्यंत असा महापराक्रमी. महातेजस्वी राजा जन्माला आलाच नाही. राजा म्हणजे फक्त युद्ध युद्ध करणे. हेच फक्त राजाचे काम ही राजाची प्रतिमाच शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांनी बदलून टाकली. राजा म्हणजे एक प्रजापालक आपले राज्य आदर्श कसे असावे. रयतेला स्वाभिमानी बनविणारे. आपल्या आपल्या वडिलांनी दिलेला वारसा व या स्वराज्याच्या रक्षणासाठी जे जे मावळे धारातीर्थी पडले. त्यांच्या कार्याची जाण असणे. या मातीच्या रक्षणासाठी आपण सुद्धा त्यांच्या कार्याचा अभिमान ठेवावा. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे छत्रपती संभाजी महाराज वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृत भाषेत त्यांनी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला.

संभाजी महाराजांना एकाच वेळेस अनेक संकटांचा सामना करावा लागला. परंतु त्यांनी कोणतीही तडजोड कधीच केली नाही. कधी तह केला नाही.कधी माघार घेतली नाही. आपल्या आयुष्यात छत्रपती संभाजी महाराजांनी १२० लढाया केल्या .एकाही लढाईत त्यांनी कधी माघार घेतली नाही. कधी हार पत्करली नाही. एकच वेळेस चहूबाजूंनी संकटे आली असताना सुद्धा त्याला न घाबरता. न डगमगता आपल्या मावळ्यांनिशी त्यांनी या सर्वांवर मात केली. ज्याप्रमाणे अभिमन्यूने चक्रव्यूहात सर्व बाजूंनी एकाचवेळी सर्वांशी लढा दिला .त्याच प्रमाणे संभाजी महाराजांनी एकाचवेळी चहूबाजूंनी संकटे आली परंतु आपल्या प्रखर अभिमान असलेल्या मावळ्यांच्या संगतीने त्यांनी त्यांचा बंदोबस्त केला .व त्यांना जबर तडाखा दिला. त्याकाळी छत्रपती संभाजी महाराजांशी दोन हात करेल असा एकही योध्दा जगाच्या पाठीवर नव्हता. नव्हे समोरुन वार करेल अशी हिंमतही कुणा मध्ये त्याकाळी नव्हती.कारण ''घालुनी जबड्यात हात. मोजती दात ही जात मराठ्यांची महाराष्ट्रात राहतो तो मराठा. महाराज हे खरोखरच छावा होते. आणि छाव्या समोर जाण्याची हिंमत कधीच कुण्या कोल्हे .लांडग्यांची होत नसते. मग त्यांची झुंड का असेना छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर हे स्वराज्य म्हणजे अगदी एका घासात गिळून टाकावे. असे त्या औरंगजेबाला वाटत होते . परंतु या छाव्याने असा काही जोरदार तडाखा दिला की त्या औरंगजेबाला स्वतः नऊ लाख फौज घेऊन महाराष्ट्रावर यावे लागले. नऊ ते दहा वर्ष या छाव्याने औरंगजेबाला असे काही नामोहरण करून टाकले. की औरंगजेब म्हणाला. शिवा का बेटा संभा तो शिवा से भी ज्यादा खतरनाक है.

९ साल का था. तब देखा था हमने उसे वही तेज दिमाख. वही जोश औरंगजेबाने अतिशय उदास होऊन जोपर्यंत संभाला पकडत नाही. तोपर्यंत डोक्यावर टोपी घालणार नाही. अशी प्रतिज्ञा केली. त्याला कळून चुकले कि संभाजी महाराजांच्या सोबत युद्धामध्ये आपण जिंकू शकत नाही .त्यासाठी काहीतरी गंभीर चाल केली पाहिजे . हे त्याला कळून चुकले आणि यात तो यशस्वी झाला. फितुरमुळे संभाजी महाराज हाती लागले. महाराजांनी ११मार्च १६८९ स्वराज्यासाठी बलिदान दिले. खरोखरच महाराज अखेरपर्यंत छाव्यासारखे लढले

''मौत भी डरी थी देखकर उससे.
ये खुद मौत का दावा है .
धरती को नाज था उस पर .
ऐसा शेर शिवा का छावा है.
शेर शिवा का छावा है.''

# 'अहं शून्य' अंत:र्मनाचा आरसा...



समीक्षण

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

प्रवीण हटकर यांचा 'अहं शून्य' हा अभंगसंग्रह म्हणजे मानवी मनाच्या खोल कप्प्यांत वावरणारा, नकळतपणे रुजलेला आणि व्यवहाराच्या प्रत्येक थेंबात मिसळलेला 'अहंकार' या विषयाचा आत्मचिंतनात्मक वेध आहे. एकाच विषयावर तब्बल ३९० अभंग लिहिणं ही केवळ लेखणीची ताकद नसून, ती लेखकाच्या अंत:र्मुखतेची, मनोविश्लेषणात्मक जाणिवेची आणि आत्मशोधाच्या ध्यासाची साक्ष आहे.

प्रवीण हटकर यांच्या अभंगांमध्ये अहंकाराचे विविध पदर उलगडताना दिसतात तो केव्हा रबरासारखा ताणला जातो, केव्हा गर्दीत माणूस एकटा वाटतो, केव्हा तो खजुरासारखा वर गेलेला असतो पण आतून पोकळ असतो. या साऱ्या प्रतिमांमधून 'अहंकार' ही संकल्पना केवळ तात्त्विक वा धार्मिक पातळीवर न राहता, ती रोजच्या आयुष्यात वावरते, कुरवाळते, कुरतडते, असा प्रत्यय येतो. संग्रहाची विशेषता ही की लेखकाने अहंकार या एकाच भावनेच्या कितीतरी छटांचा वेध घेतला आहे. 'आई-वडिलांशी अहंकार असतो का?' हा प्रश्न उपजतो, तेव्हा लेखक आपल्या संस्कारांची उजळणी करून घेतो. दोन तोंडी साप हे रूपक वापरून तो समाजातील मुखवटे पाडतो.

'मी करुणा आहे, अहं शून्य'

ही अखेरची ओळ ती संपूर्ण संग्रहाचा सारांश वाटावा अशी गहिरी आणि गवसलेली ओळ आहे. या अभंगांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भाषा ही मोकळी, पारदर्शक, आणि जनमाणसाला भिडणारी आहे.

'गर्दीत एकटा, एकट्यात गर्दी'

हा विरोधाभास मनाला खोल पोचतो. ही विरोधाभासांची रचना ही केवळ साहित्यिक शृंगार नसून ती अस्तित्वाची जाणीव आहे. तसंच 'अहंकार जेव्हा समूळ नष्टतो, जन्म नवा होतो माणसाचा' या ओळीतून आध्यात्मिक पुनर्जन्माची कल्पना स्पष्ट होते. 'अहम शून्य' हा संग्रह म्हणजे केवळ शब्दांचा नादमय प्रवास नाही; तो आत्मभानाचा प्रवास आहे. लेखकाने स्वतःच्या अनुभवातून, निरीक्षणातून आणि चिंतनातून जन्माला घातलेल्या या अभंगांनी आपल्याला आत पाहायला लावलं तर ते खरे साहित्य ठरेल. अहंकाराचा नाश करूनच खरी माणुसकी जन्म घेते, ही या संग्रहामागील गाभ्याची भावना आहे. तसे पाहता, आजच्या समाजाला जो अभिमान आणि अहंकार या सीमारेषांवर चालतो आहे या संग्रहाची अत्यंत गरज आहे. ही केवळ साहित्यिक मांडणी नाही, ही एक आध्यात्मिक चळवळ आहे, जी 'अभंगाच्या' माध्यमातून अहंकारमुक्त होण्याची दिशा दाखवते. 'माणूस अभंग हो' नंतर 'अहं शून्य' ही त्यांची साहित्यिक वाटचाल ही आशय, शैली आणि चिंतनाच्या दृष्टीने परिपक्वतेकडे नेणारी आहे. हा संग्रह म्हणजे अंतःकरणाशी झगडणाऱ्या प्रत्येकाच्या हातातलं दर्पण आहे.

''अहंकार'' माणसाच्या पतनाचे मूक कारण. तो दिसत नाही, पण जाणवत राहतो. तो झगमगतो, पण आतून पोखरतो. ह्या अभंगसंग्रहात, अहंकाराच्या विविध रूपांची, त्याच्या परिणामांची आणि त्यातून होणाऱ्या विनाशाची ओळख करून दिली आहे. प्रत्येक अभंग हा एक आरसा आहे जो वाचकाला स्वतःच्या अंतरंगात डोकवायला भाग पाडतो.

अहंकार असे शासक बनण्या ।
शोषण करण्या समूहाचे ॥

अहंकार जेंव्हा मनामध्ये राज्य करू लागतो, तेंव्हा माणूस स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजू लागतो. असा माणूस शासक होतो पण केवळ नावाला. प्रत्यक्षात तो शोषण करणारा ठरतो. तो समूहाच्या हिताचा नाही, तर आपल्या स्वार्थाच्या झोतात अडकलेला असतो. नेतृत्व हे सेवेसाठी असते, अहंकारासाठी नव्हे हेच इथे अधोरेखित केलं आहे.

अहंकारी कुठे जगत असतो ।
कुढत असतो मनामध्ये ॥

अहंकारी व्यक्ती वरकरणी जरी आत्मविश्वासाने वावरत असली, तरी तिचं अंतःकरण सतत अस्वस्थ असतं. अहंकारामुळे ती स्वतःशीच झगडत असते, तिच्या मनात द्वंद्व सुरू असतं. अशा व्यक्तीला शांतता मिळत नाही. इथं 'कुढत असतो' हा शब्द फार सूचक आहे बाहेरचा गजर जरी असला, तरी आतंरिक वेदना तीव्र असते.

आतंरिक ज्ञान शून्य होत जाई ।
बा जाता ना जाई अहंकार ॥

अहंकारामुळे माणसाचं ज्ञान ही फक्त माहितीपुरतं उरतं अनुभव, विनय, आणि आत्मप्रबोधन दूर जातं. बुद्धी असूनही शहाणपण राहत नाही. अशा स्थितीत 'बा' म्हणजे आई, गुरु, किंवा सद्गुरू जे अहंकार दूर करू शकतील तेही निष्प्रभ ठरतात. अहंकार इतका ठाम आणि हट्टी बनतो की तो सहज जात नाही.

अहंकार वस्त्र सदा फाटलेले ।
नसे नटलेले सजलेले ॥

अहंकार म्हणजे अशोभनीय वस्त्र. जरी माणूस त्याने स्वतःला झाकण्याचा प्रयत्न करत असला, तरी ते वस्त्र फाटलेलं आहे. ते व्यक्तीच्या अस्सल ओळखीला झाकू शकत नाही. सजावट, दिखावूपणा, हे सगळं क्षणिक. अहंकार हे व्यक्तिमत्व अधिकच विद्रूप करतं.

अहंकार येता दहा डोकी व्यर्थ ।
पांडित्याला अर्थ काही नसे ॥

रावणाची उपमा येथे अतिशय प्रभावी आहे. दहा डोकी म्हणजे दहा पैलूंनी ज्ञानी, सामर्थ्यशाली असलेला पण अहंकारामुळे तो विनाशाच्या मार्गावर जातो. कितीही ज्ञान, कितीही कर्तृत्व असलं तरी अहंकार आल्यावर त्याची किंमत उरत नाही. ते ज्ञानही व्यर्थ ठरतं.

अहंकार नौका याची असो त्याची ।
ती असो कुणाची डुबतेच ॥

अहंकार असलेली नौका म्हणजेच जीवनयात्रा सदैव बुडणारी. ती कुणाचीही असो सामान्याची, राजाची, संताची किंवा ज्ञानीची. एकदा का अहंकार आला, की शेवट ठरलेला असतो. या अभंगातून, कर्माने नाही, तर मनोवृत्तीने माणूस मोठा होतो हे स्पष्ट होते.




अहंकार येतो कुणा सौंदर्याला ।
कुणा हुशारीचा अकारण ॥

अहंकार केवळ पद, संपत्ती यापुरता मर्यादित नसतो. सौंदर्य, हुशारी, प्रतिभा याचाही अहंकार होतो. आणि तोही अकारण. कारण सौंदर्य किंवा बुद्धिमत्ता ही ईश्वरी देणगी त्या आधारे गर्व करण्यास काहीच कारण नाही. परंतु माणूस हे विसरतो आणि त्या वरदानाचं ओझं करून घेतो.

अहंकारी व्यक्ती स्वताही डुबतो ।
घेवून डुबतो सोबत्याला ॥

अहंकार हे केवळ स्वतःचं नुकसान करत नाही, तर आजूबाजूच्यांनाही वेठीस धरतो. जसा गर्विष्ठ नेता आपल्या निर्णयांमुळे संपूर्ण राष्ट्राचं नुकसान करू शकतो, तसंच अहंकारी माणूस आपल्या सहवासातील व्यक्तींनाही दुःखात लोटतो. तो स्वतःही बुडतो आणि इतरांनाही बुडवतो.

धुंदी मस्ती होती पदाचिया त्याला ।
तुच्छ जनतेला समजले ॥

पद, अधिकार, सत्तेची धुंदी चढलेल्या व्यक्तीला सामान्य लोकांचा अपमान वाटतो. तो जनतेला क्षुल्लक समजतो. पण जनतेचा शहाणपणा जास्त दूरदृष्टीचा असतो. ते ओळखतात की ही मस्ती क्षणभंगुर आहे. सत्तेचा गर्व ही जळणारी मशाल असते जी अखेरीस स्वतःलाच भस्म करते.

अहंकार तुझा भोवतो सारखा ।
खोडतो सारखा तुझ्या खुणा ॥

हा अंतिम अभंग एका सजग इशाऱ्यासारखा आहे. तू कितीही मोठा झालास, तुझ्या कर्तृत्वाच्या खुणा, तुझ्या यशाचे ठसे हे सगळं अहंकार नष्ट करू शकतो. तो भोवऱ्यासारखा आहे सतत फिरणारा, धक्का देणारा, आणि अखेरीस ओळख मिटवणारा. म्हणूनच, अंत:र्मुख होण्याची वेळ आहे अहंकारापासून स्वतः ला वाचवण्याची.

हे सर्व अभंग आपल्याला स्पष्ट करतात की अहंकाराचा मार्ग हा स्वतःच्या नाशाकडे नेणारा असतो. नम्रता, विनय, आणि सजगता हेच खरे बलस्थान असतात. आपल्यातील सर्वश्रेष्ठतेची खरी ओळख म्हणजे स्वतःच्या क्षमतेचा उपयोग इतरांच्या भल्यासाठी करणे अहंकारासाठी नव्हे.

अहं शून्य या अभंगसंग्रहाच्या मुखपृष्ठात अर्थगर्भ प्रतीकात्मता आणि सूचक रंगछटा यांचा सुरेख संगम साधलेला आहे. हिरव्या-गडद झळाळत्या पार्श्वभूमीवर एक आकृती ध्यानावस्थेत, आत्मशोधात गुंतलेली आहे. तिच्या पाठीवर एक व्यक्ती पुढे चालताना दिसतोतो जणू त्या व्यक्तीच्या अंत:र्मनातून प्रवास करतो आहे, किंवा आत्मभानातून अहंकारशून्यतेकडे जाण्याचा मार्ग शोधतो आहे.

रेषांची गोल वर्तुळं, ही एक मानसिक गोंधळाची, आत्मगुंतागुंतीची किंवा मीपणातून शून्य होण्याच्या प्रक्रियेची दृष्यमान साक्ष वाटते. अभंग या पारंपरिक अध्यात्मिक वाङ्मयप्रकारास साजेशी साधी पण प्रभावी मांडणी येथे जाणवते. शीर्षकाचा फॉन्ट हा मराठीतून आलेल्या आंतरिक प्रवाहाचा भास देतोअहं आणि शून्य यातील विरोधाभास मुखपृष्ठाच्या मांडणीतून सुरेखपणे अधोरेखित होतो. या मुखपृष्ठातून आत्मभान, शरणागती, आणि अंत:र्मुखतेच्या अर्थछटांनी समृद्ध असा भावसंसार उमटतो. एकंदरीत, मुखपृष्ठ हे संग्रहाच्या आशयाला पूरक आणि रसिकाच्या चिंतनप्रवृत्तीला साद घालणारे असे आहे.

'अहं शून्य' या अंतःप्रेरित अभंगसंग्रहातून अंत:र्मनाचा आरसा आपल्यासमोर उभा राहतो. प्रवीण हटकर यांची ही साहित्ययात्रा आत्मभानाच्या दिशेने नेणारी आहे. त्यांच्या चिंतनशील लेखनास आणि आगामी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा हा संग्रह रसिकांच्या अंतःकरणाला नक्की भिडेल, अशी श्रद्धा....!

## लोकमानस

# कल्पवृक्षापासून कल्पक वस्तूची निर्मिती

नारळाला कल्पवृक्ष असे संबोधले जाते. जगातील प्रमुख नारळ उत्पादक देशांचा समावेश असलेल्या 'एशियन ॲण्ड पॅसिफिक कोकोनेट कम्युनिटी' या संघटनेने (एपीसीसी) ने २००९ मध्ये दोन सप्टेंबर हा दिवस जागतिक नारळ दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. त्या माध्यमातून जागतिक नारळ शेती व उद्योगाचे महत्त्व व विस्तार वाढीस अजून चालना मिळाली. भारत हा देखील नारळ उत्पादक देश असून कोकणातील शेतकऱ्यांचे ते अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पीक आहे. धार्मिक कार्यापासून रोजच्या जेवणापासून ते झावळ्या, करवंटी, सोडणे आदींचाही विविध कामांसाठी वापर होतो कोकणातील भोगवे (जि. सिंधुदुर्ग) येथील राजाराम प्रभू यांनी नारळाच्या विविध भागांपासून कलात्मक, गृहोपयोगी वस्तू निर्मितीचे कौशल्य आत्मसात करून नारळाचे मूल्यवर्धन साधले आहे. सुमारे ५० हून अधिक प्रकारच्या वस्तू तयार करून व्यवसायाला चालना देत आर्थिक उलाढाल वाढवली आहे. कृषी पर्यटन केंद्राच्या उभारणीतून त्याला मोठा आधार मिळाला आहे.

## मुलखावेगळी माणसं

लहानपणी गुरे राखण्यासाठी प्रभू जायचे. अंगभूत कला कौशल्य, सर्जनशीलता व नवे काही करण्याची आस असलेले प्रभू माळरानावरील गवत, झाडांची मुळे यापासून काहीतरी कलाकृती वा वस्तू बनविण्याचा प्रयत्न करायचे. विहीर खोदताना त्यांना एक दगड आढळला. त्यापासून आकर्षक पुतळा तयार केला. जंगलात फिरताना एकदा कुंबया वनस्पतीचे सुकलेले मोठ्या आकाराचे मूळ दिसले. त्यापासून 'ॲनाकोंडा' अजगराची प्रतिकृती तयार केली. ती खूप आकर्षक झाली होती. पण त्याचे मूळ कुजल्याने ती फार दिवस टिकू शकली नाही. पण इथेच प्रभू यांच्या कलाकारीला अधिक चालना मिळाली. बागेतील नारळांच्या विक्रीतून उत्पन्न मिळायचे. पण त्याच्या झावळ्या, करवंट्या, सोडणी आदी वाया जाणाऱ्या बाबींचे मूल्यवर्धन करून त्यापासून गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा छंद त्यांना जडला. त्यातून एकेक करीत आजमितीला पन्नासहून अधिक प्रकारच्या वस्तूंचा जन्म झाला आहे. प्रभू यांनी नारळाच्या झाव्ल्यापासून समई,




पेन स्टॅन्ड, चहाचा कप, घरटे, कंदील, टोपी, वाइन ग्लास, बाउल, चमचे, राखी, फुलदाणी अशा शोभेच्या वस्तू तयार केल्या आहेत तर झावळांपासून आंबा बॉक्स (एक ते दोन डझन क्षमता). त्याचे वरचे आवरण सुपारीच्या पोयीपासून तयार केले.झावळ्यांपासून आंबा करंडी देखील. त्यात दोन- तीन डझन आंबे सहज राहतात.

पर्यावरणपूरक व दिसायला अतिशय सुंदर असल्याने देशी- परदेशी पर्यटकांना ती भुरळ घालते आहे.झावळयांपासून आकर्षक हिरव्या रंगाची टोपी. जिच्या प्रेमात परदेशी पर्यटक पडले आहेत.या वस्तूंच्या किमती प्रकार व गुणवत्तेनुसार ५० रुपयांपासून ते एकहजारांपर्यंत आहेत. पर्यटन केंद्रात येणारे ग्राहक वस्तू खरेदी करतात. स्थानिक ठिकाणीही विक्री होते.दिवाळी, सुट्टी व उन्हाळी सुट्टी हे मुख्य हंगाम असतात. हा काळ पकडला तर एक लाखांपर्यंत उलाढाल वस्तू विक्रीतून होते.मुख्य म्हणजे कोणत्याही यंत्रांचा आधार न घेता केवळ हस्तकौशल्यातून वस्तू तयार केल्या आहेत. तारकर्ली येथील एका व्यावसायिकाकडे प्रभू यांच्या वस्तू विक्रीसाठी होत्या. एका पर्यटकांकडून माशांच्या प्रतिकृतीची मागणी झाली. मात्र तशी तयार केलेली नव्हती. मात्र हे आव्हान स्वीकारून नारळाच्या झावळ्यांपासून तशी प्रतिकृती बनवण्यात प्रभू यशस्वी झाले. एका परदेशी पर्यटकाला ती पसंत पडून त्याने चांगली किमतही दिली. एकूणच,नारळा सारख्या कल्पृक्षापासून प्रभू यांनी शोभेच्या वस्तू बनवत स्वताला आगळा वेगळा कलाकार म्हणून सिध्द केले आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 40




### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:-**

**दोन अक्षरी**
अंध
कृपा
कृषी
खस
छापा
ठेका
तर
तसू
बाष्प
मत
मजा
यज्ञ
रजा
रत
राख
वत
व्याध
संग
सर
साग

**तीन अक्षरी**
अहित
उर्मट
कुवत
खमण
गवत
जटायू
तपस्या
तलब
तुळस
दानत
बोलका
भैरव
मयूर
वराह
रकाना
रजत
रेवती
वरुण
शकुनी
सबला
सरण
साखर

**चार अक्षरी**
अंतराळ
अमावस्या
अवरोह
एकपाठी
उपासना
कृतयुग
मनमानी
युरेनस
रसातळ
रामबाण
लाजवाब
वावटळ
सवलत
सावकार

**पाच अक्षरी**
काळभैरव
जकातनाका
नामनिर्देश
नामोनिशाण
बागुलबोवा
रक्त वाहिनी
समवयस्क

**सहा अक्षरी**
मत मतांतर
मकर संक्रात
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भ | री | व | | स | मा | न | | अ | नु | क | र | ण | |
| र | | सं | ग | ण | क | | | जा | | प | त | | पा |
| त | | त | ण | | ड | म | रू | | बो | ट | | जो | र |
| का | न | | | | | ज | प | मा | ळ | | ख | डा | वा |
| म | त | भे | द | | का | कु | | ल | व | ण | | क्ष | |
| | म | द | | वा | न | र | कि | व | ण | | न | र | म |
| ह | स्त | क | ला | | उ | | | णे | | सु | | | हा |
| ट | क | | ज | | घ | न | ता | | स | गा | सो | य | रा |
| वा | | अ | व | घ | ड | | टा | च | | वा | म | | ष्ट्र |
| दी | प | | णे | | णी | | खा | | बा | ला | | आ | दि |
| | द | ही | | म | क | रा | ल | य | | ग | स्त | | न |
| वा | रा | | का | त | र | | चे | | उ | णे | | अ | |
| म | त | दा | र | | णे | | मां | ज | र | | जा | व | क |
| | घे | र | | च | | | ज | म | वि | णे | | रो | म |
| गा | णे | | म | हा | न | ग | र | | णे | | मो | ह | र |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 419




**आडवे संकेत :—**
1) दुसऱ्यांची हुबेहुब नक्कल करणारा
4) कमळांचा समूह असलेले सरोवर
7) स्वामी, मालक (उर्दू)
9) अपेक्षा, आकांक्षा
10) शहरात आयात होणाऱ्या मालावरील कर,
11) मुंबईतील एक उपनगर, जिना
12) नवीन
13) तांब्या, घुमट
14) अकस्मात केलेला हल्ला, आकस्मिक संकट
15) इंग्लंडच्या पहिल्या महिला पंतप्रधान,
17) भगीरथ प्रयत्नाने भूतलावर आलेली नदी
20) बाण तीर
21) दरिद्री, भिकारी
22) निरुत्साही, निराश
25) ती पहाताच X X कलिजा खलास झाला
27) आपल्या जटेत गंगा धारण करणारा शंकर
28) शृंगारणे,
29) गणपतीचा मोठा भाऊ
31) मर्कट, माकड
34) वीट, तिटकारा
35) हिंदी सिनेमासृष्टीत आपला ठसा उमटविणारी एक जुनी मराठी चरित्र अभिनेत्री
38) काजळ
40) अमेरिकेच्या एका माजी अध्यक्षाचे आडनाव
43) क्रिकेटमध्ये बाद न झालेला खेळाडू,
45) पूर्णत्वास न गेलेले
46) दु:ख, विलाप
47) प्रामाणिक व पतदार मनुष्य
48) लहान कट्यार
49) जरुरी नसलेले, निरर्थक
51) मध्यंतरीच्या काळातील एक प्रख्यात महाराष्ट्रीयन नाट्य, चित्रपट दिग्दर्शिका
54) बेलगाम, स्वैर,
55) गुंगारा, फसवणूक
56) टिकाव, निभाव,
57) हिमालय स्थित एक तीर्थक्षेत्र
59) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
60) वाद, भांडण
62) आवरण न काढलेले तांदूळ
63) मुसलमानी वर्षाचा नववा महिना
66) आभाळ
67) वार, दिवस
68) पांढऱ्या फुलांचे एक फूलझाड

**उभे संकेत :—**
1) नमस्कार, वंदन
2) पडीत जमीन शेतीच्या उपयोगाची करणे
3) रसाने परिपूर्ण असलेले
4) तत्वांश, अर्क, धातूची परीक्षा
5) राक्षसी, डाकीण
6) वस्त्राचे छिद्र बुजविण्यासाठी त्यात विणलेले सूत
7) अवकाशातील तारकांचा समूह
8) सापाने त्यागलेली त्वचा,
9) लढाऊ जहाजांचा समुदाय
10) पाणी, नीर
12) राजा, नृप
13) हस्त
16) महानुभाव पंथातील एक
18) कपोल
19) शाळेतील वार्षिक मनोरंजनाचा कार्यक्रम
20)सळई, तारेचा तुकडा
23) मुख्य पुरुष, मुख्य श्रेष्ठ (उर्दू)
24) मृतदेह, प्रेत
26) चांगले लांबसडक केस असणारी स्त्री
30) आंग्लभाषेतील होकार
31) वाद्य वाजविणे
32) एक विदेशी मद्य प्रकार
33) बाजू सावरुन धरणारा, सहाय्यकर्ता
36) महाराष्ट्रातील एक अणुऊर्जा निर्मिती केंद्र
37) गुर्मी, ताठा
38) माता रेणूकादेवी
39) जनता दलाचे संक्षिप्त नाव
41) मि. .......... अमिताभ बच्चनचा एक जुना चित्रपट, लाक्षणिक अर्थाने फसवणूक करणारा
42) आपल्या राष्ट्रध्वजावरील गतीचे प्रतीक असलेले चिन्ह
44) प्रतिस्पर्ध्याला मात देण्यासाठी लढविलेल्या क्लुप्त्या
45) वार्धक्य किंवा मरण नसलेला
47) आभुषण (हिं)
49) निराश्रित, लावारीस
50) नाम, होडी
51) संतोष, मनाची शांती
52) स्वीकार करणे अंगिकारणे
53) पंक्ती, ओळ
54) करंगळीच्या शेजारचे बोट
57) खुप, विपुल प्रमाणात
58) नृपति
61) वायु, पवन
62) पाण्याचा बारीक प्रवाह
64) मृतप्राय, मेलेला
65) एक संख्या
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चि | त्र | प | ती | | क | या | स | | ना | ग | पू | र | | मे | घ |
| ली | | र | ट | | र | | ही | न | | | र्व | | द | म | ट |
| म | ल | म | | प्र | त | | त | ट | बं | दी | | द | र | | स |
| | क | वी | सं | मे | ल | न | | स | ड | पा | त | ळ | | स | र्प |
| ख | ब | र | | य | | व | | म्रा | | व | र | ण | भा | त | |
| ल | | च | | | खो | ल | ग | ट | | ली | | | | त | मा |
| | च | क्र | व्यू | ह | | वि | ज | | वे | | नि | वा | रा | | स |
| अ | | | ह | र | | शे | रा | स | स | व्या | शे | र | | ध | |
| शो | ष | क | | ह | | ष | | ह | वा | | ष | | न | र्म | दा |
| क | | स | म | र | स | | टी | का | | पा | | प | | सं | |
| वा | न | | न | म | न | | प | रि | च | य | प | त्र | | क | |
| टि | का | ऊ | | हा | | क | | प | र | वा | | का | | ट | क |
| का | र | | | दे | ऊ | ळ | | त | | ट | क्क | र | | | ब |
| | दे | व | घे | व | | प | त | पे | ढी | | | | अ | पा | र |
| जा | णे | | र | | त | | क | ढी | | अ | घो | री | | म | |
| दू | | ग | णे | श | वा | त | | | पै | जा | र | | | र | वा |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज व्यवसायात नवीन भागीदार मिळतील. नोकरीत पदोन्नती मिळू शकते. तुम्ही मित्रासोबत पर्यटन स्थळी सहलीला जाऊ शकता.

**वृषभ:** आज जुने मालमत्तेचे वाद मिटतील. ज्यामुळे तुम्हाला संपत्ती मिळू शकते. व्यवसायाशी संबंधित कामे वेळेवर करा.

**मिथून :** तुमच्या वैवाहिक जीवनात तुमच्या जोडीदाराकडून विशेष सहकार्य आणि साथ मिळाल्याने तुम्हाला खूप आनंद होईल.

**कर्क :** आज तुमच्या हृदयात प्रेमाचे बीज अंकुरेल. तुम्हाला कोणीतरी आवडू लागेल. विद्यार्थी नवीन मित्रांशी मैत्री करतील.

**सिंह :** आज तुमच्या आईमुळे तुमचे मन दु:खी असू शकते. कुटुंबात अनावश्यक वादात पडणे टाळावे. अन्यथा प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचेल.

**कन्या :** आज तुम्ही चांगले पैसे कमविण्यात यशस्वी व्हाल. न्यायालयीन कामात सहभागी असलेल्या लोकांना विशेष लाभ मिळतील.

**तुळ :** आज अभ्यास आणि अध्यापनात रस वाढेल. विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी घरापासून दूर जावे लागेल.

**वृश्चिक :** आज तुमचे आरोग्य चांगले राहील. रुग्णालयात दाखल असलेल्या लोकांना आरोग्य लाभ मिळतील. जेणेकरून तो घरी येईल.

**धनु :** आज महत्त्वाच्या बाबींमध्ये काळजीपूर्वक निर्णय घ्या. तुमची गुप्त धोरणे विरोधकांना उघड होऊ देऊ नका.

**मकर :** आज तुम्हाला आर्थिक क्षेत्रात केलेल्या कोणत्याही प्रयत्नांमध्ये यश मिळेल. आधी अडकलेले पैसे मिळतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ :** आज, कानाशी संबंधित कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना वाढत्या चिंतेचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक आरामाकडे लक्ष द्या.

**मीन :** आज, ज्या लोकांकडून तुम्हाला आर्थिक मदतीची अपेक्षा आहे ते संधी मिळताच तुमचा विश्वासघात करतील.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### रोजगार सेवक यांचा मनमानी कारभार

**कळंबी महागाव :** गट ग्रामपंचायत कळंबी महागाव व कळंबा खुर्द येथील गावकरी मंडळी यांनी पंचायत समिती बाळापूर जिल्हा अकोला येथे जाऊन निवेदन दिले. आम्ही वरील विषयाद्वारे अर्ज करतो की, श्री सिद्धार्थ किसन सावळे रोजगार सेवक हे कळंबी महागाव येथे कार्यरत आहेत. सदर व्यक्तीचे शिक्षण कमी असल्यामुळे सदर रोजगार सेवकास बरोबर लिहिता, वाचता येत नाही, तसेच गावातील लोकांना जॉब कार्ड काढायचे असल्यास त्यांच्याकडून जास्तीचे ५०० ते ३०० रुपये घेतो. घरकुलाचे पैसे काढायचे असल्यास त्यांच्याकडून जास्तीच्या रुपयांची मागणी करतो व कामेसुद्धा करीत नाही तसेच कोणाची कामे करायची असल्यास ही व्यक्ती दारू पिऊन अर्वाच्य भाषेचा उपयोग करतो, तसेच घरकुलाचे प्रस्ताव दाखल करायचे पैसे घेतो; पण तो कोणतेही काम करीत नाही. त्यास विचारले तर माझे कोणीही काहीही करू शकत नाही, तरी यास आपण त्वरित काढून नवीन त्या ठिकाणी उच्चशिक्षित असलेला व्यक्ती नियुक्त करून द्यावा, जेणेकरून गावातल्या कुठल्याही व्यक्तीला त्रास होणार नाही व गावचा विकास होईल आणि गोरगरिबाचे लवकरात लवकर कामे होतील, ही विनंती. अशी या

### पातूर नंदापूर येथे बाल संस्कार शिबिराचे आयोजन



**पातूर नंदापूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा ), अकोला जिल्हा, तालुका पूर्व व ग्राम शाखा पातूर नंदापूर यांच्यावतीने प्रज्ञा बुद्ध विहार पातूर नंदापूर या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभेच्या संरक्षिका महाउपासिका मीराताई आंबेडकर यांच्या जन्म दिवसानिमित्त पाच दिवशीय बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे अध्यक्षस्थान अकोला पूर्वचे अध्यक्ष आशिष मेश्राम यांनी स्वीकारले होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष पी. जे. वानखडे यांनी केले प्रमुख मार्गदर्शन जिल्हा सरचिटणीस नंदकुमार डोंगरे, विजय जाधव हे उपस्थित होते. तर पाच दिवसांमध्ये जिल्हा संघटक सुखदेव दामोदर, कार्यालयीन सचिव सदाशिव मेश्राम, जिल्हा संस्कार सचिव बावस्कर , शेगावकर, अकोला तालुका पूर्वचे आशिष मेश्राम, संघपाल इंगळे,राहुल भगत,रामदास मोहोळ,आनंदा बागडे, करण इंगळे, संगपाल इंगोले, विशाल सोनोने यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये बहुसंख्येने बालक बालिका उपस्थित होते. या शिबिरार्थ्यांना प्रज्ञा बुद्ध विहार परिसरामधील उपासक-उपासिकांनी वैयक्तिक नाश्ता फलहार देऊन त्यांचा उत्साह वाढविला. या शिबिराची सुरुवात ०५/०५/२०२५ रोजी करण्यात आली होती तर समारोप रविवार ११/०५/२०२५ रोजी करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अकोला पूर्वचे कोषाध्यक्ष राहुल भगत यांनी केले व कार्यक्रमाचे आभार अकोला पूर्वचे महासचिव संगपाल इंगळे यांनी मानले.

### लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठच्या १००टक्के निकालाची परंपरा कायम

**अकोट :** स्थानिक लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठचा दहावीचा निकाल १००% लागला असून, पुनश्च १००% ची परंपरा कायम राखली आहे. लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ अकोटमधील इंग्रजी माध्यमाची सर्वात जुनी आणि पहिली शाळा आहे. आतापर्यंत प्रत्येक वर्षी १००% निकालाची परंपरा कायम ठेवत यशोशिखर गाठले आहे. एसएससी २०२५ च्या परीक्षेत एकूण ४९ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले व त्यामध्ये अमन अकोटकर ९२.८०% व गांधार जोत ९०.८०% प्राप्त करून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला, तसेच शंतनु इंगोले ९१.४०%, मिलिंद काळे ९०.२०%, आयुष रावळे ८८.८०%, आदित्य सावंग ८७.००% प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी ८५.००% च्या वर एकून पंधरा विद्यार्थी आहेत तर उर्वरित सर्व ७५.००% च्या वर गुण प्राप्त केलेले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या, तसेच या यशाचे मानकरी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेसुद्धा पालकांनी आभार मानले आहे. या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कळंबी महागाव येथे बुद्धपौर्णिमा उत्साहात साजरी

**कळंबी महागाव :** आनंद बौद्ध विहार कळंबी महागाव येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक बुद्ध विहारांमध्ये सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. सामूहिक प्रार्थनेचा कार्यक्रम आटोपल्यानंतर काही बौद्ध विहारांवर खीरदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्व बौद्ध उपासक व उपासिकांनी विहारांमध्ये सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक त्रिसरण पंचशील घेऊन करण्यात आली. बुद्ध जयंती बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव आहे. हा सण जगभरात विशेषत: भारतात वैशाख पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो, अशी माहिती केंद्रीय शिक्षक जुगल सावळे यांनी त्यांच्या भाषणातून दिली .

# कर्जमाफी योजनेतील साडेसहा लाख शेतकरी अजूनही लाभापासून वंचित

## १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे हायकोर्टाचे शासनाला आदेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



> कर्जमाफी मिळावी, यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार शेतकरी अन्याय निवारण कृती समितीमार्फत शासन दरबारी दाद मागितली, तसेच लोकप्रतिनिधीमार्फत सभागृहात आवाज उठविला. आंदोलने केली; परंतु शेतकऱ्यांप्रती उदासीन असलेल्या आणि निद्रा अवस्थेत असलेल्या शासनाला जाग आली नाही म्हणून शेवटी शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध स्थानिक सोसायटीच्या वतीने ॲड. अजय माहेश्वरी नागपूर यांच्यामार्फत हायकोर्टात धाव घेतली असून, त्यावर न्यायालयाने १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे शासनाला आदेश दिले आहेत, अशी माहिती सोसायटीचे अध्यक्ष मनोहर पापड यांनी दिली आहे. अकोला जिल्ह्यामध्ये सदर प्रकरण वंचित शेतकऱ्यांच्यावतीने दाखल केल्यामुळे वंचित शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**देवरी, दि. १३ :** स्थानिक सेंट्रल कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या २६८ शेतकऱ्यांच्यावतीने नागपूर हायकोर्टात रीट याचिका दाखल केली आहे. याप्रकरणी येत्या १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे आदेश शासनाला दिले आहेत.

जून २०१७ मध्ये कर्जमाफी योजनेतील साडेसहा लाख शेतकरी अजूनही लाभापासून वंचित आहेत. अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांचे बेहाल होत आहेत. त्यामध्ये पिकातील अपयश, दुष्काळ, आत्महत्या व नैसर्गिक आपत्ती यामुळे हवालदिल झालेला शेतकरी कसे तरी जीवन जगत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीविषयक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने शासनाने कर्जमाफी योजना तयार केली होती. त्यानंतर मोठा गाजावाजा करत सत्तेत असलेल्या सरकारने २८ जून २०१७ ला तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेची घोषणा करून लाखो शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केली होती; परंतु आठ वर्षाच्या प्रतीक्षेनंतरही ६ लक्ष ५६ हजार शेतकरी ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीपासून वंचित आहेत.

गेल्या आठ वर्षांपूर्वी जून २०१७ ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कर्जमाफी योजनेची घोषणा करणारे तत्कालीन मुख्यमंत्री आज मुख्यमंत्री आहेत. आठ वर्षांपूर्वी घोषणा केलेल्या कर्जमाफी योजनेतील शेतकऱ्यांचे ६००० कोटी रुपये देणे बाकी असल्यावरही गेल्या विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परत संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यालाही शासन आता ठेंगा दाखवत आहे. शेतकऱ्यांप्रती उदासीन असलेल्या शासनाचे विरोधात स्थानिक सेंट्रल कृषक सोसायटीमधील कर्जमाफीपासून वंचित असलेले २०४८ शेतकऱ्यांच्या वतीने मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात न्याय मागण्यासाठी रीट याचिका दाखल केली. यावर नागपूर हायकोर्टाचे न्यायाधीश नितीन सांबरे व न्यायाधीश वृषाली जोशी यांनी रीट याचिका क्रमांक डब्ल्यू पी २५ ४० / २०२५ नुसार याचिका दाखल करीत राज्य सरकारला यावर १२ जून २०२५ रोजीपर्यंत उत्तर देण्याचे आदेशित केले आहे. जून २०१७ च्या कर्जमाफी योजनेतील वंचित शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची अंमलबजावणी न झाल्याने व ते थकीत दिसत असल्याकारणाने गेल्या आठ वर्षात त्यांना नवीन कर्ज देण्यास बँकांनी नकार दिला आहे, त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आजही अडचणींचा सामना करावा लागत आहे. जर ही योजना शेतकऱ्यांना मदत म्हणून जाहीर केली होती तर त्यासाठी आठ वर्षांपासून शासन शेतकऱ्यांचा विश्वासघात का करीत आहे, असा प्रश्न कर्जमाफी पासून वंचित शेतकरी करीत आहेत.

## सेंट पॉल्स ॲकॅडमी अकोटच्या वर्ग १०वीच्या विद्यार्थ्यांची १००टक्के निकालाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



JAYANT PANDAV
94.60%



KAPIL PIMPLE
94.40%



BHAVANA AKOTKAR
94.20%



MANASWI KATHOLE
94.00%



DIGANTI SAPKAL
94.00%

**अकोट, दि. १३ :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील सेंट पॉल्स ॲकॅडमी अकोट येथील दहावीचा निकाल १००% लागला असून, शाळेमधून प्रथम क्रमांक जयंत गोविंदा पांडव ९४.६०%, द्वितीय क्रमांक कपिल प्रशांत पिंपळे ९४.४०%, तृतीय क्रमांक भावना सुधीर अकोटकर ९४.२०%, मनस्वी किशोर काठोले ९४%, दिगंती अजित सपकाळ ९४%, तन्वी अरविंद बोरोडे ९३.४०%, हर्षाली पुरुषोत्तम अढाऊ ९३.४०%गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले.

यावर्षी एकूण १२१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९०% च्या वर १९ विद्यार्थी, ८०% च्यावर ५६ विद्यार्थी, ७० टक्केच्यावर २३ विद्यार्थी, ६०% च्यावर २३ विद्यार्थ्यांना गुण मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया , सचिव प्रमोद चांडक , उपाध्यक्ष लुणकरण डागा, प्राचार्य विजय बिहाडे, उपप्राचार्य ममता श्रावगी व रिंकू अग्रवाल , अभिजीत मेंढे , विद्या नळे, वनिता थोरात , जयश्री हिंगणकर , जया लाडोळे , नितीन गावंडे , भाविका लोणकर ,अभिलाष काळमेघ , अगस्ती ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना

## शाहबाबू इंग्लिश हायस्कूल पातूरचा १००% निकाल

**पातूर :** १३ मे रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने आपल्या १००% टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेतून ४८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते. यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९४.८०%गुण घेऊन ईलसा यशफीन प्रथम,९३. ४०% गुण घेऊन रुशाना रिफा खान द्वितीय, ८७.८०% मादीया सदफ तृतीय, ८३.६०% घेऊन उरूज फातिमा चौथी, ८३.६०% घेऊन सय्यद शयान उल्लाह पाचवा, ८३.२०% घेऊन इनशिरा शहजीन पाचवी ८२.८०% घेऊन आहेसाना सहावी, ८२.६०% घेऊन मोहम्मद नबील खान सातवा, ८२.६४०% घेऊन जूबिया अनम आठवी तर ८१.८०%टक्के घेऊन सोहेल खान दहावा आला. या निकालाची विशेष बाब म्हणजे या शाळेतील ४८ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये तर प्रथम श्रेणीत २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर २९ विद्यार्थ्यांनी क्रीडा व ड्रॉइंग ग्रेड परीक्षेचे अतिरिक्त गुणाचा लाभ घेतला. ही बाब जिल्ह्यातील कोणत्याही शाळेत अपेक्षित नाही. सर्व प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक व स्वागत मुख्य कार्यकारी अधिकारी सय्यद इसहाक राही यांनी केले.

## नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्राप्त केले सुयश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आलेगाव, दि. १३ :** आदिवासीबहुल तसेच अकोला जिल्ह्याच्या सीमावरती भागातील या परीक्षेत ज्ञानगंगा प्रवाहित करण्याचे कार्य नूतन विद्यालय ज्या पद्धतीने १९६४ पासून अविरत रूपाने करीत आहे, त्याचप्रमाणे नूतन विद्यालयाचे यश संपादित करण्याची परंपरा आजही निरंतरतेने सुरू आहे.

नुकत्याच लागलेल्या एस. एस. सी. परीक्षेच्या निकालामध्ये नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कठीण परिश्रम घेत विद्यालयाचे नाव यशस्वी केले आहे. घोषित झालेल्या निकालांमध्ये नूतन विद्यालयाचे१२३ विद्यार्थी परीक्षेकरिता बसले होते, त्यापैकी विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नूतन विद्यालयाचा ९८.३४% रिझल्ट लागलेला आहे. विद्यालयामधून प्रथम क्रमांक रुद्र पवन जैन ९१.८० %,द्वितीय क्रमांक दोन विद्यार्थ्यांनी मिळविला. निरंजन विकास धातरक ९१.६०% आर्यन सुनील काठोळे ९१.६०%, तृतीय क्रमांक दीक्षा धम्मशील तेलगोटे ९१.००%, यश वेळेला सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयाचे प्राचार्य राठोड पर्यवेक्षक व सर्व शिक्षक कर्मचारी यांना दिले.

संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष सुभाषचंद्र जैन, संस्थेचे सचिव बसवेश्वर आप्पा वीर व सर्व सदस्यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले, तसेच नूतन विद्यालयाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचेसुद्धा अभिनंदन केले. सदर निकालामुळे नूतन विद्यालयाचे नाव पातूर तालुक्यामध्ये मोठ्या आजाराने घेतल्या जात आहे. नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश बघून विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे आपणसुद्धा मेहनत करून जास्तीत जास्त गुण प्राप्त करावे, ही इच्छा जागृत होत आहे. उपस्थित सर्व पालकांनी नूतन विद्यालय शिक्षक, कर्मचारी व सर्व संचालक मंडळाचे ते घेत असलेल्या परिश्रमाकरिता खूप खूप आभार व्यक्त केले आहे.

## राष्ट्रपुरुष हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. १३ :** राष्ट्रपुरुष हिंदूसूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची तारखेनुसार ४८५ वी जयंती मोठ्या उत्साहात पातूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरूदेव सेवा आश्रम येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरी करण्यात आली. गुरूदेव सेवा आश्रम पातूर येथे वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून आश्रमाचे अध्यक्ष संजय पाटील, प्रा.विलास राऊत, प्रा.चंद्रशेखर चतारे, सुधाकर उगले गुरुजी, गायनाचार्य गजानन गिऱ्हे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी विजय राऊत, राजपूत संघटनेचे अध्यक्ष शिवकुमारसिंह बायस या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

शहरात विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेवर निराधार जीवन जगणाऱ्या गोरगरीब लोकांना अन्नदान करण्यात आले. संगितज्ज्ञ प्रा.विलास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी आश्रमामध्ये अकोला येथील गुरुदेव भजनी मंडळाचे चंद्रशेखर चतारे यांच्या भजनी मंडळाने उत्कृष्ट भजनांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी गुरूदेव सेवा आश्रमाच्या महिला मंडळींनी गोपाळकाला करून महाप्रसादाचे वाटप केले.

कार्यक्रम प्रसंगी बाबाराव देशमुख, गजानन पाठक, राजेंद्र गाडगे, गणेश चोंडेकर, विष्णू नागलकर, गजानन इचे, देविदास पाचपोर,मधुकर कोकाटे, आयुष पाठक, निनाद चतारे, रमेश निलखन, सुहास देवकर,चैतन्य राऊत, दिलीप खाकरे, शिवाजी निंबोकार, शालीनी पाटील, अर्चना उमाळे,शोभा कोथळकर, रूपाली येनकर, गिता उमाळे, वर्षा अटायकर, वंदना देवकर, नंदा इंगळे, गिता बंड, नर्मदा गाडगे, माला भाजीपाले, आराधना बायस, अलका राऊत, कल्याणी पाटील, समृद्धी पाटील, वैष्णवी राऊत, विधी बायस, लावण्य बायस, अथर्व गाडगे, अंजली राऊत यांच्यासह महाराणाप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते.

## देऊळगाव ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचारप्रकरणी गेलेली चौकशी समिती रिकाम्या हाताने परत

### दोन वेळा सरपंच सचिवाने ग्रामपंचायतचे कुलूपच उघडले नाही

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

> पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरून मी विस्तार अधिकारी आणि अभियंता मोरे देऊळगाव येथे जाण्याअगोदर सरपंच सचिव यांना पत्र दिले; मात्र गावात आल्यानंतर तीन ते चार तास आम्हाला सरपंच सचिव यांनी तत्काळ ठेवले आणि दोन वेळा आम्ही चौकशीसाठी आलो असता, सरपंच सचिव यांनी ग्रामपंचायतीचे कुलूप उघडले नाही आणि रेकॉर्डही दाखविले नाही .
>
> **विस्तार अधिकारी आणि अभियंता मोरे पातूर पंचायत समिती.**

**पातूर, दि. १३ :** पातूर तालुक्यातील ग्रामपंचायत देऊळगाव येथील सरपंच पंकोश विठ्ठल सोळंके यांनी दोन वर्षापासून सन २०२३ ते २०२५ मध्ये मासिक सभा घेतल्या नाहीत. बेकायदेशीरपणे प्रोसिडिंग प्रमाणे ठराव न घेता परस्पर खोटे ठराव घेतले. खोटे ठराव घेऊन बनावट कागदपत्रे तयार करून भ्रष्टाचार केला. कर्तव्यात कसूर केला. पदाचा दुरुपयोग केला असल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य शंकर शिवहरी बदरखे यांनी ७ एप्रिल २०२५ ला अकोला जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने पातूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी आणि अभियंता मोरे यांना देऊळगाव ग्रामपंचायतमधील रेकॉर्ड तपासण्यासाठी पाठविले असता, देऊळगाव ग्रामपंचायतचे सरपंच पंकोष विठ्ठल सोळंके यांनी ग्रामपंचायतीला लागलेले कुलूप उघडलेच नाही तर ग्रामसचिव रितेश घाटोळ यांनीसुद्धा चौकशी समितीचे विस्तार अधिकारी आणि अभियंता हे दोन वेळा चौकशीसाठी गेले असता, ग्रामपंचायतचे कुलूप उघडले नसल्यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागल्यामुळे उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे. देऊळगाव ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार झाला असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी या अगोदर अकोला च्या तत्कालीन जिल्हा परिषदच्या सीओ बी वैष्णवी यांच्याकडे केल्या होत्या. त्यावर अकोला जिल्हा परिषदेच्या सीओ बी वैष्णवी यांनी देऊळगाव ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार झाला असल्याचे स्पष्ट केले होते. तसे आदेशसुद्धा दिले होते. सरपंच पंकोश विठ्ठल सोळंके यांनी कुलूप उघडण्यास नकार देऊन चौकशी समितीला दोन वेळा परत पाठवले, तसेच चौकशी समितीच्या अधिकाऱ्यांना लेखी पत्र सुद्धा लिहून दिले असल्याचे त्यांनी सांगितले .

## सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी चिंचाळे मंदिराचे उद्घाटन व कलशारोहण कार्यक्रम संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**आलेगाव, दि. १३ :** श्रीक्षेत्र चिंचाळा येथे आजच्या साडेसातशे वर्षांपूर्वी महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्रीचक्रधरजी महाराज आपल्या महाराष्ट्रातील परिभ्रमण काळात श्रीक्षेत्र चिंचाळा येथे आले होते, त्यावेळी त्यांनी या पवित्र जागेवर त्यांच्या रामदेव दादोस नावाच्या ब्राह्मण भक्तांची कमळफुलांची पूजा स्वीकार केला. अशा पवित्र स्थानाच्या ठिकाणी काळानुरूप अनेक वेळा छोट्या मंदिराची उभारणी करण्यात आली; परंतु पुढे चालून ते जुने मंदिर आजच्या सांप्रत काळाच्या दृष्टीने लहानच होत होते, म्हणून महानुभाव परमार्गातील थोर विद्वतरत्न, ज्ञान, भक्ती, वैराग्य,परिपूर्ण महिला आचार्यप्रवर प.पु.आदरणीय तपोनिधी रुक्मिणीबाई पंजाबी श्रीकृष्ण आश्रम आलेगाव अंतर्गत संचालित शाखा श्री क्षेत्र चिंचाळे यांच्या संचालिका मोठ्या आक्काजी यांनी स्वखर्चाने जीर्णोद्धार करून मंदिराचा उद्घाटन सोहळा ११ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत मोठ्या थाटात संपन्न झाला. या महामंगल अवसराच्या ज्ञानसभेला चाळीसगाव जि.जळगाव निवासी वयोवृद्ध, तपोवृद्ध, वैराग्यमूर्ती कविश्वर कुलभूषण प.पु.प.म.आचार्यप्रवर श्रीमराठे बाबाजी यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली हा संपूर्ण कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण, मंदिराचे कलशारोहण, सभामंडप उद्घाटन, मंदिराच्या गर्भगृहाचे उद्घाटन,तथा सर्वज्ञ श्रीचक्रधरजी प्रभु श्रीचरणांकीत स्थानाला गंध, अक्षता, पुष्पहार,वस्त्र, विडा, उपहार समर्पित करण्यात आला. या भव्यदिव्य सोहळ्याला श्रीक्षेत्र रिद्धपूर येथील उपाद्य आम्नाय आचार्य प.पु.प.म.श्री पैठणकर बाबा, तसेच प.पु.प.म.आचार्य श्रीपुजदेकर बाबा पुजदा,प.पु.आचार्य कीर्तनसम्राट म. चिचोंडीकर बाबा,प.पु.आचार्य म.आंबेकर बाबा, श्रीक्षेत्र जाळीचा देव जि.बुलडाणा . प.पु.म.आचार्य कळमकर बाबा श्रीकृष्ण मंदिर अकोला यांच्या हस्ते उद्घाटन व कलशारोहण कार्यक्रम मोठ्या थाटात करण्यात आला. यावेळी संपूर्ण महानुभाव पंथातील अनेक थोर विद्वान संत, महंत, आचार्यगण, तपस्विनी, पंचक्रोशीतील सद्भक्त बंधुभगिनी उपस्थित होते. या मंदिराच्या संपूर्ण जीर्णोद्धार कार्यात प्रामुख्याने प.पु.आदरणीय आचार्य श्रीआनंदमुनी दादाजी, व्यवस्थापक श्रीकृष्ण आश्रम आलेगाव यांनी व आश्रमस्थ सर्व साधकांनी अहोरात्र मेहनत करून हे ईश्वरीय सत्कार्य पार पाडले. या कार्याला श्रीक्षेत्र चिंचाळा, घटाळी, राजगड, ईश्वी, आलेगाव, पातूर, डोणगाव आदी सद्भक्त भाविकांनी अनमोल सहकार्य केले, तसेच उपस्थित आचार्यगणांनी ईश्वरीय तत्वज्ञानाचे व अनन्यभक्तीचे महत्त्व प्रतिपादन केले.

> ### आमदार खरात यांची मंदिराला सदिच्छा भेट
> १० मे रोजी मेहकर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांनी सदिच्छा भेट देऊन त्या ठिकाणच्या स्थानिक अडचणींचा आढावा घेऊन शासकीय निधी अंतर्गत पाणी, वीज, रस्ता आणि मंदिराचे सौंदर्यीकरण करण्याचे आश्वासन दिले.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.793 |
| बेंगलुरु | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.482 |
| पंजाब | 11 | 7 | 3 | 0 | 1 | 15 | +0.376 |
| मुंबई | 12 | 7 | 5 | 0 | 0 | 14 | +1.156 |
| दिल्ली | 11 | 6 | 4 | 0 | 1 | 13 | +0.362 |
| कोलकाता | 12 | 5 | 6 | 0 | 1 | 11 | +0.193 |
| लखनौ | 11 | 5 | 6 | 0 | 0 | 10 | -0.469 |
| हैदराबाद | 11 | 3 | 7 | 0 | 1 | 7 | -1.192 |
| राजस्थान | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.718 |
| चेन्नई | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.992 |

# आयपीएलचे सुधारित वेळापत्रक जाहीर

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी



बीसीसीआयने आयपीएल २०२५ च्या उर्वरित हंगामासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमेवरील तणावामुळे ९ मे २०२५ रोजी आयपीएल स्पर्धा एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली होती. आता, दोन्ही देशांमध्ये तात्पुरता शस्त्रसंधी करार झाल्याने, बीसीसीआयने आयपीएल पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन वेळापत्रकानुसार, हंगाम १७ मे २०२५ पासून पुन्हा सुरू होईल आणि अंतिम सामना ३ जून २०२५ रोजी खेळवला जाईल.या हंगामात एकूण १७ सामने शिल्लक आहेत हे उल्लेखनीय आहे. ज्यामध्ये चार प्लेऑफ सामने देखील समाविष्ट आहेत. या दरम्यान, आयपीएल २०२५ चा पहिला क्वालिफायर सामना २९ मे रोजी खेळला जाईल तर दुसरा एलिमिनेटर सामना ३० मे रोजी खेळला जाईल. तर, दुसरा क्वालिफायर १ जून रोजी खेळवला जाईल. त्यानंतर अंतिम सामना ३ जून रोजी खेळवला जाईल. आयपीएल २०२५ मध्ये आतापर्यंत ५८ सामने खेळले गेले असून, १२ साखळी सामने बाकी आहेत. गुणतालिकेत गुजरात टायटन्स (१६ गुण, +०.७९३ एनआरआर) अव्वल स्थानी आहे, त्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू (१६ गुण, +०.४८२ एनआरआर), पंजाब किंग्स (१५ गुण), मुंबई इंडियन्स (१४ गुण), दिल्ली कॅपिटल्स (१३ गुण), कोलकाता नाइट रायडर्स (११ गुण) आणि लखनऊ सुपर जायंट्स (१० गुण) यांचा क्रमांक लागतो. चेन्नई सुपर किंग्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांना प्ले-ऑफच्या शर्यतीतून बाहेर पडावे लागले आहे.आयपीएल २०२५ पुन्हा सुरू होत असताना, परदेशी खेळाडूंची उपलब्धता हा सर्वात मोठा प्रश्न आहे. अनेक परदेशी खेळाडूंनी सुरक्षा कारणांमुळे मायदेशी परतले आहेत. त्यांना परत आणण्यासाठी संघांना प्रयत्न करावे लागत आहेत. विशेषतः ऑस्ट्रेलियाचे जोश हेजलवूड (आरसीबी) आणि मिचेल स्टार्क (केकेआर) यांच्या परतण्याबाबत अनिश्चितता आहे.

# टीम इंडियाची क्वीन स्मृती मानधना नंबर वन ताजसह मिरविण्याच्या तयारीत

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

श्रीलंकेत नुकत्याच पार पडलेल्या तिरंगी वनडे मालिकेत स्मृती मानधना हिने फायनलमध्ये शतकी खेळी केली होती.या विक्रमी शतकी खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघाने फायनल मारली. याशिवाय हे शतक स्मृती मानधनाच्याही फायद्याचे ठरले आहे. आयसीसीच्या महिला वनडे रँकिंगमध्ये ती आता दुसऱ्या स्थानावर पोहचलीये.तिरंगी वनडे मालिकेतील फायनलमध्ये स्मृती मानधना हिने १०१ चेंडूत ११६ धावांची खेळी केली होती. या कामगिरीसह आयसीसी रँकिंगमध्ये ती ७२७ रेटिंग पॉइंट्स मिळवत दुसऱ्या स्थानी विराजमान झालीये.स्मृती मानधना ही नंबर वनच्या अगदी जवळ असून ती लवकरच हा डाव साध्य करेल, असे दिसते.महिला क्रिकेटमधील वनडेत नंबर वन असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड आणि स्मृती मानधना या दोघींमध्ये फक्त ११ गुणांचे अंतर आहे.
आयसीसीच्या महिला वनडे रँकिंगमध्ये जेमिमा रॉड्रिग्जलाही फायदा झाला आहे. ती पाच स्थानांच्या सुधारनेसह १५ स्थानावर पोहचली आहे.भारताची फिरकीपटू स्नेह राणा हिने देखील रँकिंगमध्ये चार स्थानांच्या सुधारणेसह ३४ व्या स्थानावर झेप घेतलीये.ऑलराउंडर खेळाडूंच्या यादीत दीप्ती शर्मा टॉप ५ मध्ये पोहचली आहे.



# भारतीय महिला संघ लढणार इंग्लंडशी!



नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

भारताचा महिला संघ नुकताच ट्राय सिरीजमध्ये कमालीची कामगिरी केली आणि जेतेपद नावावर केले. भारताच्या संघानं कॅप्टन हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात दमदार कामगिरी केली आणि घरच्या मैदानावर फायनलच्या सामन्यांमध्ये श्रीलंकेला पराभूत केले. यामध्ये भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना सध्या दमदार फॉर्ममध्ये आहे तिने फायनलच्या सामन्यात शतक झळकावले. तर जेमिमा रॉड्रिक्स हिने देखील दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १२३ धावांची खेळी खेळली होती. आता भारताचा संघाचा पुढील सामना इंग्लंडविरुद्ध होणार आहे. भारताचा पुरुष संघ देखील इंग्लड दौऱ्यावर असणार आहे तर महिला संघ इंग्लडविरुद्ध देखील मालिका खेळणार आहे.भारतीय महिला संघ इंग्लंडविरुद्ध दोन मालिका खेळणार आहे. भारताचा संघ पाच सामान्यांची २० मलिका खेळणार आहे. या मालिकेचा पहिला सामना पुढील महिन्यामध्ये २८ जून रोजी खेळवला जाणार आहे. त्यानंतर दुसरा सामना १ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. ४ जुलै रोजी या मालिकेचा तिसरा सामना खेळवला जाणार आहे. मालिकेचा चौथा सामना ९ जुलै रोजी खेळवला जाणार आहे. यावेळी भारताचा पुरुष संघ देखील इंग्लंड दौऱ्यावर असणार आहे. या मालिकेचा शेवटचा सामना १२ जुलै रोजी खेळवला जाणार आहे.
भारताचा महिला संघ इंग्लंड दौऱ्यावर दोन मालिका खेळणार आहे यामध्ये दुसरी मालिका ही एकदिवसीय सामान्यांची असणार आहे. भारताचा संघ इंग्लंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामान्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेचा पहिला सामना १६ जुलै रोजी खेळवला जाणार आहे. भारताच्या संघाने नुकत्याच झालेल्या त्रिकोणी एकदिवसीय मालिकेमध्ये कमालीची कामगिरी केली होती. त्यामुळे इंग्लंड दौऱ्यावर भारतीय महिला संघाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्याचे आयोजन १९ जुलै रोजी करण्यात आले आहे.

# ड्रग्ज प्रकरणानंतर कागिसो रबाडाचे 'कमबॅक'

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

२०२५ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळला जाणार आहे. द. आफ्रिकेने या अंतिम सामन्यासाठी मंगळवारी (दि. १३) १५ सदस्यीय संघ जाहीर केला. संघाचे नेतृत्व टेम्बा बावुमा सोपवण्यात आले आहे. तर डोपिंगमुळे नुकतीच एक महिन्याची बंदी घालण्यात आलेल्या वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाचे संघात पुनरागमन झाले आहे.इंग्लंडमधील ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर फायनचा थरार रंगणार आहे. हा सामना ११ ते १५ जून दरम्यान खेळला जाणार आहे. बावुमाच्या नेतृत्वाखालील द. आफ्रिका संघ जलद गोलंदाजांनी सुसज्ज झाला आहे. १५ खेळाडूंच्या संघात अर्धा डझन वेगवान गोलंदाजांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये दुखापतीतून परतलेल्या लुंगी एनगिडीसह मार्को जॉन्सन, कॉर्बिन बॉश आणि विआन मुल्डर हे वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करताना दिसतील. फिरकी विभागाची धुरा केशव महाराज आणि सेनुरन मुथुस्वामी यांच्याकडे असेल.'द. आफ्रिका संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धे च्या अंतिम सामन्यासाठी पूर्णपणे तयार आहे. संघात कोणतीही कमतरता नाही,' असा विश्वास संघाचे मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी व्यक्त केला आहे.
प्रोटीज संघाने पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या १६ जणांच्या संघात संघात २ बदल केले आहेत. क्वेना म्फाका आणि मॅथ्यू ब्रेट्झके यांना वगळण्यात आले.२०२३-२५ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या चक्रात द. आफ्रिकेने एकूण १२ कसोटी सामने खेळले.

# 'गंभीर' गुरुजींचा 'पॉवर गेम'!

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून कार्यरत असताना माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू ग्रेग चॅपेल यांनी जेव्हा आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना पद सोडावे लागले. अनिल कुंबळे 'सुपरस्टार संस्कृती'मुळे त्रस्त होऊन गेले. मात्र, असं वाटतं की गौतम गंभीर हे भारतीय क्रिकेटमधील असे दुर्मीळ मुख्य प्रशिक्षक आहेत, ज्यांच्याकडे कर्णधारापेक्षा जास्त ताकद आहे.
भारतीय क्रिकेटमध्ये अशी असंख्य उदाहरणे आहेत जेव्हा खेळाडूंच्या ताकदीपुढे मजबूत प्रशिक्षकांनाही माघार घ्यावी लागली होती. बिशन सिंग बेदी, चॅपेल आणि कुंबळे हे स्वतः चॅम्पियन खेळाडू होते, पण त्यांना कधी स्वप्नातही वाटलं नसेल की कोच म्हणून काम करताना त्यांना कर्णधाराच्या सहाय्यकाची भूमिका



बजावावी लागेल.जॉन राईट, गॅरी कर्स्टन आणि रवी शास्त्री यांना हे माहीत होतं आणि ते खूप यशस्वी ठरले. विराट कोहली, रविचंद्रन अश्विन आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीनंतर टेस्ट संघात आता मोठे स्टार खेळाडू उरलेले नाहीत, त्यामुळे गंभीर यांना क्रिकेटच्या पटावर आपले मोहरे मोकळेपणाने चालवण्याची संधी मिळेल. बीसीसीआयच्या सूत्रांनुसार, गंभीर आधीच हे ठरवून आले होते की संघातून स्टार कल्चर संपवायचं आहे. सूत्राने सांगितलं, गौतम गंभीर युगाची सुरुवात आता झाली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या नव्या चक्रात भारताला नवे चेहरे हवेत.सूत्राने सांगितले, संघ व्यवस्थापनातील सर्वांना माहिती होते की टेस्ट फॉरमॅटमध्ये वरिष्ठ खेळाडूंच्या भविष्यासंदर्भात गंभीर काय विचार करतात. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर हेही त्यांच्या मताशी सहमत होते. भारतीय क्रिकेटमध्ये कर्णधार नेहमीच सर्वात प्रभावशाली व्यक्ती राहिले आहेत. सौरव गांगुली, महेंद्रसिंह धोनी, कोहली आणि रोहित हे कर्णधार असताना या सर्वांची संघ निवडीत निर्णायक भूमिका होती. पण गंभीरच्या काळात असं नाही.राहुल द्रविड़ आणि रोहित शर्मांची जोडी जरी थोड्याच काळासाठी होती, तरी ती प्रभावी ठरली. मात्र, रोहित आणि गंभीर यांची जोडी कधीच सहज वाटली नाही. प्रथमच मोठ्या स्टार खेळाडूंच्या एक्झिटमध्ये प्रशिक्षकाची महत्त्वाची भूमिका राहिल्याची जोरदार चर्चा आहे, पण ही ताकद दुधारी तलवार ठरू शकते.
असं समजलं जातं की भारतीय क्रिकेटमधील या बदलाच्या टप्प्यात गंभीर यांना हवं होतं की बॉर्डर-गावसकर ट्रॉफी आणि न्यूझीलंड मालिकेतील अपयशाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांना पूर्ण मोकळीक मिळावी.

## जिओमार्टचा लवकर 'क्यू-कॉमर्स'मध्ये प्रवेश




मुंबईः रिलायन्स रिटेलचे अंग असलेल्या जिओमार्ट त्याच्या सध्या अस्तित्व नसलेल्या क्षेत्रांमध्ये त्याचे वितरण जाळे मजबूत करण्यासाठी 'डार्क स्टोअर' विभागात प्रवेशाचा विचार करत असून, लवकर द्रुत व्यापारावर (क्यू-कॉमर्स) लक्ष केंद्रित करण्याचे कंपनीने सूचित केले.
कपड्यांपासून ते सौंदर्य आणि जीवनशैलीच्या वस्तूंपर्यंत उत्पादनांच्या विक्रीत असलेल्या जिओमार्टचा एक अंतर्गत संघ डार्क स्टोअर्सच्या प्रांगणात प्रवेशासाठी पर्यायांचे मूल्यांकन करत आहोत, असे 'फिजिटल रिटेल कन्व्हेन्शन'च्या निमित्ताने एक चर्चेत जिओमार्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप वरगंटी यांनी सांगितले. किराणा दुकानांद्वारे व्यवसायाची उपस्थिती १,००० शहरांमध्ये असली तरी, काही क्षेत्रे अजूनही वंचित आहेत. त्यामुळे जिओमार्ट नफ्यावर लक्ष केंद्रित करून स्वतःची द्रुत व्यापार सेवा देखील सक्रियपणे विकसित करू पाहात आहे. डार्क स्टोअरसारख्या महागड्या पायाभूत सुविधांमुळे हे द्रुत व्यापार अजूनही तोट्यात आहे. तथापि हा मार्ग निश्चितपणे अनुसरताना, आम्ही हा व्यवसाय फायदेशीर देखील करून दाखविणार आहोत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.भारताच्या क्यू-कॉमर्स क्षेत्रात , , आणि यांसारख्या मोठ्या ब्रँड्सनी मोठी गुंतवणूक केली असली, तरी 'डार्क स्टोअर्स' आणि वितरणासाठी लागणाऱ्या महागड्या पायाभूत सुविधांमुळे हे मॉडेल अजूनही तोट्यात आहे.

# ट्रम्प प्रशासनाकडून औषध उत्पादकांवर नवीन घाव

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

### किमतीत कपातीसाठी ३० दिवसांची अंतिम मुदत

अमेरिकी अध्यक्ष अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषध उत्पादकांना औषधांच्या किमती कमी करण्यासाठी ३० दिवसांची अंतिम मुदत देणाऱ्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी लवकरच केली जाणार असल्याचे संकेत दिले. अमेरिकेला निर्यात करणाऱ्या भारतीय औषध निर्मात्या कंपन्यांच्या समभागांत सोमवारी शेअर बाजारात याचे नकारात्मक प्रतिबिंब उमटले.
अमेरिकेचे सरकार दरवर्षी आरोग्यनिगेच्या 'मेडिकेअर' योजनेद्वारे निर्देशित (प्रिस्क्रिप्शन) औषधे, इंजेक्शनेबल, रक्तसंक्रमण आणि इतर औषधांवर शेकडो अब्ज डॉलरचा खर्च करते, ज्याचा लाभ जवळजवळ ७० दशलक्ष वृद्ध अमेरिकी लोकांना होत आहे. इतर मोठ्या आणि



श्रीमंत देशांच्या तुलनेत अमेरिका नियमितपणे औषधांच्या किमतींवर जास्त खर्च करते. ही दीर्घकाळापासून सुरू असलेली एक समस्या आहे जी संतापजनकही आहे, परंतु यावर अमेरिकी काँग्रेसला कधीही कायमस्वरूपी उपाय काढता आलेला नाही, असे ट्रम्प यांनी रविवारी संध्याकाळी समाजमाध्यमावरील टिप्पणीत नमूद करताना कार्यकारी आदेशाचे सूतोवाच केले.कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली जाण्यापूर्वी व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, या आदेशापूर्वी रॉबर्ट एफ. केनेडी ज्युनियर यांच्या नेतृत्वाखालील आरोग्य विभागाकडून औषधांसाठी नवीन किंमत निर्धारीत करण्यासाठी मध्यस्थी केली जाईल. जर सर्वसहमतीने करार झाला नाही, तर एक नवीन नियम लागू होईल, तो म्हणजे अमेरिका औषधांसाठी जी किंमत देते ती इतर देशांकडून त्याच औषधांसाठी मोजल्या जाणाऱ्या किमतीपेक्षा कमी असेल.आपल्या देशाला अखेर न्याय दिला जाईल आणि आपल्या नागरिकांच्या आरोग्यसेवेचा खर्च यापूर्वी कधीही, कोणीही विचार केला नसेल अशा लक्षणीय स्वरूपात कमी केला जाईल, असे ट्रम्प यांनी टिप्पणीत दावा केला.देशातील आघाडीच्या औषधनिर्मात्या गटाने मात्र ट्रम्प यांचे हे पाऊल अमेरिकन रुग्णांसाठी 'अनिष्ट' ठरेल असा इशारा दिला. औषध उत्पादकांच्या नफ्याला कोणताही धोका हा नवीन औषधे विकसित करण्यासाठी होत असलेल्या संशोधनावर परिणाम करणारा ठरेल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.
परदेशांतील किमतींवर आधारीत औषधांची आयात केली गेल्याने 'मेडिकेअर'वरील अब्जावधी डॉलरचा खर्च कमी होईल, किंवा ते रुग्णांना मदतकारक ठरेल अथवा औषधांची उपलब्धता सुधारेल याची कोणतीही हमी नाही, असे पीएचआरएमएचे अध्यक्ष स्टीफन जे. उबल यांनी एका निवेदनाद्वारे स्पष्ट केले.

# 'मारूती'ची लोकप्रिय छोटी वाहनेही आता सुरक्षित

नवी दिल्ली : दि. १३ प्रतिनिधी

वॅगन आर, अल्टो के, सेलेरिया आणि इको या मोटारींमध्ये आता सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून सहा एअरबॅग देण्याची घोषणा मारूती सुझुकी इंडियाने सोमवारी केली. हॅचबॅक, कॉम्पॅक्ट कारसारखी छोट्या मोटारी सामान्यतः मोठ्या मोटारींपेक्षा सुरक्षित मानली जातात. कारण त्यांचे वजन कमी असल्याने, अपघात झाल्यास त्यांना कमी नुकसान होण्याची शक्यता असते. परंतु रस्तावरील इतर मोठ्या वाहनांशी तुलना केल्यास, या छोट्या मोटारींमध्ये सुरक्षा वैशिष्ट्ये पुरेशी नसतात. ही उणीव भरून काढण्यासाठी मारुती सुझुकीने पाऊल टाकले आहे.
ग्राहकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन हे पाऊल उचलण्यात आल्याचे कंपनीने म्हटले आहे. याबाबत कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी पार्थो बॅनर्जी म्हणाले की, देशात रस्त्यांसह इतर पायाभूत सुविधांचा वेगाने विकास




होत आहे. त्यात द्रुतगती महामार्गांचा समावेश आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या उपाययोजनांमध्ये आणखी वाढ करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यातून कंपनीने वॅगन आर, अल्टो के, सेलेरियो आणि इको या मोटारींमध्ये सहा एअरबॅग देण्याचा निर्णय घेतला आहे. यातून ग्राहकांचा प्रवास सुरक्षित होण्यास मदत होईल.छोटेखानी श्रेणीतील मारूती सुझुकीच्या या मोटारींची लोकप्रियता खूप आहे. त्यामुळे त्यांची सुरक्षितता वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. चालकासह एकूणच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कंपनीकडून उपाययोजना राबविण्यात येत आहेत,

# हार्डवेअर इंजिनिअरिंगकडे तरुणींचा वाढता कल; नोकरीच्या अर्जांमध्ये २६ टक्क्यांनी वाढ

नवी दिल्ली : दि.१३ प्रतिनिधी

हार्डवेअर इंजिनिअरिंग उद्योगाकडे तरुणींच्या ओढा वाढू लागला असून, गेल्या वर्षी या उद्योगातील नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या तरुणींच्या संख्येत २६ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. पुरूषांची मक्तेदारी असलेल्या या क्षेत्रात आता महिलांची संख्या वाढत असल्याचे सकारात्मक चित्र आहे.
तंत्रज्ञानाधारित मनुष्यबळ सेवा मंच असलेल्या 'वर्कइंडिया'ने हा अहवाल सोमवारी जाहीर केला. अहवालानुसार, हार्डवेअर इंजिनिअरिंग क्षेत्रात नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या तरूणांच्या संख्येत २०२३ च्या तुलनेत १९ टक्के वाढ झाली. याचवेळी अर्ज करणाऱ्या तरुणींच्या संख्येत २६ टक्के वाढ झाली आहे. ही वाढ केवळ संख्यात्मक नसून, ती



वाढत्या कलाचीही निदर्शक आहे. भारतीय तंत्रज्ञान उद्योगातील बदलते चित्र यातून समोर येते.
पुरूषांची मक्तेदारी मानल्या जाणाऱ्या या क्षेत्रात आता महिलांचे प्रमाण वाढू लागला आहे. यातून अभियांत्रिकीच्या बदलणारी पुढील दिशा दिसून येत आहे.तांत्रिक आणि प्राथमिक स्वरूपाच्या आणि तंत्रकुशल स्वरूपाच्या नोकऱ्यांसाठी २०२३ आणि २०२४ मध्ये 'वर्कइंडिया'च्या मंचावर ३३.४६ लाख अर्ज आले. यात महिलांचे प्रमाण वाढण्यामागे प्रामुख्याने अर्धवेळ कामाच्या प्रकारात झालेली वाढ कारणीभूत ठरली आहे.
छोट्या शहरांमध्ये यात वाढ होताना दिसून येत आहे. हार्डवेअर इंजिनिअरिंगशी निगडित रोजगार मात्र मोठ्या शहरांमध्ये वाढत आहेत. या बड्या शहरांतील रोजगारांमध्ये ३० टक्के वाढ झालेली आहे, असे अहवालाने नमूद केले आहे.

**थोडक्यात**

### ब्रेकअप केल्याने मैत्रिणीचे घर पेटविले

**नागपूर :** ब्रेकअप केल्याच्या संतापातून एकाने मैत्रिणीचे घर पेटवून दिल्याची घटना कर्नलबाग परिसरात घडली आहे. गणेशपेठ पोलिसांनी गुन्हा दाखल करत झिशान निसार खान याला अटक केली आहे. माहितीनुसार, सदर तरुणी सुमारे १० वर्षांआधी १३ वर्षांची असताना दोघांची ओळख झाली होती. त्यानंतर झिशान याने तिला कथितरित्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. काही दिवसांपूर्वी त्याने तिला दुचाकीवरून वाठोडा येथे नेले होते तसेच, एका मैदानात बांधलेल्या बंद खोलीत त्याने तिच्यावर अत्याचार केला होता. याच रागातून मुलीने त्याच्याशी बोलणे बंद केले मात्र, तो तिला मोबाईल संदेश पाठवत होता. त्यानंतर तिने त्याच्याशी बोलणे सुरू करताच त्याने मनीषनगर येथील एका हॉटेलात नेत तिच्यावर पुन्हा अत्याचार केला. असे प्रकार वारंवार घडत राहिल्याने तसेच मारहाणीला कंटाळून तिने त्याच्याशी बोलणे बंद केले. यातून पुढील घटना घडल्याचे सांगण्यात येते.

### आरोग्य विभागातर्फे सोशल मीडियातून जनजागृती

**नागपूर:**आरोग्यविषयक माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविणे, त्यांच्यात आरोग्यविषयक सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या हेतूने समाज माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते मागील दिवसांत सोशल मीडिया बार कोडचे अनावरण करण्यात आले. राज्य शासनस्तरावरून आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग महाराष्ट्र राज्यामार्फत शासनाच्या विविध योजनांची माहिती विविध सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यात येते. आरोग्य शिक्षणासंबंधी सूचना, विविध योजना, डू ॲार डोन्ट आदी माहिती जनतेपर्यंत पोहेचविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत , जिल्हा माता संगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाअंतर्गत फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप, यूट्युब,एक्स (ट्विटर), टेलीग्राम, लिंक्ड इन,पब्लिक ॲप तयार करण्यात आले आहे.

### निसर्गोपचार तज्ज्ञाला फसविले

**नागपूर :** लष्करी अधिकाऱ्याचा बनाव करत जवळपास दीडशे सैनिकांवर निसर्गोपचार आणि त्याचे प्रशिक्षण देण्याचा बहाणा करून ज्येष्ठ निसर्गोपचारतज्ज्ञ डॉ. धनलाल शेंदरे यांना तब्बल १ लाख ६० हजार रुपयांनी गंडविण्यात आले. डॉ. शेंदरे हे राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा परिषद, नवी दिल्लीचे सदस्य आहेत. याशिवाय शहरात त्यांची निसर्गोपचार प्रशिक्षण संस्थासह उपचार केंद्र सुद्धा आहे. निसर्गोपचाराच्या प्रचारासाठी विविध ठिकाणी ते नि:शुल्क शिबिरे घेत असतात. दोन दिवसांपूर्वी एकाने कामठी येथील लष्करी छावणीतून बोलत मोबाइलवर संपर्क करून सांगितले तब्बल दीडशे सैनिकांना निसर्गोपचार आणि प्रशिक्षण हवे असल्याचे सांगून प्रक्रिया सांगण्याची विनंती केली. मागील पुढील प्रक्रिया जाणून घेण्याच्या बहाण्यात गुंतवून ठेवत डॉ. शेंदरे यांना १ लाख ६० हजार रुपयांनी हातोहात फसविले यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

# इच्छुकांनी झटकला आळस, अप्रत्यक्ष प्रचारही सुरु

## महानगरपालिका, जि.प. निवडणुकीचा अंदाज घेत सोशल मीडियावर पोस्टरबाजी सुरू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि. १३ :** सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे दुसरीकडे माजी नगरसेवक निद्रितावस्थेतून बाहेर आले असून, अन्य इच्छुकांनीही आपण निवडणूक लढवणार असल्याची सोशल मीडियावर पोस्टरबाजी सुरू केली आहे.

महाराष्ट्रात मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. यात महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर पालिका, नगर पंचायतींचा समावेश होतो. मागच्यावर्षी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. मोदी सरकार तिसऱ्यांदा केंद्रातील सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्रातही महायुती सरकारने सत्ता हस्तगत केली यानंतर राज्यात सर्वच पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घेण्याच्या मागणीसह तयारीसुद्धा सुरू केली. अशातच मागील सोमवारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. तसेच, विशिष्ट प्रकरणात वेळ वाढवून मागण्याची मुभा असेल, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

याशिवाय ओबीसी आरक्षणाबाबत न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचेही आदेश दिले. त्यामुळे राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबर महिन्यापर्यंत राज्यातील सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायतींच्या निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला आहे.

**नवा जोर संचारला**

शेवटी निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे माजी नगरसेवकांसह इच्छुकांच्याही आशा उंचावल्या आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर संबंधितांमध्ये उत्साह संचारला असून, ते नव्या जोमाने सक्रिय झाले आहेत. काही इच्छुकांनी तर प्रभागाचे क्रमांक टाकून आपण 'प्रशासक राज' मध्ये केलेल्या कामांच्या माहितीचे बॅनर झळकविले आहेत. काहींनी सोशल मीडियावर संबंधित माहिती टाकून आपला प्रचार अप्रत्यक्षरित्या सुरू केल्याचे दिसून येते.

**खर्चच खर्च**

सुमारे तीन वर्षांपासून अर्थात २०२२ पासून नागपूर महानगरपालिकेची निवडणूक झालेली नाही. मात्र, या काळात निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते, अशी स्थिती दोन-तीनदा निर्माण झाली होती त्यामुळे इच्छुकांना सतत मतदारसंघात गणपती, देवी, विविध जयंती, पुण्यतिथी, धार्मिक अशा उत्सवांच्या निमित्ताने आपली तयारी सुरू ठेवावी लागली. सोहळ्यांसाठी महाप्रसाद वितरित करण्यात काहींनी लाखो रुपये खर्च केले आहेत आता लवकरच निवडणूक होणार असल्यामुळे संबंधितांना नक्कीच दिलासा मिळाला असल्याचे राजकीय जाणकार सांगतात.



**दिल्ली अब बहोत...**

**काही कार्यकर्ते वर्षभर नागरिकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करीत असतात. ते काहीसे लोकांच्या नजरेसमोर असतात माजी नगरसेवकांपैकी अनेकजण निद्रिस्त अवस्थेत होते आता निवडणूक होण्याचे संकेत मिळताच त्यांच्यासोबतच अन्य चमकोगिरी करणारेही अचानक सक्रिय झाले आहेत. प्रभागातील रस्ते, नाल्या, कचरा आदीसंबंधी समस्यांकडे त्यांनी अचानक लक्ष केंद्रित केले आहे. मनपा निवडणुकीची 'दिल्ली अब बहोत दूर' नसल्याने कार्यकर्त्यांसह आपल्या पक्षाआधी स्वत:ला सोशल मीडियातून 'प्रोजेक्ट' करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे**

---

# नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने दिला मुसळधार पावसाचा इशारा

## बुधवार आणि गुरुवारी विदर्भाला 'ऑरेंज अलर्ट'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १३ :** नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने मुसळधार पावसाचा इशारा दिला असून, येत्या बुधवार आणि गुरुवारी विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे.

राज्यातील हवामानात अनपेक्षित असे बदल घडून येत आहेत. यंदा उन्हाळ्याची सुरुवात अपेक्षेपेक्षा लवकर म्हणजे महिनाभर आधी झाली. त्यानंतर मार्च महिन्यातच उष्णतेच्या लाटा येऊन गेल्या आणि आता तापमान सर्वोच्च पातळीवर असण्याची वेळ असताना अवकाळी पावसाचा मारा सुरू झाला आहे.

मे महिन्यात विदर्भात उत्तरेकडून पश्चिमेकडे उष्ण वारे वाहतात. मागील चार ते पाच दिवसांपासून मात्र वाऱ्याची दिशा बदललेली आहे आणि वेग देखील वाढलेला आहे. त्यामुळे वातावरणात पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. मागील आठवड्यात विदर्भात गारपिटीसह पावसाने हजेरी लावली असून, आताही पावसाचे सावट कायम आहे. विदर्भातील काही जिल्ह्यात चार ते पाच दिवसांपासून विजेच्या कडकडासह तुरळक आणि सामान्य पावसाची नोंद झालेली आहे. ढगांची दाटी पुढील दोन दिवस विदर्भात आकाशात ढग दाटलेली असतील. बुधवारी आणि गुरुवारी काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची दाट शक्यता असल्यामुळे हवामान विभागाकडून 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. मुख्यत्वे गडचिरोली, यवतमाळ, भंडारा, गोंदिया जिल्ह्याचा समावेश आहे. मे महिन्यात नागपूर आणि विदर्भात उच्चांकी तापमान असतानाच मुसळधार पावसाची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

### माजी मंत्री मुळक यांचा जनता दरबार

**नागपूर :** माजी मंत्री राजेंद्र मुळक यांचा देवलापार, रामटेक, पारशिवनी, कन्हान येथील जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार पार पडला. यावेळी

जनसामान्यांचे प्रश्न सोडवणार असल्याची ग्वाही देण्यात आली

माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी सोमवारी देवलापार, रामटेक, पारशिवनी, कन्हान येथील जनसंपर्क कार्यालयात बुद्ध पौर्णिमेनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच, नागरिकांसोबत संवाद साधला. प्रत्येक नागरिकाची समस्या गांभीर्याने ऐकून संबंधित विभागांना तत्काळ कार्यवाहीसाठी सूचना दिल्या. तसेच, उपस्थितांकडून आलेली निवेदने स्वीकारत त्यांच्या प्रश्नांवर लवकरच तोडगा काढण्याची ग्वाही त्यांनी दिली. जनता दरबाराच्या माध्यमातून भविष्यातही जनतेच्या हितासाठी कार्यरत राहू, असा विश्वास ज्येष्ठ नेते मुळक यांनी व्यक्त केला.

# दहशतवाद आणि त्यांना पोसणारे आका आता वेगळे नाही

## तेव्हाची मागणी आता भारताची अधिकृत भूमिका : मुख्यमंत्री

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १३ :** दहशतवाद आणि त्यांना पोसणारे आका अर्थात तेथील सरकार यांना वेगळे मानू नका, अशी मागणी जगापुढे केली होती. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात भारताने ती आपली अधिकृत भूमिका म्हणून जाहीर केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रात्री देशाला संबोधित केल्यानंतर नागपूर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीन 'न्यू नॉर्मल'सांगितले. कुठलीही दहशतवादी कारवाई हा भारतावरील हल्ला मानण्यात येईल आणि त्याला तितकेच ठोस उत्तर दिले जाईल. कोणतेही 'न्यूक्लिअर ब्लॅकमेल' आम्ही कदापिही सहन करणार नाही. तसेच, दहशतवादी आणि त्यांना पोसणारे आका म्हणजे पाकिस्तानचे सरकार यांना वेगळे पाहणार नाही. या तिन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण दरवेळी दहशतवादी हल्ला झाला की, पाकिस्तानचे सरकार आमचा दहशतवादाशी काही संबंध नाही, असा जगासमोर कांगावा करीत होते. आता तसे होणार नाही. आज भारताने आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे जगापुढे मांडली आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. भारताने पंजाब प्रांतांत धडक देत कशाप्रकारे ऑपरेशन केले, हेही पंतप्रधानांनी सांगितले. पाकिस्तानने घाबरुन भारताला फोन केला आणि शस्त्रसंधी मागितली, हेही त्यांनी नमुद केले.

---

# मनपा झोनमध्ये अनुसयाबाई काळे समुपदेशन केंद्र सुरु

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** शहरातील महिला व बालकांवरील अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी आणि कौटुंबिक कलह मिटविण्यासाठी महापालिकेने प्रत्येक झोनमध्ये स्व. अनुसयाबाई काळे समुपदेशन केंद्र सुरू केले आहे. एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या काळात समुपदेशन केंद्रामध्ये १ हजार ४३ प्रकरणांची नोंद झाली आहे.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात झोननिहाय समुपदेशन केंद्र सुरू करण्याचा मानस व्यक्त केला आहे. महिलांनी स्वावलंबी व्हावे आणि घरातील कलह काहीसे दूर व्हावे, हा या संकल्पनेमागील मुख्य उद्देश आहे. प्रत्येक झोनमध्ये स्व. अनुसयाबाई काळे समुपदेशन केंद्र स्थापन केले आहे. अनेक महिलांना न्याय देण्यास तसेच कौटुंबिक कलह कमी करण्यात यश आले आहे.

झोननिहाय कार्यरत समुपदेशन केंद्र असे आहेत. लक्ष्मीनगर झोन रेखा बाराहाते संपर्क ९४२२१०१४४७, धरमपेठ नंदा कोल्हटकर ९३२५०४७२०८, हनुमाननगर झोन हेमा धुर्वे ९९२३४५८८४७, धंतोली झोन करुणा चिमणकर ९४२०२५३६६७, नेहरुनगर शालिनी सक्सेना ९३७१४१२८६८, गांधीबाग झोन मंगला महाजन ७७१९८९७५२८७,सतरंजीपुरा झोन कल्पना फुलबांधे ७०३८२५५१४०, लकडगंज मंजूषा हेमराज ९६६५५११३४५९,आशीनगर रुपाली पराते ९७६३७११०५१ आणि मंगळवारी ताराचंद कांबळे ९०९६०५०५३२.

# आयआयएममधील यशाबद्दल विश्वास कांबळेंचे अभिनंदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि. १३ :** आयआयएम नागपूर आयोजित नवव्या दीक्षान्त समारंभातील सन्मानाबद्दल विश्वास मोरेश्वरराव कांबळे यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

विश्वास कांबळे मूळ पिंपळगाव (लुटे) तालुका देवळी (जि. वर्धा) येथील असून, त्यांनी एमबीए ही पदवी आयआयएम नागपूर येथून प्राप्त केली आहे मागील रविवारी पार पडलेल्या नवव्या दीक्षान्त समारंभात त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कुटुंबासाठी हा अतिशय आनंदाचा क्षण असून, आपल्या यशात डॉ. उज्वला कांबळे (भितकर), डॉ. प्रवीण कांबळे, स्वाती कांबळे, डॉ. रॉली कांबळे, सिद्धांत भितकर यांचा महत्त्वाचा वाटा असल्याची भावना व्यक्त केली तसेच, त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आईवडील आणि पत्नी यांना दिले. ते माजी जिल्हा परिषद सदस्य इंदुताई कांबळे यांचे चिरंजीव आहेत.

# प्रहार मिलिटरी स्कूलचा १०० टक्के निकाल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावीचा निकाल आज जाहीर झाला असून, प्रहार मिलिटरी स्कूल, नागपूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय यश संपादन केले आहे. यंदाही शाळेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

'प्रहार'मधील कार्तिक बोराडे याने ९२.८० टक्के मिळविले असून, जितेश आमने याने ८४.८० टक्के प्राप्त केले. चैतन्य सहारे याने ८१.२० टक्के,

आर्य कीर्तीवार ७७.६० टक्के, तर रोहन श्रीरामे याने ७६.८० टक्के गुणांची प्राप्ती केली आहे

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष ॲड. अशोक बनसोड, उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, सचिव विजय कागभट, मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. या यशामागे आमच्या विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचा आधार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांचे यश अधिक गौरवास्पद आहे. शाळेतील यशाबद्दल संपूर्ण प्रहार कुटुंब आनंदित असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा, अशा भावना मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या.

---

# 'ॲग्रिस्टॅक' साठी शेतकऱ्यांची १०० टक्के नोंदणी व्हावी

## खरीप हंगाम आढावा बैठकीत निर्देश, विविध कामांसाठी निधी उपलब्धतेची दिली ग्वाही

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १३ :** विविध योजना जलद व परिणामकारकरित्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचाव्यात यासाठी 'ॲग्रिस्टॅक' ही केंद्र शासनाची योजना प्राधान्याने हाती घेतली. या योजनेंतर्गत येत्या ३१ मेपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांची नोंदणी संबंधित यंत्रणेने पूर्ण करावी. या कामात टाळाटाळ करणाऱ्या संबंधित तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार व त्यांच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीयस्तरावरील जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारामहसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

नागपूर जिल्ह्याच्या खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते वित्त व कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंग ठाकूर, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासनाशी संबंधित असलेल्या प्रत्येक घटकांचे जीवनमान अधिक सुखकर व्हावे, पात्र असलेल्या लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा पारदर्शक लाभ मिळावा यासाठी शासन मोठ्या प्रमाणात एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत आहे. कृषी क्षेत्राच्या अनेक योजनात नव्याने इतर योजनांची भर पडली आहे. या योजनांसाठी प्राधान्यक्रम हा 'ॲग्रिस्टॅक'साठी नोंदणीकृत शेतकऱ्यांना राहणार आहे. सदर योजनेसाठी नोंदणीच केली नसल्याने त्यांना योजनेचा लाभ मिळणार कसा, असा प्रश्न पालकमंत्री बावनकुळे यांनी उपस्थित केला.

ग्रामसभेची रेकॉर्डिंग अनिवार्य प्रत्येक ग्रामपंचायतीमधील ग्रामसभेचे ऑनलाईन रेकॉर्डिंग झाले पाहिजे. ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या कृषी क्षेत्राबाबत गावपातळीवर नियोजन व जागरुकता यातून शक्य होईल. प्रत्येक ग्रामसभेस गावासाठी नेमलेल्या कृषी सहाय्यक अथवा कृषी पर्यवेक्षकाची उपस्थिती असलीच पाहिजे. यातून पात्र लाभार्थ्यांना योजनेचे मोल कळेल,असे पालकमंत्र्यांनी सांगितले. ग्रामसभेच्या रेकॉर्डिंग साहित्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वेळप्रसंगी निधी उपलब्ध होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

चारा लागवडीसाठी लवकरच निर्णय महसूल अंतर्गत शासकीय पडीत जमिनीची धूप थांबावी व यातून पशुधनाला चारा मिळावा या उद्देशाने पशुचाऱ्यांची लागवड करण्याबाबत लवकरच शासन निर्णय घेऊ, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले. पशु चाऱ्याची लागवड ही मनरेगा अंतर्गत केली जाईल. यातून त्या-त्या गावातील पशुधनाला चारा मिळण्यासह संबंधित ग्रामपंचायतींना यातून आर्थिक हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**कृषी योजनांबाबत रोडमॅप**

खरीप हंगामाचे नियोजन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे.या नियोजनासमवेतच जिल्ह्यातील आदिवासीबहुल भागातील शेतकरी, त्यांच्यासाठीच्या योजना, जिल्ह्यातील उत्पादित कृषिमालाला बाजारपेठ, पीक नियोजनात करावा लागणारा बदल यादृष्टीनेही व्यापक रोडमॅपची गरज असल्याचे राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले.

**बैठकीतून कृषिमंत्र्यांशी थेट संपर्क**

- **ग्रामीण भागात तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक अशी शासनाची भक्कम यंत्रणा आहे. प्रत्येक तालुक्यात 'ॲग्रिस्टॅक' चे काम कोणत्याही स्थितीत महिनाअखेर पूर्ण केले पाहिजे. शेतक यांना अधिक चांगल्या पद्धतीने विविध शासनांचा लाभ पोहचविणा या योजनेलाच दिरंगाई होत असेल तर वेतनवाढी थांबवू, असा इशारा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिला. पालकमंत्री बावनकुळे यांनी 'ॲग्रिस्टॅक' योजनेबाबत आढावा घेताना मंत्री कोकाटे यांच्याशी फोनवर थेट संपर्क साधून चर्चा केली. फोनवरच त्यांनी बैठकीत भाग घेऊन कृषी अधिका यांना स्पष्ट सूचना दिल्या.**




अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, बुधवार, दि. १४ मे २०२५






मंगळवारी दहावीचा निकाल जाहीर झाला असून, यामध्ये मुलींनीच बाजी मारल्याचे चित्र दिसून आले. शहरातील बाल शिवाजी माध्यमिक शाळेतील मुलींनी अशाप्रकारे आनंद व्यक्त केला. ( छाया. संजय ताथुरकर )

# दहावीतही मुलींचाच डंका ; जिल्ह्याचा निकाल ८९.३५ टक्के

## यंदाही पातूर तालुका अव्वल तर अकोट तालुका सर्वात कमी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा शालांत परीक्षेचा दहावीचा निकाल घोषित झाला असून, बारावीच्या पाठोपाठ दहावीच्या परीक्षेतही जिल्ह्यात मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्याचा निकाल ८९.३५ टक्के लागला असून, जिल्ह्यात पातूर तालुक्याचा निकाल सर्वाधिक तर अकोट तालुक्याचा निकाल सर्वात कमी लागला आहे. जिल्ह्यातून दहावीच्या परीक्षेला बसलेल्या एकूण ११ हजार ९८२ मुलींपैकी ११ हजार २५१ मुली उत्तीर्ण झाल्या, तर १३ हजार २४७ मुलांपैकी ११ हजार २९३ मुले उत्तीर्ण झाले आहेत.

या परीक्षेसाठी जिल्ह्यातून २५ हजार २२९ नियमित विद्यार्थी तर ४७२ रिपिटर असे एकूण २५ हजार ७०१ विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा निकाल दुपारी १ वाजता शिक्षण मंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. त्यानुसार जिल्ह्याचा निकाल ८९.३५ टक्के लागला आहे. परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या एकूण मुलांपैकी उत्तीर्ण झालेल्या मुलांची टक्केवारी ८९.३५ तर मुलींची टक्केवारी ९३.५७ आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे यावर्षीसुद्धा निकालात मुलींनीच बाजी मारल्याचे दिसून आले. नियमितचे २२ हजार ५४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातील २५ हजार ४४८ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २५ हजार २२९ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी २२ हजार ५४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याची टक्केवारी ८९.३५ टक्के आहे.

### अकोला जिल्हा विभागात सर्वात शेवटी

दहावीच्या परीक्षेत अमरावती विभागाचा निकाल ९२.९५ टक्के लागला. त्यात बुलडाणा जिल्ह्याचा निकाल सर्वाधिक ९५.५२ टक्के तर त्या खालोखाल वाशिम जिल्ह्याचा निकाल ९५.४१, अमरावती जिल्ह्याचा निकाल ९२.८६, यवतमाळ जिल्ह्याचा निकाल ९१.५१ तर अकोला जिल्ह्याचा निकाल सर्वात कमी ८९.३५ टक्के लागला आहे.

### तालुकानिहाय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी

| तालुका | मुलं | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| बाळापूर | १३६९ | १४४५ | २८१४ |
| अकोला | ४३८९ | ४२८८ | ८६७७ |
| पातूर | १०९८ | ९४९ | २०४७ |
| मूर्तिजापूर | १०३६ | ९७५ | २०११ |
| अकोट | १४९८ | १५६२ | ३०६० |
| तेल्हारा | १००९ | ११३६ | २१४५ |
| बार्शीटाकळी | ८९४ | ८९६ | १७९० |

### पातूर पुन्हा अव्वल

जिल्ह्यातील सात तालुक्यांपैकी पातूर तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९४.४९ टक्के लागला. त्यानंतर अकोला तालुक्याचा ८७.१८, बार्शीटाकळी तालुक्याचा ८६.७९, मूर्तिजापूर तालुक्याचा ८३.५४, बाळापूर तालुक्याचा ८१.५८, तेल्हारा तालुक्याचा ८१.५० व अकोट तालुक्याचा निकाल सर्वात कमी म्हणजेच ८०.३२ टक्के लागला.

### खासगी विद्यार्थ्यांचा निकाल ७४.०७ टक्के

दहावीच्या परीक्षेत १७ क्रमांकाचा अर्ज भरुन ८१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ६० विद्यार्थी पास झाले. त्यामुळे खासगी विद्यार्थ्यांचा निकाल ७४.०७ टक्के लागला.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गौरीची भरारी



अकोला: आई व वडील शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, याची जाणीव ठेवून अतिशय हलाकीच्या परिस्थितीवर मात करीत दोनवाडा येथील गौरी प्रमोद भटकर या विद्यार्थिनीने अकोला येथील मनुताई कन्या शाळेतून इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८९.४० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. अकोला शहरापासून वीस किमी अंतरावर असलेल्या दोनवाडा येथे दोन खोल्यांच्या छोट्या घरात राहून आपले आई व वडील शेतमजुरी करतात, याची जाणीव ठेवत शिक्षणाची आवड असणाऱ्या गौरीने अकोला गाठले. अकोल्यात वसतिगृहात राहून शहरातील सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षण देणाऱ्या मनुताई कन्या शाळेत प्रवेश घेतला. गौरीची शिक्षणाविषयी असलेली आवड, तिची शिस्त व परिश्रम घेण्याची उर्मी पाहून शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांनी अतिरिक्त तासिकांमध्ये तिच्याकडून परीक्षेची तयारी करून घेतली. आई-वडिलांची मुलीच्या शिक्षणासाठी कष्ट करण्याची तयारी पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो. उपाशी राहलो तरी चालेल माझी मुलगी शिकली पाहिजे, अशी आई-वडिलांची इच्छा गौरीने पूर्ण केली आहे. आठवीतील शिष्यवृती परीक्षेतही गौरी भटकर गुणवत्ता यादीत झळकली होती, असे मनुताई कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका ऐश्वर्या धाडसकर यांनी सांगितले.



अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, बुधवार दि.१४ मे २०२५ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### सर्क्युलर रस्त्यावरील फायनान्स कंपनीच्या कार्यालयाला आग

**बुलडाणा :** शहरातील सर्क्युलर रस्त्यावरील मोतीलाल ओसवाल फायनान्सच्या कार्यालयाला शनिवारी पहाटे अचानक आग लागली. काही क्षणातच संपूर्ण कार्यालयाने पेट घेतल्याने लाखोंचे- साहित्या जळून खाक झाले. सदर घटनेची माहिती मिळताच बुलढाणा - नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी - तत्काळ कारवाई करत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत केले. स्थानिक नागरिकांनीही धाडसाने मदत केली. मृत्यूंजय गायकवाड, दीपक तुपकर, सागर घट्टे, संदीप शेवाळे, बाळासाहेब धूड, आकाश दळवी आदींनीही आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मदत केली. दरम्यान, आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. याप्रकरणी पोलीस व अग्निशमन विभागाकडून तपास सुरू आहे.

### साखरखेर्डा येथील जिजामाता विद्यालयाचा १०० टक्के निकाल

साखरखेर्डा : १० वीच्या निकालाची परंपरा कायम राखत याहीवर्षी जिजामाता विद्यालयाने १०० टक्के निकाल देत गुणवत्तेचा परिचय करून दिला आहे. साखरखेर्डा येथील जिजामाता विद्यालय गेल्या अनेक वर्षांपासून आपली गुणवत्ता टिकवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. आज १० वीच्या निकाल जाहीर झाला असता यातही मुलींनी बाजी मारली. संस्कृती विजय गवई हिने ९५:२० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. तर संदीप दत्तात्रय खरात यानेही ९५:२० गुण मिळवून प्रथम आला आहे . मयुर सुभाष पंजरकर याने ९५ टक्के गुण मिळवून द्वितीय तर समृद्धी भरत आंधळे ९४:४० , तनुजा शिवाजी ठोसरे ९४:२० , तेजस कुवरसिंग चव्हाण ९४:०० गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत . जिजामाता विद्यालयातून ११४ विद्यार्थी परीक्षेला बसले असता सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष माजीमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे , सचिव पंजाबराव हाडे , मुख्यध्यापक मखमले यांनी कौतुक केले आहे .

### श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूलचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**शेगाव :** श्री संत गजानन महाराज इंग्लिश मध्ये शेगाव येथील अमरावती बोर्डाच्या फेब्रुवारी २०२५ च्या इयत्ता १० दहावीचा श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूलचा निकाल हा ९९.१३% लागला असून शाळेतील एकुण ५३ विदयार्थी ९०% च्या वर गुण मिळवून पास झाले त्यापैकी ४ विदयार्थ्यांनी गणित व विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून यश मिळविले. विदयार्थी आपल्या यशाचं श्रेय आईवडील व गुरूजनांना देतात. हया सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे कौतुक श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूलचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी केले. व त्यांना पुढील वाटचालीस आयुष्यास शुभेच्छा दिल्या. हे सर्व श्रींच्या कृपार्शिवादीत सेवेतून घडत आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत ८८ प्रकरणांचा निपटारा

## तडजोडीपोटी १ कोटी २१ लाख रूपयांची वसुली

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१३**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधीकरण यांचे निर्देशाने १० मे २०२५ रोजी जिल्हा न्यायालय १ खामगाव यांचे परिसरात तडजोडीयुक्त प्रकरणे एन. आय. ॲक्ट १३८, बैंक रिकव्हरी सुट, तसेच वादपूर्व प्रकरणांचे राष्ट्रीय लोक अदालत आयोजीत करण्यात आले होते.

सदर लोकअदालतीमध्ये एकुण ०४ पॅनल नेमण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ वर पॅनल प्रमुख गणेश भिमराव जाधव जिल्हा न्यायाधीश- १ तथा अति सत्र न्यायाधीश, खामगाव तर पंच म्हणून रितेश रविंद्रकुमार निगम, विधीज्ञ, वकील संघ, खामगांव, पॅनल क्रमांक ०२ वर पॅनल प्रमुख म्हणून एन. एम. जमादार, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, खामगांव तर पंच म्हणून मेघा आबाराव ठाकरे, विधीज्ञा, वकील संघ, खामगाव हया होत्या तर पॅनल क्रमांक ०३ वर पॅनल प्रमुख विनोद वसंतराव पाटील, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर खामगांव तर पंच म्हणून श्रीराम दत्तू गावंडे, विधीज्ञ, वकील संघ, खामगांव हे होते तर पॅनल क्रमांक ०४ वर ओंकार अरविंद साने सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, खामगांव तर पंच म्हणून नामदेव सोपान नारखेडे, विधीज्ञ, वकील संघ, खामगाव हे होते. सदर लोकअदालत मध्ये कलम १३८ एन. आय. ॲक्टचे एकूण २७२ प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी २९ प्रकरणामध्ये यशस्वी तडजोड होवून रक्कम रु. ६६५८९०४/- इतकी तडजोड रक्कम म्हणून वसुल झाली. तसेच मोटार अपघात प्राधीकरणाचे एकुण ६१ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी ०२ प्रकरणांत यशस्वी तडजोड होवुन रक्कम रु. ४,००,००० इतकी वसुल करण्यात आली. फौजदारी प्रकरणे १७८ ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३ ३ प्रकरणात तडजोड होवुन द्रव्यदंड रक्कम रु. १०४००/- वसूल झाला. तसेच दिवाणी प्रकरणे १८५ ठेवण्यात आली होती. त्यापैकी २४ प्रकरणांत यशस्वी तडजोड होवून रक्कम रु. ५०,३२,५८०/- इतकी वसूल झाली. कौटुंबिक वाद प्रकरणे एकुण २८ ठेवण्यात आली होती.

सदर राष्ट्रीय लोकअदालत मध्ये बैंक ऑफ इंडीया, शाखा खामगाव, बँक ऑफ बडोदा, शाखा खामगाव कॅनरा बँक, शाखा खामगाव, युको बँक शाखा खामगाव, भारतीय बँक, शाखा खामगाव, युको बँक शाखा खामगाव, भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा खामगाव, भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा खामगाव पळशी शाखा खामगाव, पंजाब नॅशनल बँक शाखा खामगाव, श्रीराम फायनान्स कं. लि. शाखा खामगाव, युनीयन बैंक ऑफ इंडीया शाखा खामगाव, इंडीयन युनीयन बैंक ऑफ इंडीया शाखा खामगाव, इंडीयन ओव्हरसीस बँक, खामगाव, महिंद्रा फायनान्स लिमीटेड व महिंद्रा रूरल हाऊसींग फायनान्स, खामगाव राष्ट्रीय लोक अदालत मध्ये निकाली काढण्याकरीता मोठ्या संख्येने प्रकरणे ठेवण्यात आली होती. बँका फायनान्स असे मिळून एकूण वादपूर्व प्रकरणे ५२०९ ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकुण ३९ प्रकरणात यशस्वी तडजोड होवुन तडजोड रक्कम रु. २९७२७७५/- इतकी वसुली झाली. लोकन्यायालयामध्ये उपस्थित विधीज्ञ डी. आर. भेरडे, वाय. आर. मानेकर, व इतर विधीज्ञ मोठया संख्येने उपस्थित होते.

## औंढेश्वर विद्यालयचा दहावीचा १०० टक्के निकाल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**अंढेरा दि.१३**

स्थानिक श्री औंढेश्वर विद्यालय अंढेरा चा वर्ग १० वी चा १००% निकाल लागला असून उज्वल निकालाची परंपरा विद्यालयाने याही वर्षी कायम राखली आहे.तसेच सेमी इंग्रजी माध्यमाचा ही निकाल १००% लागला. परीक्षेला एकूण ६८ विद्यार्थी बसले होते त्याा सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ४७ प्रविण्य श्रेणी मध्ये व १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यामध्ये सुमेध गजानन इंगळे याने ९१.०० %मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच गणेश अनिल चव्हाण याने ने ८९.६०% मिळवून द्वितीय तर सौरभ कडुबा कुपेकर याने ८९.००% व प्रणव गणेश सानप याने ८९.००% गुण मिळवुन संयुक्त पणे तृतीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय प्र. मुख्याध्यापक सरोदे सर, सर्व शिक्षक व आपल्या आईवडिलांना देतात. औंढेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ व प्राचार्य ,सर्व शिक्षक,तसेच यशस्वी विद्यार्थी व पालकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## 'युग धर्म पब्लिक स्कूल'च्या यशाची अखंड परंपरा यंदाही कायम!

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१३**



शैक्षणिक उत्कृष्टतेचा लौकिक जपणारी आणि दरवर्षी यशस्वी निकाल देणारी युग धर्म पब्लिक स्कूल यंदाही आपली शिक्षणातील अधिराज्यस्थानी भूमिका सिद्ध करण्यात यशस्वी ठरली आहे. निकाल घोषित होताच पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, ही शाळा केवळ पुस्तकी शिक्षणापुरती मर्यादित नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक आदर्श केंद्रबिंदू ठरली आहे.

या अभूतपूर्व यशामागे शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, मुख्याध्यापकांचे शैक्षणिक नियोजन, शिक्षकांचा अविरत परिश्रम, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पालकांचा विश्वास व सहकार्य आहे. ही यशोगाथा केवळ निकालापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, शिस्त, मूल्यसंस्कार आणि ज्ञानाभिमुख दृष्टिकोनातही प्रकट होते. युग धर्म पब्लिक स्कूल ही शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचे मंदिर नव्हे, तर प्रत्योक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना उड्डाण देणारी एक यशाची पायरी आहे. शाळेमध्ये नियमितपणे घेण्यात येणारे स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन शिबिर, व्यक्तिमत्व विकास वर्ग, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, हे सर्व यशाची बीजे रोवण्यासाठी महत्त्वाचे घटक ठरले आहेत. शाळेचा यंदाचा निकाल हे केवळ आकड्यांचे प्रदर्शन नाही, तर एका दृष्टीकोनाची, व्यवस्थेची आणि मूल्यांची साक्ष आहे, ज्यावर उभ्या पिढ्यांचे भविष्य उभारले जाते. ''यश हे थांबण्याचं स्थान नसून पुढच्या प्रवासाचं वळण असतं!'' याच प्रेरणेसह युग धर्म पब्लिक स्कूल आपली ज्ञानयात्रा अधिक व्यापक आणि प्रभावी करत आहे.

## 'समतेचे निळे वादळ'चे अनावरण !

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मलकापूर दि.१३**

येथील रमाई नगर वार्डात ''समतेचे निळे वादळ'' या सामाजिक संघटनेच्या नामफलकाचे अनावरण बुलढाणा जिल्हा युवा अध्यक्ष ॲड कुणाल भाई वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचणे, मागासलेल्या घटकांचे कल्याण साधने, सर्वसामान्य वरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करणे, शाहू फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार समाजाच्या सर्व स्तरांमध्ये रुजवणे आदी बाबी नजरेसमोर ठेवून समतेचे निळे वादळ ही सामाजिक संघटना कार्यरत असल्याचे प्रतिपादन ॲड कुणाल वानखेडे यांनी यावेळी बोलताना केले. रमाई येथे सदर संघटनेच्या शाखा नाम फलकाचे अनावरण बुद्ध जयंतीच्या निमित्ताने करण्यात आले. यावेळी सर्वश्री सागर तायडे, भारत वानखेडे, अमोल गोरे, जगदीश खेडकर, प्रकाश गोमासे, पप्पू भैया ठाकूर, अनिल वानखेडे, विशाल सरदार.,संजू वानखेडे, विजय सरदार, दीपक वानखेडे, मिलिंद वानखेडे, अजय सरदार, रितेश तायडे, शांताराम वानखेडे, शरद गोरे, गौतम तायडे आदी सह संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्कूल ऑफ स्कॉलर्सचा आटोले १२ वी सीबीएसई बोर्डात जिल्ह्यातून प्रथम




**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मलकापूर दि.१३**

दि. १३ मे २०२५ मंगळवार रोजी जाहीर झालेल्या इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत मलकापूर शहरातील स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविण्याची व १००% निकालाची परंपरा कायम राखत शाळेचे नाव दर वर्षाप्रमाणे उज्वल केले आहे. यात शाळेतील सोहम आटोले याने ९४.२% मिळवून संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे तसेच प्रथम बेहडे ९१.२ % गुण मिळवून शाळेतून द्वितीय व निशिगंधा पाटील हिने ८७.२% गुण प्राप्त करून शाळेतून तृतीय क्रमांक पटकाविला आहे. त्याचबरोबर ऋषव चौधरी (८४.४%), मोहम्मद राफे पाशा (८२.८%), सोम्या सिंग (७७.४%), आणि अर्चित डहाके (७२%) गुण प्राप्त करून दैदिप्यमान यशाचे मानकरी ठरले आहे.

या सर्व विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेल्या तसेच उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे शाळेचे संचालक अमरकुमार संचेती, सर्व संचालक मंडळ तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुदीप्ता सरकार आणि सर्व शिक्षकांनी कौतुक व अभिनंदन केले.

## लाखनवाडा विविध शाळातील निकाल १०० टक्के

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**लाखनवाडा दि.१३**




आज माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२५ चा निकाल आज जाहीर झाला. यामध्ये प्लॅनेट पब्लिक स्कूल ज्युनियर कॉलेज लाखनवाडा (दुधा) चा १०० टक्के निकाल लागला आहे. प्रथम क्रमांक कावेरी गणेश पांढरे ८४.२० द्वितीय क्रमांक इकान अय्युब पठाण ८२.२० तृतीय रोशनी अनिल चव्हाण ८२.०० यांनी यश संपादन केले आहे.

सर्व शिक्षक,मुख्याध्यापक कर्मचारी, संस्था अध्यक्ष डॉ.सतिष खडसे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पी.एम.श्री जिल्हा परिषद हायस्कूल लाखनवाडा ९८.११ निकाल उपक्रमशील पी.एम.श्री जिल्हा परिषद हायस्कूल माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये एकूण ५३ विद्यार्थी परीक्षेत बसले, व ५२ विद्यार्थी एक विद्यार्थी परीक्षेत गैरहजर राहिला. प्रावीण्य श्रेणी ३२ विद्यार्थी, प्रथम श्रेणी १६ व द्वितीय श्रेणी ४ यांनी परीक्षेत यश संपादन केले. शाळेमधून प्रथम क्रमांक वैष्णवी सूर्यवंशी ९१.०० द्वितीय क्रमांक नम्रता पांढरे, पूजा पांढरे तृतीय क्रमांक ९०.०० यांनी यश संपादन केले.

यावेळी मुख्याध्यापक एस.जे निकुम, पंढरी पांढरे,संजय चाटे, राजेंद्र सोळंकी, केशव होगे, वंदना भजने, गणेश पिंपरकर,मिलिंद वाकोडे, सुमित वाकोडे,कृष्णा चव्हाण, जया सरदार,जयश्री मसने, वाकुडकर,वानखडे, चव्हाण, व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाहू फुले आंबेडकर निवासी आश्रम शाळा लाखनवाडा ८५.७१ निकाल लागला असुन यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष समाजसेवक भास्करराव वाकोडे यांनी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे अभिनंदन केले.

## मत्स्यकास्तकार, शेतकरी, सहकारी संस्था यांनी मत्स्यबीजाची मागणी नोंदवावी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.१३**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा भारतीय प्रमुख कार्प अर्थात कटला, रोहू, मृगळ माशांचा पावसाळी प्रजनन हंगाम जून २०२५ पासून मत्स्यव्यवसाय विभागाचे मत्स्यबीज उत्पादन केंद्र, कोराडी, ता. मेहकर येथे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू करणे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने मत्स्यकास्तकार,शेतकरी व सहकारी संस्थांनी मत्स्यबीजाची मागणी लेखीस्वरुपात नोंदवावी, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय सु.ग. गावडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/ मत्स्यकास्तकार/ शेततळीचारक/निलक्रांती योजना, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गतचे मत्स्यसंवर्धन तळीधारक लाभार्थी यांनी त्यांचे तलाव/ शेततळ्यामध्ये संचयन करण्यासाठी मत्स्यजीरे, अर्धबोटुकली, मत्स्यबोटकली, मत्स्यबीजाची मागणी लेखी स्वरूपात सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, प्रशासकीय इमारत, बस स्थानकासमोर, बुलडाणा यांचेकडे नोंदवावी. तसेच नि.मा.साळुंके सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र कोराडी ता.मेहकर यांचेकडे संपर्क करुन मागणी लेखीस्वरुपात नोंदविण्यात यावी.

## बाबासाहेबांचे परिवर्तनाचे स्वप्न साकारण्यासाठी काम करणार - आ. खरात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.१३**



क्रोधाचे कर्म माणसाला सुखाने सुखाने जगू देत नाही . समाजात न्याय, स्वतंत्र, समता, बंधुता ही नितीमूल्ये वाढली पाहिजे, त्यासाठी वाईट कर्म त्यागा म्हणजे सुखाने जगता येईल असा उपदेश भंते राज्यज्योती यांनी दिला .

तर बाबासाहेबांनी लोकशाहीत तथागतांचे तत्व अंगीकारले. बाबासाहेबांच्या पुण्याईनेच समाजात बदल झाल्याचे दिसून येत आहे. असे असले तरी , ९५ टक्के लोकांकडे देशाची संपत्ती असून पाच टक्के समाज आजही गरिबीत गुदमरतो आहे त्यामुळे हा न्याय झाला नाही.बाबासाहेबांनी दिलेली लोकशाही देशाने स्वीकारली तर विषमता ,बेरोजगारी आजही डोके वर का काढते आहे असा सवाल उपस्थित करत ,बाबासाहेबांच्या व्यवस्था परिवर्तनाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत करणार अशी ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली . मेहकर तालुक्यातील देऊळगाव साखरशा येथे थायलंड देशातून आणलेल्या बुद्ध मूर्तीचा प्रतिष्ठापना कार्यक्रम १२ मे रोजी सारनाथ बुद्ध विहारात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी उद्घाटक म्हणून आमदार सिद्धार्थ खरात बोलत होते. पुढे बोलताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की ,सिद्धार्थ खरात टक्केवारी साठी आमदार झाला नाही. रस्ते , सभागृह आदी कामे करणे ते आपले कामच आहे ,पण समाजात आर्थिक प्रगती झाली पाहिजे, बेरोजगारी कमी झाली पाहिजे, सामाजिक न्याय देखील मिळाला पाहिजे यासाठी आपण काम करणार आहोत. राज्याचे वार्षिक दरडोई तीन लाख दहा हजार असून जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न केवळ ८० हजार आहे. त्यामुळे येथील लोकप्रतिनिधींनी केले काय, असा खणखणीत सवाल देखील त्यांनी यावेळी उपस्थित केला.

यावेळी काँग्रेसचे पक्ष नेते ॲड. अनंतराव वानखडे यांनीही. मार्गदर्शन केले. यावेळी पातूर तालुका भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजेश सरकटे, वंचित बहुजन आघाडीचे खामगाव तालुका सचिव बाळू मोरे, ॲड . प्रितम वानखडे,गजानन राठोड, माजी सरपंच सखाराम आमले,अरूण वानखडे, उबाठा शाखाप्रमुख डिगांबर अल्हाट, पंडित देशमुख, दिलीप पायघन आदिंसह उपासक,उपासिका यांची भरगच्च उपस्थिती होती. अभय संगीत कला मंच अकोला च्या अंध कलाकारांनी यावेळी तथागत गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर सुरेल गीते सादर केली. प्रास्ताविक जेष्ठ पत्रकार बाळू वानखडे यांनी केले. संचालन व आभारप्रदर्शन रुपेश वानखेडे यांनी केले. यशस्वीतेसाठी भिम शक्ती क्रिडा मंडळ, सह उपासक,उपासिका यांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती संभाजी महाराजांना शंभूप्रेमींची मानवंदना

### इतिहास गढूळ करणाऱ्यांचे मनसुबे शिवप्रेमींनी उधळून लावावे-सुदर्शन शिंदे

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मोताळा दि.१३**



छत्रपती संभाजी राजांनी उभ्या आयुष्यात एकही लढाई हरली नाही. मुघलांच्या छाताडावर बसून स्वराज्य अबाधित ठेवण्यासाठी संभाजी राजे सह्याद्रीचा पहाड म्हणून उभे ठाकले. छत्रपती शिवाजी राजे नंतरही स्वराज्य अभेद्य ठेवल्यामुळे संभाजी राजांना स्वकियाकडून कलंकित करण्याचा डाव मोघलांनी आखला. शक्ती युक्ती आणि आमिषानेही न झूकणाऱ्या धर्मवीर योद्धांला कलंकित करून संपविण्याचे षडयंत्र तत्कालीन मुघल धार्जिन्या इतिहासकारांनी रचले. त्यामुळेच छत्रपती संभाजी राजेंनी मुघलांच्या डावात सहभागी झालेल्या स्वराज्यातील कलंकित सचिवांना हत्तीच्या पायदळी तुडविले. असे मत सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा.सुदर्शन शिंदे यांनी व्यक्त केले.

धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मोताळा तालुक्यातील गुगळी येथे शिवशक्ती मित्र मंडळ, गुगळी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमानाने १० मे ला सायंकाळी धगधगता लावा स्वराज्याचा छावा या विषयावर जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवव्याख्याते शिंदेंनी उपरोक्त विचारांची शिवांजली समर्पित केली. राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय, धर्मवीर संभाजी महाराज,शाहू फुले आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली समर्पित केली. दिव्या पाटील, राधिका देशमुख,प्रेरणा वाघ या विद्यार्थिनीच्या जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी शिवधर्मपिठावर आदर्श गाव सरपंच अप्पा कदम, प्रबोधनकार ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष गणेश शिंदे पाटील, गुगळी सरपंच रमेश वाघ,राष्ट्रीय बजरंग दल जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील, प्रांत उपाध्यक्ष भूपेश पाटील,कोऱ्हाळा बाजार उपसरपंच गजानन बोडखे पाटील, रामेश्वर पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिव व्याख्यानाचे बहारदार संचालन रामेश्वर पिसे व सचिन काकडे यांनी केले.यशस्वीतेसाठी भागवत देशमुख, शुभम पाटील, दीपक पाटील, विशाल पाटील, अक्षय पाटील, श्रीकांत पाटील, सोपान भा. पाटील, मुकुंदा पाटील, बंडूभाऊ देशमुख, रमेश गार्वे, विकास किन्होळकर, प्रतीक देशमुख, अक्षय सांगळे, आकाश पाटील, सोपान पाटील, सुमित पाटील, सचिन गार्वे यांच्यासह शिवशक्ती गणेश मित्र मंडळ, गुगळी ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील शिवप्रेमींनी अथक परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### वाशिमहून मुक्तागिरीपर्यंत एसटी सेवा सुरु करा



**कारंजा लाड :** वाशिम, कारंजा व मानोरावरुन अंजनगाव सुर्जी, परतवाडा व प्रसिद्ध जैन तीर्थक्षेत्र मुक्तागिरी येथे जाण्याकरिता आज रोजी कोणत्याही प्रकारची एस टी बसची थेट सेवा उपलब्ध नाही. म्हणून वाशिम येथून परतवाडा वा मुक्तागिरीकरिता एस टी बसची थेट सेवा सुरू करावी, अशी मागणी एका निवेदनाव्दारे दि जैन महासमितीचे कारंजा लाड संभागचे अध्यक्ष ॲड. संदेश जिंतुरकर यांनी शिवसेना आमदार भावना गवळी यांकडे केली आहे. पुढे निवेदनात नमूद केले आहे की, मागील दहा- बारा वर्षापूर्वी वाशिम परतवाडा ही एस टीची थेट बस सेवा सुरू होती; पण नंतर ती बस सेवा बंद पडली. आज रोजी वाशिम , कारंजा व मानोरा येथील नागरिकांना अंजनगाव सुर्जी, परतवाडा व जैन तीर्थक्षेत्र मुक्तागिरी या ठिकाणी जायचे असेल तर तुटत तुटतच प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात तर हा प्रवास अधिकच कंटाळवाणा होऊन जातो गाड्या वेळेवर न आल्यास गाड्याची वाट पाहण्यात पूर्ण दिवस जातो. शिवाय लहान मुलेसोबत असतील तर परिस्थिती अत्यंत बिकट होते. महिला एकटी असेल तर ती तुटत प्रवास करू शकत नाही, अशी विनंती दि जैन महासमितीने आमदार भावना गवळी यांना केली आहे. आमदार भावना गवळी यांना निवेदन सादर करतेवेळी दि जैन महासमितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य आशुतोष जोहरापुरकर, कारंजा लाड संभागचे अध्यक्ष संदेश जिंतुरकर, सचिव कविश गहाणकरी, कार्याध्यक्ष राजेंद्र खंडारे, नितीन बुरसे, उपाध्यक्ष गिरीश मिश्रीकोटकर उपस्थित होते.

### ३.३७ कोटींची तडजोड : ५८४ प्रकरणांचा निपटारा

**वाशिम :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार शनिवार, १० मे २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व तालुका तसेच जिल्हा न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे एस.व्ही हांडे, अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश वाशिम तसेच विजय टेकवाणी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांनी ज्या पक्षकारांचे प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत तसेच दाखल पूर्व प्रकरणे असलेल्या पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने मिटविण्याकरिता लोक न्यायालयामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले होते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एका दिवसात वाशिम जिल्ह्यात न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४ हजार ३५३ तसेच दाखलपूर्व ५ हजार ३५६ प्रकरणांपैकी प्रलंबित असलेल्या एकूण ५६१ प्रकरणांचा तसेच दाखलपूर्व २३ प्रकरणे, असे एकूण ५८४ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. एकूण रुपये तीन कोटी सदतीस लाख पंच्याऩ्नव हजार चारशे दहा इतक्या रकमेचे प्रकरणे निकाली निघालीत, तसेच लोक अदालतमुळे कौटुंबिक वादासंबंधित प्रकरणांत कुटुंबे एकत्र येऊन नांदण्याकरिता सोबत गेले. राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यामध्ये वकील संघाचे व जिल्हा पोलीस दलाचेदेखील मोलाचे सहकार्य मिळाले.

### जिल्हास्तरीय ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबिर



**वाशिम :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्ह्यातील विविध खेळ संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने व जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अंतर्गत जिल्ह्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरचे विविध खेळांचे खेळाडू तयार व्हावे, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याकरिता खेळाडुंना विविध खेळांचे अनुभवी प्रशिक्षकांकडून खेळाची तंत्रशुद्ध मार्गदर्शन व नियमांची सर्व माहिती मिळावी, हा दृष्टीकोन समोर ठेवून जिल्हास्तरीय ग्रीष्मकालीन क्रीडा शिबिर २८ एप्रिलपासून जिल्हा क्रीडा संकुल, वाशिम येथे सुरू आहे. जिल्हास्तरीय ग्रीष्मकालीन क्रीडा शिबिर दरम्यान आयोजित कार्याक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजय दहात्रे अस्थिरोग तज्ज्ञ, गुरुकृपा हॉस्पिटल वाशिम यांची उपस्थिती लाभली. तसेच लता गुप्ता, जिल्हा क्रीडा अधिकारी, मारोती सोनकांबळे, क्रीडा अधिकारी, रणजित कथडे, राजदीप मनवर, अनिल थडकर, नारायण ठेंगडे, साहिल राऊत, विजय धोंगडे, विक्की खोब्रागडे, अर्शद सय्यद, सुनील देशमुख इत्यादी खेळांचे तज्ज्ञ प्रशिक्षक मंचावर उपस्थित होते. डॉ. दहात्रे यांनी खेळाडुंना सरावामध्ये होणाऱ्या दुखापत व इजाबाबत मार्गदर्शन केले, तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती गुप्ता यांनी खेळाडुंना उन्हाळी प्रशिक्षण का घेतले पाहिजे, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच खेळाडुंचा उत्साह वाढावा याकरिता कथडे, थडकर यांनी मार्गदर्शन करत खेळाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे संचालन पूजा भटकर यांनी केले.

# ज्वारी पेऱ्याच्या बनावट नोंदी करून कोट्यवधीची लूट

## नाफेडमधील प्रकार

। संजय अलदर ।

**मानोरा, दि. १३ :** सध्या नाफेड मध्ये ज्वारी विक्री करण्यासाठी ज्वारी पिकाची ऑनलाइन नोंदणी सुरू आहे. ज्या शेतात ज्वारीचे पीक नाही अशा हजारो हेक्टर शेतात ज्वारी पीक दाखवून त्याचे खोटे फोटो जोडून काही इसमानचे पथक नोंदणी करीत आहे. अशा बोगस नोंदणीचा स्थळ पंचनामा करून बनावट नोंदणी करणाऱ्या विरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

तहसीलदार डॉ. येवलीकर यांना यासंदर्भात लेखी निवेदन देण्यात आले. त्यामध्ये म्हटले की, मानोरा तालुक्यातील ज्वारी या पिकाची नाफेड द्वारा खरेदी करण्याकरिता नोंदणी सुरू असून, काही व्यक्ती आपल्या जवळच्या शेतकऱ्यांच्या सात- बारामधील पीक पेऱ्यात



ऑनलाइन प्रणालीद्वारे एकाच मोबाइलमधून एकच फोटो ऑनलाइन मधे दाखवल्या जात आहे. प्रत्यक्ष शेतात न जाता संबंधित शेतकरी यांना काही आमिष दाखवून बोगस ज्वारी पिकाची लागवड केल्याचे दर्शविल्या जात आहे.

असे करून नाफेडमध्ये हजारो क्विंटल ज्वारीची विक्री बाहेरून ट्रकने आणून केली जात आहे. त्यामुळे हा तालुका शासन दरबारी दुष्काळग्रस्त दिसत नाही. म्हणून येथील इतर शेतकऱ्यांचे नुकसान होऊन त्यांना दुष्काळाचा लाभ मिळत नाही. ज्या शेतात ज्वारीची ऑनलाइन नोंद केली. त्या शेताचे स्पॉट पंचनामे तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यामार्फत करून खोट्या नोंदी करणाऱ्या या महाभागावर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

**प्रशासनाची केली जात आहे फसवणूक!**

मानोरा तालुक्यातील गोरखधंदा करणाऱ्या टोळीला आळा घालण्यासाठी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ज्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात ज्वारीचा पेरा केला असेल. अशा शेतकऱ्यांना नाफेडमध्ये ज्वारी टाकण्यास हरकत नाही; परंतु ज्या शेतात ज्वारीच नाही, अशा शेतात ज्वारी पेरा दाखविण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतात जाउन स्थळ पाहणी करावी, अशी मागणी होत आहे.

> या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत माहिती घेऊन खरे काय ते तपासले जाईल. याबाबत नाफेडचे अधिकारी यांना बोलून माहिती घेणार आहे. आवश्यकता पडल्यास स्पॉट पंचनामे केले जातील. जर असा प्रकार होत असेल तर निश्चितच दोषींवर कारवाई केली जाईल.
>
> - **डॉ.संतोष येवलेकर,** तहसीलदार

> संबंधित शेतकरी आपल्या मोबाइलवरून ज्वारी पीकपेरा नोंदणी करीत आहेत.ऑनलाइन असल्याने त्यांना ओटीपी जातो. त्यानुसार आम्ही कार्यवाही करतो.प्रत्यक्ष त्यांच्या शेतात ज्वारी पेरली की खोटी दाखविली, यांची शहानिशा करणे महसूल किंवा कृषी विभागाची जबादारी आहे. जेव्हा ज्वारी खरेदी केली जाईल, तेव्हा व्हेरिफिकेशन केले जाईल.
>
> **- अंशुमन जाधव**
> संचालक, फार्मर प्रोड्यूसर कंपनी
> (जिल्हा नाफेड केंद्र).

## दहावीच्या निकालात वाशिम जिल्हा विभागात द्वितीय



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १३ :** महाराष्ट्र राज्य व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आज १३ मे रोजी दहावीच ऑनलाईन निकाल जाहीर करण्यात आला असून वाशीम जिल्ह्याने बारावीत अव्वलस्थान पटकावले. तर दहावीच्या निकालात विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. वाशीम जिल्ह्याचा निकाल ९५.४१ टक्के लागला आहे. यामध्ये मुली अव्वलस्थानी राहिल्या असुन मुलीची पास होण्याची टक्केवारी ९७.१० टक्के आहे. तर, शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या अकोला जिल्ह्याचा निकाल ढांगवर गेला आहे.

वाशीम जिल्ह्यातील ११ हजार ७७८ मुलांनी दहावीच्या परिक्षेसाठी नोंदणी केली होती. तर ८ हजार ६८९ मुलींनी परिक्षेसाठी नोंदणी केली होती. अशा एकुण १९ हजार ८६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यामध्ये ११ हजार ६६ विद्यार्थ्यांनी तर ८ हजार सहाशे २९ विद्यार्थींनी अशा एकुण १९ हजार ६९५ मुलामुलींनी परिक्षा दिली होती. यामध्ये १० हजार ४१३ मुले तर ८ हजार ३७९ मुली अशा एकुण १८ हजार ७९२ मुले, मुली पास झाले आहे. यामध्ये मुलांची पास होण्याची टक्केवारी ९४.०९ आहे. तर मुलींची पास होण्याची टक्केवारी ९७.१० आहे. वाशीम जिल्ह्याचा एकुण रेग्युलअर विद्यार्थ्यांचा निकाल ९५.४१ टक्के लागला असून वाशीम जिल्हा अमरावती विभागातुन दुसऱ्या स्थानी आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात जिल्ह्यातील वाशीम तालुक्याचा ९५.११ टक्के निकाल लागला आहे. तर मालेगाव ९५.५८, रिसोड ९६.७५, कारंजा ९५.६५, मंगरूळपीर ९३.८९, मानोरा ९४.६८ असा जिल्हयाचा तालुकानिहाय निकाल लागला असून यामध्ये रिसोड तालुका अव्वलस्थानी आहे. रिसोड तालुक्याचा सर्वाधिक ९६.७५ टक्के निकाल लागला आहे.

### आकांक्षित जिल्ह्याची शैक्षणिक क्षेत्रात बाजी

वाशीम जिल्हा हा आकांक्षीत जिल्हा म्हणून संपूर्ण देशात ओळख आहे. असे असले तरी, जिल्हा शैक्षणिक क्षेत्रात बाजी मारत आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावीच्या निकालात वाशीम जिल्ह्याने अमरावती विभागात अव्वल स्थान पटकाविले आहे. तर, आज १३ मे रोजी जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात सुद्धा वाशीम जिल्ह्याने अमरावती विभागात द्वितीय स्थान पटकाविले आहे.शैक्षणिक क्षेत्रातील दहावी व बारावीच्या निकालात लगातार वाशीम जिल्हा अव्वल राहत असून वाशीम जिल्ह्याने अमरावती, अकोला सारख्या शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या जिल्ह्याला मागे टाकत जिल्ह्याची नवी ओळख निर्माण केली आहे.

## चवरे विद्यालय व इंग्लिश स्कूलचा १००% निकाल







**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**कारंजा लाड, दि. १३ :** सौ. शोभनाताई नरेंद्रकुमार चवरे शेरपूर, काळी कारंजा ता. कारंजा जि. वाशिम चा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १००% निकालाची परंपरा कायम ठेवत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर करण्यात आला त्यामध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. ७८ पैकी ७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले . यामध्ये शाळेतून प्रथम कमांक कु. शर्वरी योगेश चाणेकर ९४.८०, कु. दिपाश्री दिगांबर देशमुख ९३.६०, आदित्य गुणवंत केकन ९०.४०, अक्षरा उमेश चचाणे ९०.२०, हर्षा संजय कटीयारा ९०.००, वरील विद्यार्थ्यांनी यशोदिपक यश प्राप्त करून शाळेचे नांव लौकीक केले असून १००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. प्राविण्य श्रेणीमध्ये ३० विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये २६ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमध्ये २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच स्व. नरेंद्रकुमार चवरे एज्युकेशन सोसायटी कारंजा चे अध्यक्ष शशिकांत चवरे, उपध्यक्ष शुभदा श. चवरे, सचिव दिपक नांदगांवकर, संचालक डॉ. शार्दूल डोणगावकर, प्रजय भिसीकर, डॉ. स्नेहल डोणगांवकर, डॉ. देशना भिसीकर सौ. तनुजा दिपक नांदगांवकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षकवृंद व पालक यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एसएमसी इंग्लिश स्कूलचा यंदाही १०० टक्के निकाल






**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १३ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही वाशिम येथील एस एम सी इंग्लिश स्कूल च्या इतिहासात १० व्या वर्गाचा १०० टक्के निकाल लागला आहे. २०२४-२५ च्या १० व्या वर्गाच्या परीक्षेला एस एम सी इंग्लिश स्कूल चे एकूण ६४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी ९० टक्केच्या वर १४ विद्यार्थी, विशेष प्राविण्यासह ३४ विद्यार्थी तर ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. अर्जुन पवनकुमार खंडेलवाल या विद्यार्थ्याने ९५.६० टक्के घेऊन शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. श्रेया संतोष पिसे, ऋतिका विशाल वाल्हे ९५.४० टक्के घेऊन द्वितीय तर सौम्या राजेश ग्यारल ९५.२० टक्के ही विद्यार्थीनी शाळे मधून तिसरी आली आहे. त्याचबरोबर ३२ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयात विशेष प्राविण्यासह, ३१ विद्यार्थी मराठी विषयात विशेष प्राविण्यासह, ५२ विद्यार्थी हिंदी-संस्कृत विषयात विशेष प्राविण्यासह, ४४ विद्यार्थी गणित विषयात विशेष प्राविण्यासह, ५१ विद्यार्थी विज्ञान विषयात विशेष प्राविण्यासह आणि ४५ विद्यार्थी सामाजिक शास्त्र विषयात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. हरिभाऊ क्षीरसागर आणि सचिव पुरुषोत्तम शर्मा सर्व संचालक आणि मुख्याध्यापक मीना उबगडे, प्रणिता हरसुले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .

## राधादेवी बाकलीवालच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १३ :** येथील श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनने दहावीच्या निकालात १०० टक्के निकालाची परंपरा यावर्षीही कायम ठेवली .

शैक्षणिक सत्र २०२५/२६ च्या आज जाहीर झालेल्या निकालात वाशीम शहरातील श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनच्या समिक्षा अमोल बोळे हिने ९५.८० टक्के गुण मिळिवत शाळेतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. प्रतिक्षा धाराजी सावळे हिने ९४.२० टक्के गुण मिळिवत तसेच अक्षरा गणेशसिंह ठाकुर हिने सुध्दा ९४.२० टक्के गुण मिळिवत संयुक्तपणे द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. तर कला संतोष गिते हिने ९३.३० टक्के गुण मिळिवत तृतीय तर श्रुतिका शिवाजी संगवार हिने ९३ टक्के गुण मिळिवत चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे.

या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त, १९ विद्यार्थ्यांनी ८९ ते टक्केपेक्षा जास्त, तर २० विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय श्री बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, व्यवस्थापक ॲड माणिकचंद बज, मुख्याध्यापक धनंजय वानखेडे, शिक्षक विनायक उज्जैनकर, मनिष सदाफळे, राम राठोड, मयुरी सावले, रोहिणी ठोके, रोशनी अंभोरे, ज्ञानेश्वर वाकुडकर, शुभम गोटे, मोहीनी अहाळे, संतोष फुरसुले, प्रफुल्ल काळे, लक्ष्मण भगिरथे, आकाश भागिरथे यांचेसह आपल्या आई वडीलांना दिले आहे.

# मद्यपी चालकांवर कठोर कारवाईचा इशारा

## रस्ता सुरक्षेसाठी जिल्हा प्रशासनाचा 'ॲक्शन प्लॅन'

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १३ :** जिल्ह्यात रस्ते अपघात कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली आज दि.१३ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात रस्ता सुरक्षा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

या बैठकीत जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली आणि महत्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक लता फड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, सहाय्यक आरटीओ संग्राम जगताप , जिल्हा प्रशासन अधिकारी निलेश गायकवाड आणि पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात रस्ता सुरक्षा मोहीम तातडीने राबविण्याची गरज व्यक्त करताना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस म्हणाल्या, नागरिक आणि वाहनचालकांना रस्ता सुरक्षेचे महत्व पटवून देण्यासाठी




विविध जनजागृतीपर उपक्रम हाती घेणे अत्यावश्यक आहे. वाहन चालकांनी नेहमी लायसन्स आणि आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. दुचाकी चालकांनी हेल्मेटचा वापर करणे आणि रस्ता नियमांचे पालन करणे हे अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यावेळी, मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी जिल्ह्यातील विविध भागांतील नादुरुस्त रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. तसेच, संध्याकाळी सहा ते रात्री दहा किंवा बारा या वेळेत अपघातांचे प्रमाण अधिक असल्याने, या वेळेत सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत डॉक्टरांची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे आदेश जिल्हा शल्य चिकित्सकांना देण्यात आले. ग्रामीण भागातील आरोग्य अधिकाऱ्यांनी याबाबत दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले.

शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि सुरळीत वाहतूक व्यवस्थापनासाठी ट्रॅफिक पोलिसांनी अधिक जबाबदारीने काम करावे, रस्त्याच्या कडेला थांबलेल्या वाहनांवर कारवाई करावी आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर योग्य कारवाई करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यासोबतच, महामार्ग आणि मोठ्या रस्त्यांवरील दुभाजकांची (डिव्हायडर) दुरुस्ती करणे आणि रस्त्यांवर योग्य ठिकाणी रस्ता सुरक्षा संबंधित सूचना फलक (साईन बोर्ड) लावण्याचे निर्देश देण्यात आले.एकंदरीत, जिल्हा प्रशासनाने रस्ता सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**रस्त्यावर अपघात झाल्यास, कोणत्याही रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाल्यास शासनाकडून दीड लाख रुपयांपर्यंतची कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे, अशी महत्वपूर्ण माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. त्यामुळे अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यास मदत होणार आहे.**

# जिवंत दृश्यांनी सजलेली शाहिरी!



## सीमाताई पाटील व जॉली मोरे यांच्या सादरीकरणाने श्रोते भावूक













## तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी व सम्यक संबोधी संस्थेचे आयोजन

**बुद्ध पौर्णिमेनिमित्त अकोल्यात आयोजित ''आम्ही भारताचे लोकं'' या समाजप्रबोधनात्मक संगीतमय कार्यक्रमात शाहिरा सीमाताई पाटील व संगीत दिग्दर्शक जॉली मोरे यांच्या संचाने जिवंत दृश्यांसह सादर केलेली शाहिरी पाहून श्रोते भावूक झाले. गौतम बुद्ध, शिवाजी महाराज, फुले दाम्पत्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रसंगांवर आधारित सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. कार्यक्रमाने सामाजिक जाणीवेची ठसठशीत आठवण करून दिली.**





बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने अकोल्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहात ''आम्ही भारताचे लोकं'' ही समाजप्रबोधन करणारी संगीतमय गौरवगाथा प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.सुगत वाघमारे यांच्या नेतृत्वात तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी व सम्यक संबोधी संस्थेच्या विद्यमाने सादर करण्यात आली. या कार्यक्रमात प्रसिद्ध महिला शाहिरा सीमाताई पाटील व संगीत दिग्दर्शक जॉली मोरे आणि त्यांच्या संचाने जिवंत दृश्यांनी सजविलेली शाहिरी सादर केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारत-पाक युद्धातील शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. दीप प्रज्वलन करून तथागत गौतम बुद्धांना वंदन करण्यात आले. यानंतर डॉ. सुगत वाघमारे यांच्या हस्ते सीमाताई पाटील व जॉली मोरे यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात गौतम बुद्ध, अंगुलीमाल, सम्राट अशोक यांच्या जीवनातील प्रसंगांचे संगीतमय सादरीकरण करण्यात आले. शिवाजी महाराजांचा जन्म, जिजाऊ मातेचे मार्गदर्शन, महात्मा फुले-सावित्रीबाईंचे कार्य, फातिमा शेख, राजर्षी शाहू महाराज यांचा आदर्श गीतांच्या माध्यमातून उभा केला गेला. जात्यावरच्या ओव्यांमधून प्राचीन स्त्रीजीवनाचं चित्रण तर शेतमजुरांच्या आयुष्यातील संघर्ष व बाबासाहेबांच्या विचारांचे प्रतिबिंब दाखवणारी गीते सादर झाली. या सादरीकरणाने उपस्थित श्रोत्यांनी भावनावश होऊन अश्रूंना वाट मोकळी करून दिली. लोककला आणि डोंबारी खेळाच्या माध्यमातून संविधानाने सर्वसामान्यांना दिलेले हक्क, शिक्षणाची संधी आणि सामाजिक उन्नती यावर प्रकाश टाकण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या जीवनावर आधारित दृश्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सुंदर संचालन प्रदीप अवचार यांनी केले. प्रमुख उपस्थितीत तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष व उद्योजक डॉ. सुगत वाघमारे, सचिव विष्णुदास मोंडोकार, श्रीकांत पिंजरकर, ॲड. संजय सेंगर, जिल्हा समन्वयक सचिन पाटील, सम्यक संबोधी संस्थेचे अध्यक्ष अजय आठवले व सचिव राहुल ओइंबे उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे सचिव विष्णुदास मोंडोकार, उमेश सिरसाट, अंकुश सिरसाट, यश साळवे, श्वेता सिरसाट, अश्विन सिरसाट, विशाल शिंदे, भीमा सिरसाट, पंकज खंडारे तसेच सम्यक संबोधी संस्थेचे कोषाध्यक्ष अमोल वानखडे, सहसचिव योगेश इंगळे, सदस्य रोहन इंगळे आदींनी परिश्रम घेतले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे कार्यक्रम यशस्वी पार पडला.













* सर्व छाया : संजय ताथुरकर * सजावट व मांडणी : अक्षय जायले * संकलन : सिद्धार्थ तायडे

# बळीराजासाठी रविकांत तुपकरांचा एल्गार

## अंगणातच कुटुंबीयांसह लाक्षणिक अन्नत्याग : शेतकरी प्रश्नावर वेधले शासनाचे लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.१३

**राजकीय नेते, पदाधिकाऱ्यांसाठी वाढदिवस म्हणजे जल्लोषाची मोठी पर्वणीच असते. बडेजाव आणि थाटमाट काही औरच असतो. मात्र, शेतकरी नेते रविकांत तुपकर त्याला अपवाद ठरले आहेत. वाढदिवशी कुठलही आनंदोत्सव साजरा न करता शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपल्या घराच्या अंगणातच तुपकर यांनी पती, आई, वडील, मुले आणि बहिणींसह १३ मे रोजी जन्मदिनी लाक्षणिक अन्नत्याग आंदोलन केले.**



जगाच्या पोशिंद्यासाठी केलेला हा एल्गार अधिक तीव्र करण्यासाठी शेतकरीदेखील मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी दाखल झाले. राज्याच्या कानाकोपऱ्यातूनही कास्तकार आल्याने या आंदोलनाला मोठी ताकद मिळाली. या आंदोलनाच्या माध्यमातून तुपकर कुटुंबीयांनी शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. वाढदिवस हा आनंदाचा उत्सव म्हणून मनवला जातो, पण रविकांत तुपकर यांनी वाढदिवशी कुठलेही हारतुरे, सत्कार न स्वीकारता आजचा जन्मदिन शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी समर्पित केला.

शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी, शेतकऱ्यांसाठी जगणारा नेता म्हणून रविकांत तुपकर यांची ओळख आहे. शेतकऱ्यांवर त्यांनी अक्षरशः जीव ओवाळून टाकला आहे. जगेल तर शेतकऱ्यांसाठी, मरेल तर शेतकऱ्यांसाठी या ध्येयाने जगणारे रविकांत तुपकर हे वाढदिवस साजरा न करता विविध मागण्यांसाठी अन्नत्यागाला बसले. वाढदिवशी आंदोलन करणारे रविकांत तुपकर हे राज्यभरातून एकमेव नेते ठरल्याच्या प्रतिक्रिया सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहेत. पहलगाम हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांचा बळी गेला आहे. त्यातच दिवसाला दहा शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतमालाला भाव नाही, शेतकरी कर्जाच्या बोजाखाली दबला आहे. बँकांनी होल्ड लावले आहेत, सक्तीने कर्ज वसुली सुरू आहे. अनेक शेतकरी पीकविम्यापासून वंचित आहेत. शेतकरी प्रचंड अडचणीतून जातोय, तरुण अस्वस्थ आहेत, देशातील वातावरण अस्थिर आहे अशा पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा करण्याचा विचारही मनाला पटत नसल्याने शेतकरी आणि सर्वसामान्यांचे हित जपण्यासाठी आपण आजचा हा लढा उभारल्याचे रविकांत तुपकर शेतकऱ्यांशी संवाद साधताना बोलत होते.

**या मागण्यांकडे वेधले लक्ष**

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती द्या, १००% पीकविम्याची रक्कम अदा करावी, सोयाबीन-कापसाला भावफरक द्यावा, बँकांनी खात्यांना लावलेला होल्ड काढावा, सक्तीची कर्जवसुली थांबवावी, शेती पिकांना संरक्षण म्हणून कंपाऊंड लावावे, उसाला एकरकमी, दूध, कांद्याला अनुदान मिळावे , शेतकऱ्यांना सुलभ पद्धतीने पीककर्ज वाटप व पीक कर्ज मर्यादा वाढवावी,शेतकऱ्यांचे अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, रखडलेले अनुदान मिळावे द्यावी, या मागण्यांकडे तुपकरांनी लक्ष वेधले.

**रात्री बारापर्यंत चालले आंदोलन**

जन्मदिनाच्या पर्वावर रविकांत तुपकर यांच्यासह कुटुंबीयांनी आज सकाळी नऊ वाजेपासून सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन रात्री बारा वाजेपर्यंत चालले. शेतकरी संघटने नेते नामदेवराव जाधव व दलितमित्र शेषराव पाटील सावळे यांच्या हस्ते शहीद भगतसिंग यांची प्रतिमा व भारत मातेच्या पूजनाने सुरुवात झाली. यावेळी राष्ट्रगीतही झाले.

**दिवसभर शेतकरी प्रश्नांवर विचारमंथन**

रविकांत तुपकर यांनी उपोषणामागची भूमिका विशद केली. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने आलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. काही मान्यवरांनीही पाठिंबा दर्शविला. आपले मनोगत व्यक्त केले. काही शेतकऱ्यांनीही विचार मांडताना रविकांत तुपकर यांचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. तुपकरांच्या कार्यावरही प्रकाश टाकण्यात आला. युवा शेतकऱ्यांचीही मोठी गर्दी उसळली होती. शेतकरी प्रश्नांवर दिवसभर विचार मंथन करण्यात आले. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. पाठिंबा देण्यासाठी दिवसभर रिघ लागली होती.

**मंडप भिजला, पण आंदोलन नाही थांबले**

वाढदिवसाच्या निमित्ताने आंदोलनात्मक भूमिका घेणे, ही पहिलीच वेळ असल्याने हे अन्नत्याग आंदोलन लक्षवेधी ठरले. सकाळी पडलेल्या पावसाने मंडप ओला झाला, तरीसुद्धा पावसातच सकाळी ९ वाजेपासून तुपकर कुटुंबीयांनी अन्नत्याग सुरू केले.

## थोडक्यात

### बसच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**चिखली :** चिखली वरुन तेल्हारा येथे दुचाकीने घरी जात असतांना भरधाव एसटी बसने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना (दि.१२) मे रोजी दुपारी १ वाजता सोम ठाणा फाट्या जवळ घडली. शंकर भोपळे वय ४०, रा. तेल्हारा पेठ असे मृतकाचे नाव आहे. ते चिखली वरुन तेल्हारा येथे आपल्या एचएफ डिलक्स दुचाकीवरून घरी जात होते. दरम्यान चिखली-खामगाव रस्त्यावरील सोम ठाणा फाट्याजवळ पाठीमागून भरधाव वेगात येत असलेल्या जालना आगाराची बस एम एच ०८ एस ८७८६ बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे भोपळे रस्त्याच्या बाजूला फेकले गेले. आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ मदत केली. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

### मेहकर तालुका दहावीचा निकाल ९६.८९ टक्के

**मेहकर :** तालुक्यातील पळशी बु. येथ महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल जाहीर झाला यंदा मेहकर तालुक्याचा निकाल ९६.८९ % लागला असून नियमित विद्यार्थ्यांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलापेक्षा जास्त असून एकूणच निकालापैकी मुलींनी जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहे. मेहकर तालुक्यामधून दहावीच्या परीक्षेकरिता एकूण ४४५३ मुले यांची नोंदणी करण्यात आली त्यामध्ये २५०६मुली तर १९०४ मुली परीक्षेत पात्र झाले होते यामधून २४२४ मुले तर १८४९ मुलीअसे एकूण ४२५३ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊन तालुक्याचा निकाल ९६.८९ असा लागला आहे

### बाबुराव पाटील विद्यालयचा निकाल ९३ टक्के

**खामगाव :** डोणगाव येथून जवळच असलेल्या ग्राम लोणी गवळी येथील दे भ श्री हि सो उर्फ बाबुराव पाटील विद्यालयाचा वर्ग १० वीचा निकाल ९३ टक्के लागला आहे. याशाळेचे वर्ग १०च्या परीक्षेला ९८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ३१ विद्यार्थी प्राविण्य श्रेणी पास झाले असून ३२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २३ विद्यार्थी हे द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ५विदयार्थी पास झाले असे एकूण ९१ विद्यार्थी यांनी यश मिळविले आहे त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भास्करराव पाटील प्राचार्य सुरेश हिवरकर संस्थेचे सर्व संचालक तसेच शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २२००-२३५० |
| गहु | २३००-२५५० |
| मका | १७८०-२०५० |
| मोहरी | ५३५०-५३६० |
| मलाई चना | ५८००-८१०० |
| तुर | ६२७५-७२५० |
| हरभरा | ३९७५-५६७५ |
| भुईमुग | ४१००-५८०० |
| सोयाबीन | ३४००-४४०० |
| उडिद | ६५००-७००० |
| मुग | ७१००-७१०० |

## सरन्यायधिश झाल्याबाबत बी.आर.गवई यांना वकील संघाचे अभिनंदन पत्र

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१३

भारताचे मुख्य न्यायधिश झाल्याबाबत बी. आर. गवई यांना वकील संघ, मलकापूर, जि. बुलढाणा (महाराष्ट्र) यांनी भारताचे मुख्य न्यायधिश झाल्याबाबत, वकील संघ, मलकापूर येथे एक मताने अभिनंदनाचा ठराव पारीत केला आहे. सदर पत्रकात असे नमूद करण्यात आले आहे

आमच्या वकील संघामधील एक सदस्य जणु सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश झाले आहेत. आपण या विदर्भाच्या भुमीतील व महाराष्ट्राचे सुपुत्र म्हणून आम्हास आपल्याबद्दल नितांत आदर आहे. वकील संघांना त्यांच्या अडचणीचे वेळोवेळी आपण सर्व सर्वोतोपरी सहकार्य करून आम्हाला प्रेरणा देण्याचे काम केलेले आहे.



आदरणीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश गवई साहेब आम्हाला आपल्याबद्दल विशेष अभिमान वाटत आहे कारण की, आपण सामान्य लोकांचे मागासवर्गीयांचे प्रतिनिधी आहात त्यामुळे आम्हाला आपल्यावर सार्थ अभिमान आहे. आम्हाला हे सुध्दा वाटत आहे की, हे सर्व केवळ भारतीय संविधानाच्या सर्वोच्च शक्तीमुळे शक्य झाले आहे.

सर्व वकील संघाचे सदस्य, आपले अंतःकरणा पासून अभिनंदन करीत आहे, की पुढील भविष्यात आपल्या हातुन न्याय विभागाची सर्वोतोपरी सेवा घडो व आपले हातुन गरीबांना योग्य न्याय मिळो सदर पत्रकावर मलकापूर वकील संघाचे अ‍ॅड. साहेबराव मोरे , अ‍ॅड.हरीश रावळ, अ‍ॅड.जी. डी. पाटील, अ‍ॅड.नितीन जाधव, अ‍ॅड.वानखडे,इंगळे, अ‍ॅड.आनंद कुमार शर्मा, यासह आदी वकिलांनी अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

## अंबाबरवा अभयारण्यात ४६१ वन्यप्राण्यांचे दर्शन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
संग्रामपूर दि.१३

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा वनपरिक्षेत्र कार्यालयाअंतर्गत अंबाबरवा अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेच्या रात्री निसर्ग अनुभव कार्यक्रम पार पडला.

१२ मे रोजी दुपारी ते १३ मे रोजी सकाळ दरम्यान करण्यात आलेल्या प्राणी गणनेत अभयारण्यातील २ वाघ, ३ बिबटसह ४६१ वन्य प्राण्यांचे दर्शन झाले. तर मागील वर्षी २ वाघासह ३३१ वन्यप्राण्यांचे दर्शन झाले होते. सातपुडा पर्वत रांगेतील वन परिसरात विविध वन्य प्राणी तसेच दुर्मिळ पक्षांसह सह विविध प्रजातींच्या पक्षांची किलबिलाट पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. यंदा निसर्ग अनुभव कार्यक्रम १२ मे रोजी दुपारी २ वाजेपासून ते १३ मे रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत राबविण्यात आला. यावेही निसर्ग प्रेमी व वन अधिकारी, कर्मचारी यांनी वन्यप्राण्यांच्या नोंदी घेतल्या. यासाठी अभयारण्यात मचान उभारण्यात आले होते. तसेच नैसर्गिक व कृत्रिम पानवठे तयार करण्यात आले होते. रात्री मचान वर बसून प्राणी प्रेमींच्या उपस्थितीत प्राणी गणना करण्यात आली. ढगाळ वातावरण असल्यामुळे वन्यप्राण्यांची पाणवठ्यांवर येणारी संख्या रोडावल्याचे दिसून आले.

**यंदा ४६१ वन्यप्राण्यांचे दर्शन**

वाघ २, बिबट ३, अस्वल ७, निलगाय २८, सांभर ३९, भेडकी १०, गवा ३१, रानडुकर २४, लंगुर ३०, माकड १६३, मसन्या उद १४, रानकोंबडी ३०, रानमांजर १०, मोर ५५, ससा ३, चांदी अस्वल २, मुंगुस ५, सायळ ४, साप १ असे एकूण ४६१ वन्यप्राण्यांचे दर्शन झाले.

**मागीलवर्षी ३३१ वन्यप्राण्यांचे दर्शन**

वाघ-२, अस्वल १०, निलगाय २६, सांभर २९, भेडकी ११, गवा १२, रानडुकर ३७, लंगुर-१, माकड १११, मसन्या उद-२, रान कोंबडी-५, मोर-७४, ससा ४, रान कुत्रा-२, मुंगुस-१, चौसिंगा-४, असे एकूण ३३१ वन्यप्राण्यांचे दर्शन झाले.

## अंगावर वीज पडून महिलेचा मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
लोणार दि.१३

शेतात मजूर महिलांसह कापूस वेचत असतांना महिलेच्या अंगावर विज पडून मृत्यू झाला. ही घटना (दि.१२) मे रोजी वीरपांग्रा येथे दुपारी घडली.

बिबी पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या वीरपांग्रा परिसरात अचानक विजांच्या गडगडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. अचानक बदललेल्या हवामानाने शेतकऱ्यांची धावपळ उडवली. वीरपांग्रा येथे शेतकरी महिला रंजना संदीप चव्हाण वय ३५ या कापूस वेचणीसाठी मजूर महिलांसह शेतात काम करीत होते. पावसाने जोर धरल्याने त्यांनी बचावासाठी लिंबाच्या झाडाचा आसरा घेतला. परंतु दुर्दैवाने झाडावर वीज कोसळली आणि रंजना चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला. या दुःखद घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या पावसामुळे सामान्य नागरिकांना उन्हाच्या तापापासून दिलासा मिळाला असला तरी, लग्नसराईतील नियोजन कोलमडले आणि शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. कांदा, भुईमूग आणि उन्हाळी ज्वारी पिकांचे नुकसान झाले आहे. काढणीला आलेले भुईमूग पावसात भिजल्याने शेतकरी चिंतेत आहेत. हवामानातील हा अचानक बदल शेतीसाठी घातक ठरत असून, शेतकऱ्यांमध्ये चिंता पसरली आहे. प्रशासनाने त्वरीत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिक व शेतकरी करत आहेत.

## सिल्वरसिटी मल्टिस्पेसिएॅलिटी हॉस्पिटलमध्ये 'जागतिक परिचारिका दिन'साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१३

बुलडाणा जिल्यातील सर्वात मोठया व एकाच छताखाली सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असलेल्या एकमेव अश्या सिल्वरसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, क्रिटिकल केअर व ट्रामा सेंटर, खामगाव येथे सोमवार दि १२ में २०२५ रोजी "जागतिक परिचारिका दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी सिल्वरसिटी हॉस्पिटल चे अध्यक्ष डॉ अशोक बावस्कर, व्यवस्थापकीय संचालक डॉ पंकज मंत्री, मुख्य कार्यकारी



अधिकारी डॉ पराग महाजन, उप मुख्य कार्य कारी अधिकारी डॉ गौरव लदढा, संचालक डॉ निलेश तिबडेवाल, डॉ आनंद राठी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते द्विप प्रज्वलन व धंवन्तरी पुजनाने करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व्यवस्थापकीय संचालक डॉ पंकज मंत्री यांनी केले त्यांनी आपल्या भाषणात जागतिक परिचारिका दिनाचे महत्व सांगितले. जागतिक परिचारिका दिन चे औचीत्य साधून सिल्वरसिटी मल्टिस्पेसिएॅलिटी हॉस्पिटल मध्ये कार्यरत सर्व परिचारिका कर्मचार्यांना गुलाब पुष्प व भेट वस्तू देऊन मान्यवराच्या हस्ते सन्मान व गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास सिल्वरसिटी हॉस्पिटलच्या सर्व कर्मचार्यानी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी सौ. जया इंगळे,राजेश साटोटे व सर्व कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य शिवशाहीरी पोवाडा कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१३

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त १४ मे रोजी स्थानिक मराठा मंगल कार्यालय येथे छत्रपती शंभूमहाराज जन्मोत्सव सोहळा व भव्य शिवशाहिरी पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक समस्त छत्रपती शंभूमहाराज पाईक परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

एकापेक्षा एक निष्णात योध्यांना निष्प्रभ करणारे रणभैरव सेनापती, रणधुरंधर, स्वराज्याचे द्वितीय छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सव सो-




हळ्याचे आयोजन १४ मे रोजी करण्यात आले आहे. यानिमित्त सायंकाळी ७ ते ९ महाराष्ट्राचे नामवंत युवा शाहीर स्वप्निलदादा डुंबरे नाशिक यांच्या पोवाड्याचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव व पोवाडा कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन समस्त छत्रपती शंभूमहाराज पाईक परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद पुरस्काराचे वितरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१३

पाकिस्तानला चोख जबाब देण्याचे काम भारतीय सैनिक करत आहे. गोली का जवाब तोफ गोले से देंगे हा नवभारत आहे. आतंकवाद्यांनी भारतीयांच्या नादी लागू नये. भारतीय लष्कराने दाखवून दिला आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी बुलडाणा येथे केले.

बुलडाणा जिल्ह्यातील इसरूळ येथे संत चोखामेळा यांचा पुण्यतिथी सोहळा १० मे ते १८ मे पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. संत चोखोबाच्या जन्मभुमी अयोध्या येथील श्रीराम जन्मभुमी मंदिराचे कोषाध्यक्ष गोविद देवगिरी



महाराज यांच्या वाणीतून शिवचरित्र छत्रपती शिवाजी महाराज यांचा धकधकता इतिहस कथण केल्या जात आहे. या कार्यक्रमा दरम्यान गिता परिवार संस्थेच्यावतीने निलेश महाराज झरेकरे यांना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार हा गोविद देवगिरी महाराज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे ,केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपिठावर आमदार संजय गायकवाड, श्रेता महाले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापरी, ओमसिंग राजपूत, युवा सेनेचे महाराष्ट्र सहसचिव तथा जिल्हाध्यक्ष ऋषिकेश जाधव, महिला आघाडी जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के उपस्थित होते. एकनाथ शिदे पुढे म्हणले की अडचणीत सापडल्यांना मदत करणं हे कर्तव्य काम केल आहे. मी समाज पंढरीचा कार्यकर्ता आहे सत्ता पंढरीचा नाही. यापुढेही मी समाजाच्या प्रत्योक कामासाठी सदैव तयार राहील. आम्ही टीम म्हणून काम करत आहोत. लाडकी बहिणी , लाडके भाऊ आणि लाडके शेतकऱ्यांनी भरभरून मतदान ने केलं. त्यामुळे आम्ही पुन्हा सत्तेमध्ये आलो. लडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही असं ही उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सांगितले. धार्मिक आणि अध्यात्मिक अधिष्ठान हे राजकीय अधिष्ठानापेक्षा मोठा आहे. असे त्यांनी यावेळी सांगितलं. राज्यातील ४७ हजार वादयाना भगवद्गीतेच्या माध्यमातून सुधारण्याचं काम केल्या बद्दल निलेश महाराज झरेकर यांना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार गौरवण्यात आले.या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्या लोकशाहीर वामनदादा कर्डक अभिवादन सोहळ्याचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१३

महाकवी डॉ. वामनदादा कर्डक यांच्या २१ व्या स्मुर्ती दिननिमित्त बुलडाणा येथील एडेड हायस्कूल समोरील वामनदादा कर्डक स्मृती स्थळावर १५ मे गुरुवार रोजी वामन दादा कर्डक प्रतिष्ठानच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार संजय गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत आपल्या ओजस्वी कविता आणि गीतांद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घराघरात पोहोचवणारे लोकशाहीर डॉ. वामनदादा कर्डक हे खऱ्या अर्थाने लोककवी आणि समाज प्रबोधनकार होते. आपल्या हयातभर त्यांनी आपल्या लेखणी व गायनातून बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारांचा प्रसार केला. त्यांच्या १०,हजाराहून अधिक गीतांनी, विशेषता आंबेडकरी जलशांमधील सादरीकरणांनी, समाजात क्रांतिज्योत प्रज्वलित ठेवली.सांगा धनाचा साठा, आमचा वाटा कुठाय हो'' अशा त्वेषपूर्ण शब्दांत त्यांनी विषम व्यवस्थेला आव्हान दिले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात २०२१-२२ त्यांचे कार्य स्मरण करत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह अनेक संस्थांनी गीत वामनाचे या सारख्या कार्यक्रमांतून त्यांना आदरांजली वाहिली. एम.जी.एम.विद्यापीठाने त्यांना मरणोत्तर डी. लीट पदवी बहाल करून त्यांचा गौरव केला. आतापर्यंत त्यांच्या गीतावर डझनभर लोकांनी डॉक्टरेट केली. वामन दादांच्या गीतांनी दिलेली प्रेरणा आजही लाखो मनांना जागृत करते. १५ मे रोजी होणाऱ्या अभिवादन सभेला मुख्याधिकारी गणेश पांडे, शिसेनेचे अ‍ॅड. सुमित सरदार, समाज भूषण दिलीप जाधव, भिम शक्तीचे संस्थापक प्रा. दादाराव गायकवाड , अभियंता विजय मोरे, साहित्याक प्राचार्य डॉ. गोविंद गायकी, व्हाइस ऑफ मिडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, राजेंद्र काळे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंग राजपूत, उपस्थित राहणार आहेत.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
बुधवार, दि. १४ मे २०२५

# जिल्ह्यात दहावीचा निकाल ९२.८६ टक्के

## गत वर्षीच्या तुलनेत दहावीचा निकाल २ टक्क्यांनी घरसला, जिल्ह्यात भातकुली तालुका अव्वल, धारणी तालुक्याचा सर्वात कमी निकाल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १३ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मंगळवारी (दि.१३) दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाइन जाहीर केल्यानंतर उर्तिण झालेले आणि प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यामध्ये अमरावती जिल्ह्याचा निकाल ९२.८६ टक्के लागला असून, हा निकाल गेल्या वर्षीच्या तुलनेत २ टक्क्यांनी घरसला आहे. या निकालात भातकुली तालुका अव्वल असून, या तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९५.११ टक्के लागला आहे. तर धारणी तालुका सर्वांत ढांग राहिला आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीचा निकाल घोषित केल्यानंतर अमरावती जिल्ह्याचा निकाल ९४.६१ टक्के होता. तर यंदा निकालाची टक्केवारी ९२.८६ टक्के लागता आहे. त्यामुळे दोन्ही वर्षांच्या तुलनेत यंदाचा निकाल २ टक्के कमी आहे. यंदा अमरावती जिल्ह्यात ३७ हजार ५७७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३७ हजार १९१ विद्यार्थ्यांनी फेब्रुवारीमध्ये परिक्षा दिली. यातुन ३४ हजार ५३९ विद्यार्थी उर्तीर्ण झाले आहेत. तर २ हजार ६५२ विद्यार्थ्यांना उपयश आले. या निकालात भातकुली तालुक्यातील निकाल सर्वाधिक ९५.११ टक्के लागला आहे. त्या पाठोपाठ नांदगाव खंडेश्वर तालुक्याचा निकाल ९४.९० टक्के लागला असून जिल्ह्यात हा तालुका दुसऱ्या क्रमाकावर आला आहे. तिसऱ्या क्रमाकावर चांदूरबाजार तालुक्याचा ९४.५७ टक्के निकाल लागला आहे. तर धारणी तालुक्याचा निकाल ८६.५६ टक्के लागला आहे.

### दर्यापूरातील जि.प. शाळेचा निकाल शून्य

जिल्ह्यातील एका शाळेचा निकाल हा शुन्य टक्के लागला असून यामध्ये जिल्ह्यात दर्यापूरच्या जिल्हा परिषद शाळेचा समावेश आहे. याबाबत शिक्षण बोर्डाचे सचिव निलिमा टाके यांनी माहिती दिली. यावेळी साहाय्यक सचिव संगिता साळुके, जेष्ठ अधिक्षक नंदकिशोर साखरकर उपस्थित होते.

यंदाही मुलीचींच बाजी

दहावीच्या परिक्षेत १८ हजार १६४ मुलींची नोंदणी झाली होती. यामधुन १७ हजार १९८ मुलींनी दहावीची परिक्षा दिली. यामधून १७ हजार १६२ मुली उर्तीर्ण झाल्या आहेत. याची टक्केवारी ९५.३८ इतकी आहे. यंदा मुलीची टक्केवारी मुलाच्या टक्केवारीच्या तूलनेत ५ टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे यंदा देखील दहावीत मुलापेक्षा मुलींचीच संख्या अधिक आहे.

विद्यार्थ्यांना एटीकेटीची सुविधा

आठपैकी कोणत्याही दोन विषयांत जे विद्यार्थी नापास झाले असतील, त्यांना एटीकेटीची सुविधा लागु असून त्यांना अकरावीत प्रवेश घेता येणार आहे. याकरिता त्यांना त्वरीत अनुर्तीण झालेल्या विषयांचा ऑनलाईन अर्ज दाखल करून परिक्षा द्यायची आहे. याशिवाय गुण पडताळणीकरिता विद्यार्थ्यांना २८ मे रोजीची डेडलाईन देण्यात आली आहे. त्यापुर्वी त्यांनी बोर्डाकडे अर्ज करावयाचा आहे. याकरिता त्यांना शुल्क आकारावे लागणार आहे.

६२ टक्के विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत जिल्ह्यात ७५ टक्क्यांवर विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत आहेत. यामध्ये ७५ टक्क्यांवर गुण असणारे ९४८४ तर ६० टक्क्यांवरील प्रथम श्रेणीत १२०१४ विद्यार्थी उर्तीण झाले आहेत. तसेच व्दितीय श्रेणीत १०३९० विद्यार्थी व २६५१ विद्यार्थी ३५ टक्क्यांवर उर्तीण झाले आहेत.

### तालुकानिहाय निकालाची टक्केवारी

| तालुका | निकाल (टक्केवारी) |
|---|---|
| अमरावती | ९४.४४ |
| भातकुली | ९५.११ |
| नांदगाव खंडेश्वर | ९४.९० |
| चांदूर रेल्वे | ९३.१० |
| धामणगाव रेल्वे | ९४.३३ |
| तिवसा | ८७.८८ |
| मोर्शी | ९३.१६ |
| वरूड | ९३.२७ |
| चांदूरबाजार | ९४.५७ |
| अचलपूर | ९३.०३ |
| अंजनगाव सुर्जी | ९१.०३ |
| दर्यापुर | ९३.८६ |
| चिखलदरा | ८७.८८ |
| धारणी | ८६.५६ |

## थोडक्यात

### श्रुतिका ९० टक्के गुण घेऊन आदर्श हायस्कूलमधून अव्वल



**रामतिर्थ :** श्रुतिका मंगेश अगडते हिला वर्ग १० मध्ये ९०.२५ गुण मिळवले रामतीर्थ येथील विद्यार्थिनी ही आदर्श हायस्कूल दर्यापूर येथे शिकत होती. आज वर्ग दहाचा निकाल लागला असून ती ९०.२५ गुणांनी अव्वल आली आहे. यशाचे श्रेय ती आपले वर्गशिक्षक व आई वडील यांना देत आहे.

### अंशुमन कांबळेला वैद्यकीय क्षेत्रात करायचे करियर



**नांदगाव पेठ :** अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करून आपल्या जिद्द, चिकाटी आणि बुद्धी कौशल्याच्या जोरावर अंशुमन अशोकराव कांबळे याने इयत्ता १० वीच्या परीक्षेत ८४% गुण मिळवत आपल्या कुटुंबाचे आणि शाळेचे नाव उज्वल केले आहे.अंशुमनचे आई-वडील दोघेही मजुरी करून संसार चालवतात, मात्र अंशुमनने या कठीण परिस्थितीकडे डोळेझाक करत अभ्यासात सातत्य ठेवले. आपल्या यशाचे श्रेय तो आपल्या कष्टकरी पालकांना आणि मार्गदर्शक गुरुजनांना देतो. जिल्हा परिषद हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव पेठ येथील विद्यार्थी अंशुमन कांबळे याचे वैद्यकीय क्षेत्रात करियर करायचे स्वप्न असून गोरगरीब लोकांची सेवा करण्याचा त्याचा मानस आहे.विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेऊन नंतर वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण पूर्ण करणार असल्याचे अंशुमन ने सांगितले.अंशुमन च्या यशामुळे कांबळे परिवारात आनंदाचे वातावरण आहे आणि परिसरात त्याचे कौतुक केले जात आहे.

# भाजपाच्या जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी रवीराज देशमुख, शहर अध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे

## मनपा महापौर आणि जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपाचाच राहील-नवनीत राणा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**अमरावती, दि. १३ :** महानगरपालिकेचा महापौर व अमरावती जिल्हा परिषद अध्यक्ष हा भाजपाचा राहील.भाजपा पक्ष मोठा करण्याकरिता अहोरात्र मेहनत घेणार . नवनीत राणा यांचा निर्धार .नवनियुक्त भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ नितीन धांडे व ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रभुदास भिलावेकर यांनी दिली भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या निवासस्थानी भेट देऊन नवनीत राणा यांचे धन्यवाद मानले.भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी दिल्या शहर व ग्रामीण जिल्हाध्यक्ष त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करून पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या* भारतीय जनता पार्टीच्या अमरावती शहर अध्यक्षपदी डॉ नितीन धांडे व ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी रविराज देशमुख तसेच प्रभुदास भिलावेकर यांची निवड राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडवणीस प्रदेशाध्यक्ष माननीय चंद्रशेखरजी बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष रवींद्रजी चव्हाण डॉ अनिलजी बोंडे भाजपा नेत्या नवनीतजी राणा यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली या दोन्ही शहर व ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांनी भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी भेट देऊन त्यांचे धन्यवाद मानले व त्याप्रमाणे भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी डॉ नितीन धांडे व रविराज देशमुख प्रभूदास भिलावेकर यांचा याप्रसंगी औक्षवंत ,शाल श्रीफळ देऊन सत्कार केला तसेच भाजपा नेत्या मा खासदार नवनीत राणा यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर जी बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांना विश्वास दिला की येणाऱ्या अमरावती महानगरपालिकेमध्ये महापौर तसेच अमरावती जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष भाजपाचा राहील शहर तसेच जिल्ह्यामध्ये भाजपा एक नंबर वर आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन भाजपाचा झेंडा महानगरपालिका, जिल्हा परिषदेवर फडकावू असा शब्द राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडवणीस यांना नवनीत राणा यांनी दिला. नवयुक्त शहर, जिल्हाध्यक्ष यांचा सत्कार करण्या प्रसंगी सुनील काळे, ललित समंदुरकर, बादल कुलकर्णी, गजानन देशमुख, संजय तीरथकर, राजाभाऊ खारकर, श्याम हिंगासपुरे, राजू कुरील, विवेक चुटके, शैलेंद्र मिश्रा, राजू मेटे, श्याम पाते, किशोर जाधव, प्रसाद जोशी, दिलीप झाडे, सचिन रासने, राजूभाऊ चांडोळे, राधा कुरील,सुदा तिवारी स्वराज ठाकरे, अमित भाबुलकर, सचिन इंगळे, सतनाम कोर हुड मेघा हिंगणासपुरे, सुधीर वाघ युवा स्वाभिमान जिल्हाध्यक्ष अजय देशमुख ,
विनोद गुहे, सचिन भेंडे, धीरज केने अजिंक्य बोके अभी निमकर दुर्योधन जावरकर,पवन हिंगणे सोनू मालवीय, नागेश मुंडे, , राजू राय, दिनेश गुप्ता, मंगेश कोकाटे, शुभम उंबरकर, अजय बोबडे,राहुल काळे इत्यादी मोठ्या संख्येने भाजपाचे व युवा स्वाभिमान पार्टीचे नेते हजर होते

# राखेचा ढिगारा अनधिकृतच

## आ. खोडके दाम्पत्यांने अधिकाऱ्यांना धरले धारेवर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**नांदगाव पेठ, दि. १३ :** कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता महामार्गावरील उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी रहाटगाव-वडगाव मार्गावर लाखो टन साठवणूक केलेली राख ही अनधिकृत असल्याचे आमदारांच्या पाहणी दरम्यान उघड झाले असून राखेच्या उडणाऱ्या कणांमुळे दररोज अनेक अपघात घडत असून देखील प्रशासनाने याप्रकरणी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याने आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी महसूल, प्रदूषण, पर्यावरण व महानगरपालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.प्रत्यक्ष पाहणीदरम्यान कंत्राटदाराने केलेल्या अनेक चुकांमुळे आमदारांचा संताप अनावर झाल्याचे दिसून आले.
नागपूर-अमरावती मार्गावरील रहाटगाव रिंग रोड टी पॉइंटजवळ उड्डाणपुलाच्या कामासाठी वापरली जाणारी राख उघड्यावर साठवून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात आता प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. आमदार सौ.सुलभा खोडके,आ. संजय खोडके यांच्या संयुक्त पाहणीनंतर याप्रकरणी नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया गतिमान झाली आहे. परिसरातील खुल्या जागेत मोठ्या प्रमाणात राख साठवली गेली होती. यामुळे परिसरात वायू प्रदूषण वाढून नागरिक, व्यावसायिक आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, एनएचएआयच्या अधिकाऱ्यांनी फक्त बांधकाम साहित्य साठवण्याची परवानगी घेतली होती, पण प्रत्यक्षात राख व उत्खनन सामग्रीचा बेकायदेशीर साठा करण्यात आल्याचे पाहणीतून स्पष्ट झाले. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल तहसीलदार विजय लोखंडे यांनी संबंधितांना लवकरच नोटीस बजावण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनीही २४ एप्रिल रोजी राख हटवण्याचे आदेश देण्यात आले होते, तरीही दुर्लक्ष झाल्याने आता कठोर पावले उचलली जातील, असा इशारा दिला.
प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी संजय पाटील आणि महापालिकेचे पर्यावरण अधिकारी महेश देशमुख यांनीही ही कारवाई फौजदारी स्वरूपाची ठरू शकते, असे नमूद केले. राखेचा ढिगार निर्जन ठिकाणी हलवण्याची आवश्यकता असून, अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या निष्काळजी वृत्तीला प्रशासन मुळापासून थांबविण्याच्या तयारीत आहे.माध्यमांमधील बातम्यांची घेतली दखल मागील तीन आठवड्यापासून माध्यमांनी ओव्हरलोड,उडणारी राख तसेच अनधिकृत केलेल्या राखेच्या ढिगाऱ्याबाबत वृत्तमालिका सुरू ठेवली.या गंभीर प्रकरणाची प्रशासनाने कवडीची दखल घेतली नाही अखेर माध्यमांमधील वृत्ताची दखल घेऊन शनिवारी आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी राखेचा ढिगारा असलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि नागरिकांच्या जीवाशी खेळणारा गंभीर प्रकार समोर आला.

### तहसीलदारांचे होते कानावर हात?

याबाबत अनेक वेळा त्रस्त नागरिकांनी रहाटगाव येथील राखेच्या ढिगाऱ्यावरून उडणाऱ्या राखेबाबत तहसीलदार विजय लोखंडे यांना भ्रमणध्वनीद्वारे सूचना देऊन कार्यवाही करण्याची मागणी केली मात्र तहसीलदार लोखंडे यांनी तो आमचा विषय नसल्याचे बोलून कार्यवाही करण्याचे टाळले मात्र आ. दाम्पत्याच्या पाहणीनंतर आता त्यांनी संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पुढे सरसावले.

### जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने केली अवैध वृक्षतोड

अवैध राखेची साठवूक करण्यासाठी तसेच बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने नियोजित केलेल्या ठिकाणी अवैध वृक्षतोड केली असून पुरावे नष्ट करण्यासाठी वृक्ष जाळल्याची देखील माहिती आहे. जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीच्या अधिकाऱ्यांसह राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणचे अधिकारी देखील या कृत्याला दोषी असून संबंधितांवर कठोर कार्यवाही व्हावी अशी मागणी पत्रकार मंगेश तायडे यांनी केली आहे.

# पत्नीच्या हत्येप्रकरणी पतीला सात वर्षाची शिक्षा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १३ :** मृतक महिला ही तिच्या दोन वर्षाच्या मुलीसह घरातून निघून केली होती. कोहळा जटेश्वर शिवारातील आरोपीच्या शेतातील विहिरीमध्ये मुलीसह तिचा मृतदेह आढळून आला. याबाबत मृतक महिलेचा भाऊ याने लोणी टाकळी पोलिसात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अठक केली व दोषारोपपत्र सादर केले. न्यायालयाने आरोपीवर दोष सिद्धा झाल्याने सात वर्षाची शिक्षा व दंड ठोठावला आहे. आरोपी मुकुश विष्णूजी अंधनकर, ४७ रा. कोहळा जटेश्वर याचे आरती हिच्याशी लग्न झाले होते. २५ सप्टेंबर २०१८ रोजी मृतक आरती ही तिच्या दोन वर्षाच्या मुलीसह घरातून निघून गेली होती. २७ सप्टेंबरला सकाळी ७ च्या दरम्यान आरोपीचा भाऊ शेतात गेला असता शेतात असलेल्या विहिरीमध्ये आरती व तिचा मुलीसह मृतावस्थेत आढळून आले. आरोपी याने आरतीचा शारीरिक छळ केला तिच्या सोबत भांडण करून मारहाण केली. या कारणावरून आरतीने आपल्या दोन वर्षाच्या मुलीसह आत्म हत्या केली. भाऊ फिर्यादी प्रशांत काटकर याने बहिनीला दिलेल्या त्राद्दल लोणी टाकळी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिलसांनी आरोपीविरुद्धध गुन्हा दाखल करून दोषारोपपत्र पीएसआय प्रज्ञा वाडेकर यांनी न्यायालयात दाखल केले.


शुभ विवाह



विवाह मुहूर्त
बुधवार,
दि. १४/०५/२०२५ ला.
सकाळी ११ वा. ५५ मि.
विवाह स्थळ
श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज मंगल कार्यालय
पुजा कॉलनी, दस्तुरनगर, रोड, फरशी स्टॉप जवळ, अमरावती.

वर
चि. विजय उर्फ खुशाल
सौ. पुष्पाताई व श्री नरेंद्रराव रा.रोडे यांचे ज्येष्ठ चिरंजिव
मु.पो. अंजनगाव बारी, ता.जि. अमरावती

वधू
चि.सौ.कां. शुभांगी उर्फ उनकेश्वरी
सौ. संगीताताई व श्री. मनोजराव उ. गोटे
मु.पो. पुसद वसंतनगर ता. पुसद, जि. यवतमाळ

शुभेच्छूक : रोडे परिवार, अंजनगाव बारी, गोटे परिवार, पुसद

## थोडक्यात

### वैशाख बुद्ध पौर्णिमेनिमित्त यमुना हाउसिंग सोसायटीत बोधीवृक्षाचे रोपण



**अमरावती :** वैशाख बुद्ध पौर्णिमा हा भगवान गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाणाचा दिवस म्हणून संपूर्ण जगभरात मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. या पवित्र दिवसाचे औचित्य साधून मौजे निभोंरा अमरावती मधील यमुना हाउसिंग सोसायटी परिसरातील उद्यानामध्ये बोधीवृक्षाचे (पिंपळाचे) वृक्षारोपण करण्यात आले. ही वृक्षारोपणाची संकल्पना पर्यावरण संवर्धन व बुद्ध विचारांचा प्रसार यासाठी विशेष महत्त्वाची ठरली. भगवान बुद्धांना बोधीवृक्षाखालीच ज्ञानप्राप्ती झाली होती. त्याच वृक्षाचे रोप लावून समाजात शांती, करुणा व समतेचा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात विशेष म्हणजे हैदराबाद वरुन व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे दिपक तिवारी,बाळु गावंडे,व प्रत्यक्ष अरविंद योगी, शंकर धनद्रवे, वासुदेव भुजबळ, राहुल उके, शैलेश खारोडे, अमीत लांडे, प्रज्वल दहिकर, अथर्व उके यांनी सक्रिय सहभाग घेतला. वृक्षारोपण करताना त्यांनी बोधीवृक्षाचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व सांगितले. परिसरातील नागरिकांनाही यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत साधेपणाने, पण भावनिक वातावरणात पार पडले. उपस्थितांनी वृक्षाचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेत पुढील पिढीपर्यंत बुद्ध विचारांचे आणि पर्यावरण रक्षणाचे कार्य पोहोचवण्याचा संकल्प केला. यमुना हाउसिंग सोसायटीतील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यातही असेच उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. सोसायटीच्या गार्डनमध्ये लावण्यात आलेला बोधीवृक्ष पर्यावरण पूरकतेचा आणि सामाजिक एकतेचा प्रतीक म्हणून उदयास येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### फ्युचर अर्थ फॉउंडेशनची सुवर्ण वाटचाल




**अमरावती :** फ्यूचरअर्थ फाऊंडेशन च्या माध्यमातुन गेल्या १७ वर्षापासून ''राज्य भुषण सन्मान'' चे आयोजन यशस्वी रित्या पार पडत आलेले आहे. एकुण ४६९ कुशल व्यक्तीशैलीच्या मान्य वरांना विविध मंत्री व राजकीय नेत्यांनी या माध्यमातुन सहकार्यदेखील केल आहे. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी व खासदार अनिल बोंडे यांच्या उपस्थिती मध्ये ''राज्य भूषण सन्मान'' १० मे ला नागपुर येथे संपन्न झाला. ज्या मध्ये नामी संस्था, कुशल तज्ञ डॉक्टर, उद्योजक, विशेष व्यक्ती संपुर्ण महाराष्ट्र मधुन उपस्थित होते. प्रसंगी गडकरी व बोंडे यांच्या संबोधनाने उत्साहपूर्ण वातावरण तयार झालेले दिसुन आले. संस्थेच्या उपक्रमाची दखल घेत अध्यक्ष आशुतोष भोरे यांचे अभिनंदन प्रसंगी गडकरी व खासदार बोंडे यांनी केले.मंत्री महोदयांच्या सहकार्य करण्याच्या वक्तव्याने संस्थेला अधिक प्रोत्साहन मिळाले व शुभेच्छा देखील पुढील वाटचालीसाठी दिल्या.मार्गदर्शन व सहकार्या शिवाय ही वाटचाल शक्य नव्हती व पुढेही ही वाटचाल तसेच मार्गदर्शकांचा आदर्श आम्ही जपून ठेवण्याचा प्रयत्न करू असा विश्वास फ्युचर अर्थ फौंडेशनचे संचालक आशुतोष भोरे यांनी या माध्यमातून दिला.

# शेतकऱ्यांना जुलैपासून वीजबिल येणार : पालकमंत्री

## जिल्हा खरीप आढावा बैठकीत विविध विषयांवर चर्चा, कृषी निविष्ठा लिंकिंगबाबत देणार निर्देश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १३ :** शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी अॅग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत नोंदणी करण्यात येत आहे. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नाही. तसेच नोंदणी क्रमांक नसणाऱ्या शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येणार आहे, त्यामुळे अॅग्रीस्टॅक अंतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयातून आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी खरीप हंगामात पेरणी होणाऱ्या पिकांचा आढावा घेतला. येत्यात खरीप हंगामासाठी बियाणे, खते, पीक कर्ज, सिंचन व्यवस्था आदीबाबत दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या. खरीप हंगामात कापूस आणि सोयाबीन पिक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. यावेळी कापसाच्या क्षेत्रात वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याचे कमतरता भासणार नाही, यासाठी बियाणे उत्पादक कंपनीशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवावा. तसेच जिल्ह्यात बोगस बियाणे विक्री होऊ नये, यासाठी कृषी आणि महसूल या दोन्ही विभागांनी सक्रिय कारवाई करावी. यासाठी शासनस्तरावर आवश्यक असलेली मदत दिली जाईल. त्यासोबतच शेतकऱ्यांना बियाणे आणि खतांचे दर माहिती व्हावे यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत कृषी निविष्ठांचे दरपत्रक पोहोचण्यासाठी प्रयत्न करावेत. बियाणांचा दर्जा कायम राखून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी.

कृषी निविष्ठा खरेदी करताना विक्रेत्यांतर्फे लिंकिंग करण्याचा प्रश्न सातत्याने समोर येत आहे. याबाबत कंपनीस्तरावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच विक्रेत्यांचे स्तरावर लिंकिंगचे प्रकार होऊ नये, याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यासाठी आतापासूनच नियोजन करण्यात यावे. राष्ट्रीय बँकांकडून करण्यात येणारी अडवणूक थांबवण्यासाठी प्रत्येक महाराजस्व अभियान आणि बँकेत कर्जवाटप मेळावा घ्यावा. मागणी करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांना वेळत कर्ज देण्यात यावे. कर्ज वाटप करण्यात जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष देऊन पीक कर्ज वाटप प्रक्रिया सुरळीत करावी.

खरीप हंगामात आवश्यकता पडल्यास सिंचनाची व्यवस्था करावी लागणार आहे. यासाठी सिंचन विभागाने एक महिना अगोदर नियोजन करावे. कालव्याद्वारे सक्षमपणे पाणीपुरवठा करताना या कालव्यांची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी. जेणेकरून शेवटपर्यंत शेतकऱ्यांना पाणी मिळू शकेल. तसेच जंगलात राहणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा योजनेअंतर्गत विंधन विहीर योजना आहे. या सर्व शेतकऱ्यांचे तातडीने अर्ज घेऊन त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच उन्हाळ्यात चारा टंचाई जाणू नये, यासाठी चारा लागवडीचे धोरण तयार करावे. यासाठी बियाणे आणि जागा शासनातर्फे पुरविण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## जिवक बुद्ध विहाराच्या प्रांगणात बुद्ध गीतांची संगीतमय सकाळ

अजिंक्य भारत । अरुण डोंगरदिवे



**धामणगाव रेल्वे, दि. १३ :** धामणगाव रेल्वे येथील महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती समिती पुष्करणा नगर जिवक सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन संस्था महिला संघ पुष्करणा नगर रमाई उपाशी का संघ भिमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विदमाने भगवान बुद्ध यांची २५८८, वी जयंती निमित्त विविध कार्यक्रम साजरा करण्यात आला दरम्यान जीवक बुद्ध विहारासमोरील प्रांगणात ध्वजारोहण व बुद्ध वंदना बुद्ध गीतांची संगीतमय सकाळ कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.तसेच जगाला शांतीचा मैत्रीचा आणि करूणेचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध माणसाला मनुष्यत्वाची जाणीव करून देणारे महान तत्वज्ञ अंधश्रद्धेच्या कर्मकांडाच्या गतेतुन जगाची सुटका करणारे मुनि दाते विकसित जीवन कसे जगावे याची सूत्रबद्ध मांडणी करून समता आणि स्वतंत्र्याच्या हमीसह हमीसह संपूर्ण जगाला वैज्ञानिक दृष्टी बहार करणारे थोर धम्म संस्थापक जगात दुःख आहे हे सत्य आहे परंतु दुःखाला कारण आहे.त्या कारणाचा मागोवा घेऊन त्यांची निरासन केले.

तर मनुष्याला सुखाची प्राप्ती होऊ शकते एवढा सरळ सोपा धम्म विचार देऊन मी मोक्षदाता नाही तर मी मार्गदाता आहे अशी शिकवण करणारे महाकारूणी तसेच जगाला पहिल्यांदा प्रतीत्य समु त्पाद हा सिद्धांत प्रतिपादन करणारे महान वैज्ञानिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची यांची २५८८, जयंती या महाकारूणी काला अभिवादन पर स्वरांजली म्हणून बुद्ध गीताची संगीतमय सकाळ कार्यक्रमाचे यशस्वी तेथील जीवक बुद्ध विहारा समोरील प्रांगणात करण्यात आले होते तसेच प्रजापती महिला संघाच्या, प्रतिभा खंडारे, वंदना इंगळे प्रतिभा नगराळे, वर्षा मनोहर,

पूजा भगत, वर्षा भावे, सुचिता शेंडे, वंदना दहाट, रूपाली शंभरकर, चैताली खडसे, वैशाली नारे, अर्चना भयंकर, यांनी सूर मधुर बुद्ध गीत सादर केली या कार्यक्रमाला उपासक आणि उपाशीका उपस्थित राहून बुद्ध विचारांची शिदोरी घेऊन प्रबुद्ध भारताच्या निर्मितीमध्ये आपले योगदान दिले.

## अवैध गावठी दारूसह २ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, दि. १३ :** तालुक्यातील तरोडा येथील पारधी बेड्यावरील अवैध गावठी दारूविक्रेत्यावर चांदूररेल्वे पोलिसांनी धाड टाकत २ लाख ११ हजारांचा मुद्देमाल जप्त केला, सदर कारवाई ११ मै रोजी करण्यात आली. ११ मे रोजी चांदूर रेल्वे पोलिसांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, ग्राम तरोडा येथे दोन महिला त्यांच्या घराचे मागील बाजूस गावठी हातभट्टी दारू व मोहफुल सहया विक्री करण्याचे उद्देशाने बाळगून आहे, अशा माहितीच्या आधारे ग्राम तरोडा येथे दोन्ही महिलांच्या घरी जावून पाहणी केली असता त्यांच्या घराच्या ओसरीमध्ये ४ प्लॉस्टीक कॅनमध्ये एकूण १०० लीटर गावठी हातभट्टी दारू व घराच्या मागे एकूण १४ प्लॉस्टीक ड्रममध्ये २१०० लीटर मोहफुल सहवा व प्लॉस्टीक ड्रम व इतर साहीत्य असा एकुण । २ लाख ३१ हजार रूपयांचा मुद्देमाल मिळून आला. दोन्ही आरोपींवर कलम ६५ (ड) (फ) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई प्रभारी पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीस पोलिस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनामध्ये पोलिस निरीक्षक आकरे, पीएसआय नंदलाल लिंगोट, राजू झाडे, पोलिस अंमलदार शिवाजी घुगे, प्रवीण मेश्राम, प्रशांत ढोके, राहुल वानखडे, दुर्गेश इंद्रुकर, मुज्जफर शेख, जगदीश राठोड यांनी केली.

# पाच हजार मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षणार्थ्यांना एक्सटेंशन

## विद्यार्थ्यांना दिलासा : २५६ आस्थापनावर पुन्हा प्रशिक्षणाची संधी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावीत, दि. १३ :** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.या अंतर्गत जिल्ह्यात वेगवेगळया २५६ आस्थापनांमध्ये सुमारे ५ हजार १३१ प्रशिक्षणार्थी कार्यरत आहेत.त्यांचा कार्यकाळ सहा महिन्यांकरीता असतांना शासनाकडून याला आता पाच महिन्यांची मुदतवाढ दिल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत शाससकीय योजनांचा व्यापक प्रचार होऊन अधिकाधिक उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याचे दृष्ट्रीने ९ सप्टेंबर रोजी शासनाने विविध शासकीय 'कार्यालयांमध्ये रिक्त जागांवर शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर प्रशिक्षकांची नियुक्ती केली होती. या प्रशिक्षणार्थीना सहा हजार,आठ हजार,दहा हजार आणि बारा हजार विद्यावेतनावर नियुक्ती देण्यात आली.ही नियुक्ती सहा महिने म्हणजेच २८ फेब्रुवारीपर्यंत होती. त्यांचा कालावधी २८ फेब्रुवारी रोजी संपुष्टात आल्याने सदर प्रशिक्षणार्थ्यांकडून मुदतवाढीची मागणी केली जात होती.

अखेर मंत्रिमंडळाच्या बैठकीत योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ११ महिन्यापर्यंत वाढविन्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे सहा महिने पूर्ण झाले आहेत.

त्यांना पुढील पाच महिने पुन्हा प्रशिक्षणार्थी म्हणून संधी मिळणार आहे,

### जिल्हा कौशल्य विभागावर धुरा

जिल्हास्तरवर त्यांच्या नियुक्तीची जबाबदारी ही जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे देण्यात आली आहे. त्यामुळे या विभागाकडून जिल्ह्यात १९० विविध शासकीय कार्यालयांमध्ये ४,४३० व खासगी ६६ आस्थापनांमध्ये ७०१ अशा ५ हजार १३१ प्रशिक्षणार्थीची नियुक्ती केली होती. या प्रशिक्षणार्थीना आता पुढील पाच महिने मुदतवाढ दिली आहे. या प्रशिक्षणार्थीना आतापर्यंत २० कोटी ३३ लाख ८२ हजार ४०५ रुपयांचे विद्यावेतन अदा केले आहे.

> "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थीना पाच महिने पुन्हा मुदतवाढ दिलेली आहे.यामध्ये ५३१ प्रशिक्षणार्थी २५६ आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या प्रशिक्षणार्थीना वाढीव कालावधीत प्रशिक्षणासाठीची संधी मिळेल.
>
> **प्रांजली बारस्कर**
> सहायक आयुक्त कौशल्य विकास विभाग

## एनएचएआयकडून १० झाडांची नियमबाह्य कत्तल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १३ :** शहराला कळण घेऊन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर रस्ते अथवा उड्डाणपुलाची निर्मिती करताना कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता तब्बल १० झाडांची नियमबाह्य कतल करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर राखेची साठवण करून नागरिकांना ये-जा करण्यास अडचण निर्माण होत असल्याची प्रकरणी महापालिका अभियंत्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विरोधात थेट पोलिसात ८ में रोजी तक्रार नोंदविली आहे. महापालिकेचे शहर अभियंता रवींद्र पवार यांच्या स्वाक्षरीने नांदगाव पेठपोलिस निरीक्षकांच्या नावे पत्र पाठवून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कारनाम्याची गादी सादर केली आहे. दरम्यान, आमदार सुलभा खोडके यांनी ७ में सेजी एनएचएआय केतून सुरु असलेल्या विविध कामांची पाहणी करून प्रचंड नाराजी वर्तविली होती.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी महापालिका प्रशासनाने थेट पोलिसात है प्रकरण पाठविले आहे. महापालिका अभियंत्यांच्या तकारीनुमार अमरावती सहरातील रहाटगाव में वहमाव (माहोर) दरम्यान सुरु असलेल्या रस्त्यालगत आगीजागी राखेचे विगारे साचले आहेत या ढिगायांमुळे नागरिकांना ये-जा करताना प्रचंड अडचणीचा सामना करावा लागत आहे.

तसेच पाहणी दरम्यान १० झाडे तोडलेल्या स्थितीत आढळून आले आहेत.

ही झाडे कापण्यापूर्वी महापालिका प्रशासनाची परवानगी घेतली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची जणू एकाधिकारीशाही सुरू असल्याचे स्पष्ट होते.

साठकलेली राख, अवैध दुसतीच हवा प्रदूषन आदी बाबी विचारता राष्ट्रीय महामार्गावरून में जा पालको सह करताना पाहन अपघात होण्याची दाट सन्या रस्ते बांधली आणि उभारणी करताना एनएचएआयने निष्पादिसं किल्याचा आरोप आहे. महापालिका अनित्यांनी दिलेल्या एकन आर रावेधी मा ठेवली आहे. हा प्रकार असू साताक इराहेदेखील कापण्यात आल्याचे म्हटले आहे.

## मुख्याध्यापिका विजया झाडे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य पुरस्काराने सन्मानित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अंजनगावबारी, दि. १३ :** प्रेरणा फाउंडेशनच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ४ मे २०२५ ला सत्कर्म बालकाश्रम बदलापुर, ठाणे मुंबई येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांना तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांना विविध पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रेरणा फाउंडेशन ही एक सामाजिक संस्था असून गोरगरीब,अनाथ लोकांना आधार देण्याचे काम करते. अनेक मान्यवरांनी या बालकाश्रमातील मुलांना भेटवस्तू व खाऊ स्वरूपात वस्तू वाटप केल्या. तसेच मुलांनी सादर केलेल्या विविध कार्यक्रमांना बक्षीस दिलीत.

मुख्याध्यापिका मा.विजया झाडे जिल्हा परिषद शाळा कुसुमकोट बू. तालुका धारणी जिल्हा अमरावती या शाळाबाह्य विद्यार्थी वर्गासाठी वस्तू रुपाने व शैक्षणीक साहित्य देऊन विद्यार्थ्यांना मदत करतात. तसेच अनाथालय, हेटी, वीटभट्टया वर जाऊन मुलांना वस्तुरुपाने मदत करतात. -१९ च्या काळात कोविड हॉस्पिटल मालटेकडी अमरावती या हॉस्पिटलला पाच हजार रुपये देणगी देऊन त्या ठिकाणी एक आठवडा ड्युटी केली व रुग्णांची विचारपुस करून त्यांना दिलासा दिला. तसेच त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणीक साहित्य वाटप करतात. दरवर्षी वृक्षारोपन कार्यक्रम घेऊन माळरानावर झाडे लावतात .पर्यावरणपुरक उपक्रम राबवतात. गरजुंना आर्थिक मदत करतात.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन विजया झाडे यांना प्रेरणा फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रेरणा कुलकर्णी, वैभव कुलकर्णी, डॉ.पारुल लाड महेंद्र ,पत्रकार गुरुनाथ तिरपनकर, अविनाश म्हात्रे, डॉ.राजेश भांगे, दिलीप नारकर, धनंजय पवार, पी.एस. कदम,

राम घरत, रघुनाथ फडके, डॉ. राहत शेख, मंगेश सावंत, मुख्य तपासी आधिकारी जितू गुप्ता, राजकुमारी गुप्ता, सत्कर्म बालकाश्रम चे अध्यक्ष नामदेव पेशने, सचीव मकरंद वढवेकर इत्यादी उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते शॉल, प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## घरावरून गेलेल्या ११ केव्ही वीज वाहिनीचा चिमुकल्याला जबर शॉक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १३ :** घरावरून गेलेल्या महावितरणच्या ११ केव्ही वीजवाहिनीचा ७ वर्षीय चिमुकल्याला जबर शॉक लागून गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी सकाळच्या सुमारास पश्चोट पोलिसस्टेशन अंतर्गत जवलापूर येथे घडली. याघटनेमुळे महावितरणबद्दल ग्रामस्थांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे. समर्थ जितेश रामेकर असे घटनेत गंभीर झालेल्या बालकाचे नाव आहे.

परतवाडा येथे उपचारासाठी आणल्यानंतर समर्थची गंभीरावस्था पाहून डॉक्टरांनी त्याला अमरावती येथे पाठविण्याचा निर्णय घेतल्याने समर्थ याला रिम्स रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

जितेश रामेकर यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या घरावरून महावितरणने ११ केव्ही वाहिनी टाकलेली आहे. स्लॅबवरून हात पुरेल या अंतरावर सदर वाहिनी असल्याने संभाव्य अपघात होऊ शकतो, याची ग्रामस्थांच्या मनात सारखी भीती होती. सदर भीती समर्थ नामक बालकाला जबर शॉक लागल्याने खरी ठरली आहे.

धोकादायक असलेली वीजवाहिनी काढून टाकावी, जेणेकरून दुर्दैवी घटना घडणार नाही, यासाठी ग्रामपंचायतने ठराव घेऊन महावितरणच्या पचोट, अंजनगाव आणि अचलपूर कार्यालयात सादर केला होता, चिमुकल्या समर्थला मरणाच्या दारात लोटणाऱ्या घटनेला जिल्हा नियोजन समितीच कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. समर्थ हा त्याच्या घरावील स्लॅबवर गेला असता वीजप्रवाह सुरू असलेल्या ११ केव्ही वाहिनीने त्याला ओढले आणि त्यानंतर त्याला फ`कले. चिमुकल्या समर्थ याच्यावर ओढवलेल्या संकटामुळे गावात चिंतेचे वातावरण आहे.

## घटना -घडामोडी


समृद्धी ठाकरे ९७.२० टक्के


अनुश्री झाटे ९६.२० टक्के


समृद्धी नागतोडे ९३.८० टक्के


मनिष उमक ९३.६० टक्के


आनंदी आसरकर ९२.४० टक्के


पूर्वा दांडेकर ९२.४० टक्के


वेदांती उज्जैनकर ९१.६० टक्के


प्रेम दिवटे ९१.६० टक्के


निहारिका बद्दर ९०.६० टक्के


वसुंधरा यवतीकर ९०.२० टक्के


तन्मय सातपुते ९०.२० टक्के

### प्रताप विद्यालय, बाभूळगाव

**बाभूळगाव :** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात येथील प्रताप विद्यालयाने गुणवत्तेत मोठी झेप घेतली आहे. विद्यालयाचा निकाल ९२.२७ टक्के लागला असून, तब्बल अकरा विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले आहेत; हे सर्व विद्यार्थी प्रताप विद्यालयाचेच आहेत. विशेष म्हणजे, समृद्धी सुधाकर ठाकरे हिने सर्वाधिक ९७.२० टक्के गुण संपादन करून तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला. बाभूळगाव तालुक्याचा एकूण निकाल ८८.७७ टक्के लागला. तालुक्यातून ९६२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यापैकी ८५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रताप विद्यालयाचे २४६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी २२७ उत्तीर्ण झाले, तर ४८ विद्यार्थ्यांनी प्रावीण्य श्रेणी मिळविवली. समृद्धी ठाकरे हिच्यासह अनुश्री किशोर झाटे (९६.२० टक्के), समृद्धी प्रविण नागतोडे ९३.८०, मनिष पंकज उमक ९३.६०, आनंदी अतुन आसरकर ९२.४०, पूर्वा ज्ञानेश्वर दांडेकर ९२.४०, वेदांती विजय उज्जैनकर ९१.६०, प्रेम सतिश दिवटे ९१.६०, निहारिका जीवन बद्दर ९०.६०, वसुंधरा दिपक यवतीकर ९०.२०, तन्मय नरेश सातपुते ९०.२० यांचा समावेश आहे. या विद्याद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांवरवर गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रताप शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुभाष घोडे, सचिव जयंत घोंगे, मुख्याध्यापिका स्वाती घोडे, उपमुख्याध्यापक उमाकांत राठोड, पर्यवेक्षक मनोज नगराळे यांनी कौतुक केले.


ऋषीकेश काकडे ९२.४० टक्के


पार्थ केंबल ९२.०० टक्के


लकी पारधी ९१.०० टक्के


आदित्य राजगडकर ९०.६० टक्के


वेदांत फाळे ८९.४० टक्के


खुशी बोरकर ८९.२० टक्के


सम्यक थूल ८६.२० टक्के


प्रथमेश देशपांडे ८५.६० टक्के

### विवेकानंद विद्यालय, यवतमाळ

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या मंगळवारी (दि. १३) जाहीर झालेल्या निकालात येथील विवेकानंद विद्यालयाने ९२.१९ टक्के निकालासह उज्वल यशाची परंपरा राखली. परीक्षेला बसलेल्या १४१ विद्यार्थ्यांपैकी १३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून ऋषिकेश प्रशांत काकडे याने सर्वाधिक ९२.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकापिला. पार्थ गजानन केंबल ९२.०० टक्के, द्वितीय, तर लकी गजानन पारधी ९१ टक्के याने तृतीय स्थान मिळवले. आदित्य कमलाकर राजगडकर ९०.६० टक्के, वेदांत फाले ८९.४० टक्के, खुशी बोरकर ८९.२० टक्के, सम्यक थूल ८६.२० टक्के व प्रथमेश देशपांडे ८५.६० टकके यांचा समावेश आहे. १७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, तर ३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे विशुद्ध संस्थेचे अध्यक्ष विनायक दाते, उपाध्यक्ष विद्या केळकर, सचिव विजय कासलीकर, मुख्याध्यापिका मीनाक्षी काळे, पर्यवेक्षक विवेक अलोणी, संचालक मंडळ व शिक्षक-कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


प्रतिभा गावंडे ८८.८० टक्के


कोमल ठाकरे ८७.८० टक्के


सिद्धी पवार ८६.०० टक्के

### सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय

**महागाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.४२ टक्के लागला आहे. परीक्षेस बसलेल्या ८४ विद्यार्थिनींपैकी ८१ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या, तर तीन विद्यार्थिनी अनुत्तीर्ण झाल्या. उत्तीर्ण विद्यार्थिनींमध्ये २५ विद्यार्थिनी विशेष प्राविण्यासह, ४४ प्रथम श्रेणीत, ११ द्वितीय श्रेणीत, तर एक विद्यार्थिनी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. विद्यालयातून प्रतिभा सुनील गावंडे हिने ८८.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कोमल रमेश ठाकरे ८७.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर सिद्धी संजय पवार ८६.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांकावर राहिली. विद्यालयाचे व्यवस्थापक संभाजी नरवाडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या वतीनेही यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

# आदिवासींची पंढरी भक्तिरसात तल्लीन

## मंत्री अशोक उईकेंची यात्रेत उपस्थिती, भाविक-प्रशासनाचा समन्वय यशस्वी ठरला





**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**राळेगाव, दि. १३ :** आदिवासी बांधवांची पंढरी म्हणून गौरविलेल्या तालुक्यातील जागजई येथे सोमवारी वैशाख स्नानानिमित्त श्रद्धा आणि भक्तीचा महासागर उसळला होता. हजारो आदिवासी बांधवांनी आपल्या कुलदेवतांसह उपस्थिती लावत या पारंपरिक यात्रेत सहभाग घेतला. राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी या विराट सोहळ्याला भेट देऊन जागजई मातेचे दर्शन घेतले, ज्यामुळे उपस्थितांचा उत्साह द्विगुणित झाला.

वर्धा नदीच्या पवित्र तीरावर वसलेल्या जागजई येथील सुप्रसिद्ध राम मंदिर परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही ही ऐतिहासिक यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी आज दुपारी यात्रेला भेट देऊन केवळ जागजई मातेचेच दर्शन घेतले नाही, तर उपस्थित हजारो भाविकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या आणि अपेक्षाही जाणून घेतल्या. आयोजकांनी मंत्री महोदयांचे शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. या सत्काराचा स्वीकार करताना, मंत्री उईके यांनी जागजई तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले आणि आदिवासी संस्कृती व परंपरांच्या जतनासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले. त्यांच्या या आश्वासक शब्दांनी आणि प्रत्यक्ष उपस्थितीने आदिवासी बांधवांमध्ये नवीन आशा पल्लवित झाल्या. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी नितीन हिंगोले, तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार, भाजपचे स्थानिक शहराध्यक्ष कुणाल (आडनाव उपलब्ध नाही) यांच्यासह जिल्हा व तालुका प्रशासनातील अनेक वरिष्ठ अधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि राजकीय क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रशासनाने यात्रेकरूंच्या सोयीसाठी आणि सुरक्षेसाठी अत्यंत चोख व्यवस्था केली होती, ज्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही आणि यात्रा शांततेत पार पडली.

### तीन राज्यांतून भाविकांचा महापूर!

जागजईच्या वैशाख स्नानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, तेलंगणा आणि मध्य प्रदेश यांसारख्या शेजारील राज्यांतूनही हजारो आदिवासी बांधव दरवर्षी न चुकता आपल्या कुलदैवतांच्या पालख्या, निशाणे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात येथे दाखल होतात. माणकोबाई, राव, पेडसापेन, भीमालपेन, तोडोबा, जंगो, रायताड यांसारख्या देवतांच्या जयघोषात, पारंपरिक नृत्यांचा फेर धरत, अनेक भाविक खडतर पायी प्रवास करून येथे पोहोचतात.

### सुविधांनी झाले कायापालट!

कधीकाळी सुविधांचा पूर्ण अभाव असलेल्या जागजईचा आता 'आदिवासी पंढरी' आणि 'आदिवासी काशी' म्हणून गौरव होत आहे. आदिवासी सेवक, ग्रामस्थ आणि मंदिर समितीच्या अथक प्रयत्नांमुळे येथे महिलांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्नानगृहे, नदीपर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता, पिण्याच्या पाण्याची शुद्ध व मुबलक व्यवस्था, अखंडित वीजपुरवठा, २४ तास पोलीस बंदोबस्त आणि आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी शासनाच्या वतीने बोट सेवा अशा अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

# महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात

## शहरातून प्रथमच भव्य रॅली, जयघोषाने परिसर दुमदुमला

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**उमरखेड, दि. १३ :** वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उमरखेड शहरात सोमवारी (दि. १२) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त, शहरातून प्रथमच ठाकूर परिवारातर्फे भव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

सायंकाळी पाच वाजता नागचौक येथील दुर्गासिंह ठाकूर यांच्या निवासस्थानापासून मिरवणुकीला प्रारंभ झाला. ही मिरवणूक बस स्टेशन चौक, माहेश्वरी चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहोचली. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला सुशील दुर्गासिंह ठाकूर, शिवा कलोसे आणि गणेशसिंह ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयघोष करण्यात आला. त्यानंतर मिरवणूक परत नागचौकात रात्री आठ वाजता पोहोचून तेथे तिची सांगता झाली. मिरवणुकीत डीजेच्या तालावर तरुणाईमध्ये प्रचंड जल्लोष दिसून आला. 'महाराणा प्रतापसिंह की जय' या जयघोषाने आसमंत दणाणून गेला होता. शहरात प्रथमच महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अशा भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या जयंती समारोह व रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी सुशील दुर्गासिंह ठाकूर, शिवा कलोसे, गणेशसिंह ठाकूर, ॲड. संजय जाधव, आशिष शर्मा, प्रकाश वानखेडे, कुणाल पटोणे, रितेश डाबोळे, अवधूत पांचाळ, दामोदर इंगोले आणि सुशील ठाकूर मित्रपरिवाराने परिश्रम घेतले. मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# सात वर्षीय आदित्य बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम

## नेहरू स्टेडियमवर रंगली स्पर्धा; बुद्धिबळ क्षेत्रात नवा तारा उदयाला

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. १३ :** येथील सात वर्षीय बुद्धिमान खेळाडू आदित्य सत्यम राय याने रॅपिड चेस टुर्नामेंट २०२५ मध्ये नऊ-वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक पटकावून आपल्या बुद्धिमत्तेची प्रभावी झलक दाखवली. जी. एच. रायसोनी मेमोरियल, यवतमाळ जिल्हा चेस असोसिएशन आणि कल्पना प्रकाश वेलफेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरू स्टेडियम, गोधनी रोड येथे रविवारी (दि. ११ मे) ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

खुल्या गटातील या उल्लेखनीय यशामुळे आदित्य राय याचे सर्वत्र कौतुक होत आहे. विविध वयोगटांतील खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत आदित्यने अनुभवी आणि तगड्या प्रतिस्पर्धकांवर सहज मात केली. त्याच्या या यशाने यवतमाळ जिल्ह्याच्या बुद्धिबळ परंपरेला नवसंजीवनी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. आदित्यच्या या घवघवीत यशामध्ये त्याचे पालक, प्रशिक्षक आणि शिक्षक यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात आले. या यशामुळे त्याच्या पुढील उज्ज्वल वाटचालीचा मार्ग प्रशस्त झाला असून, बुद्धिबळ क्षेत्रात एक नवा तारा उदयाला आल्याचे मानले जात आहे. स्पर्धेचे आयोजक व यवतमाळ जिल्हा चेस असोसिएशनचे सचिव मोहन केळापुरे, मुख्य पंच सुशांत सूर्यवंशी आणि उपमुख्य पंच आकाश पुंडे यांनी आदित्यच्या यशाचे विशेष कौतुक केले. त्यांनी आदित्यला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि त्याच्या भावी कारकिर्दीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित बुद्धिबळपटूंना प्रोत्साहन मिळाले आहे.

# शशिकांत तोटे सन्मानित

**दारव्हा, दि. १३ :** राष्ट्रशक्ती मुंबईद्वारा आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक लोक कला महोत्सव, सेलिब्रेशन हॉल, यवतमाळ येथे सामाजिक योगदानाबद्दल शशिकांत मधुकर तोटे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शशिकांत यांनी आतापर्यंत चाळीसहून अधिक वेळा रक्तदान केले आहे. त्यांचे सामाजिक योगदान बघून त्यांना संत गाडगेबाबा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मडावी, संस्थेचे अध्यक्ष रवी भोंगाडे, अक्षय अहिव आदी उपस्थित होते.

# श्री शिवाजी हायस्कूलची यशाची परंपरा कायम

## ९७.९५ टक्के निकाल, पियुल देवळे व प्रज्वल ढोरे तालुक्यातून संयुक्त प्रथम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नेर, दि. १३ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित येथील श्री शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत परीक्षेत (दहावी) उज्ज्वल यशाची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे. शाळेचा निकाल ९७.९५ टक्के लागला असून, पियुल तिलककुमार देवळे व प्रज्वल प्रदीप ढोरे यांनी प्रत्येकी ९६.६० टक्के गुण मिळवत तालुक्यातून संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला.

शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये शाळेच्या नावलौकिकात भर टाकताना, पियुल देवळे आणि प्रज्वल ढोरे या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती, एन.एम.एम.एस. अशा स्पर्धा परीक्षांमधील यशानंतर आता शालांत परीक्षेतही उत्कृष्ट कामगिरी केली. इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये गार्गी प्रवीण घुटके (९५.०० टक्के), प्रेरणा सुरेश मेश्राम (९४.४०%), भावना हिरासिंग पवार (९४.४०%), जान्हवी शशिकांत पासूळकर (९३.००%), साईराज विलास गुंजकर (९२.८०%), प्रथमेश नरेंद्र लाहे (९२.२०%), असित धनराज गायकवाड (९१.८०%), विनीत गजानन दहेलकर (९१.६०%) आणि सारंग प्रशांत काळे (९१.४०%) यांचा समावेश आहे. तसेच सृष्टी विलास कावळे (८९.४०%), खुशी मनोज खिवसरा (८९.००%), श्रुती विनोद ढबाले (८८.६०%) व समीक्षा शरद काळे (८८.००%) यांनीही उत्तम गुण मिळवले. यावर्षी परीक्षेला बसलेल्या २४५ विद्यार्थ्यांपैकी ७९ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, ८९ प्रथम श्रेणीत, ५१ द्वितीय श्रेणीत, तर २१ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत यशस्वी झाले. शाळेचे मुख्याध्यापक मोहन मडावी व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक, सर्व विषय शिक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि आई-वडिलांना दिले.

# प्रतिकुल परिस्थितीत नेहाने दहावीत मिळविले ९३ टक्के

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १३ :** येथील मुंगसाजी नगर, वडगाव रोड परिसरात राहणाऱ्या अभ्यंकर कन्या शाळेच्या नेहा गजानन दांडेकर हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेत ९३ टक्के गुण (४६५/५००) मिळवून उत्तुंग यश संपादन केले आहे.

नेहाचे वडील गजानन दांडेकर हे टेलरकाम करण्यासोबतच कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी सकाळी वृत्तपत्र वितरणाचेही काम करतात. अशा संघर्षमय वातावरणातही नेहाने अभ्यासात कोणतीही कसूर न ठेवता हे यश मिळवले. तिच्या या कामगिरीने दांडेकर कुटुंबात आणि शाळेत आनंदाचे वातावरण असून, तिची जिद्द व परिश्रमाचे कौतुक होत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि अभ्यंकर कन्या शाळेतील सर्व शिक्षकांना दिले आहे. तिच्या पुढील उज्ज्वल भवितव्यासाठी तिला शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# न्यू हायटेक सिटीमध्ये रेणुका मातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

## पंचदिवसीय सोहळ्याने परिसर झाला भक्तिमय, हजारो भाविकांचा भजन-कीर्तनाच्या गजरात सहभाग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १३ :** जिल्ह्यातील किन्ही येथील न्यू हायटेक सिटीमध्ये ९ मे रोजी रेणुका मातेच्या मूर्तीची हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि भक्तिमय वातावरणात विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. विलासनगर येथील पुष्पलता शरद सप्रे यांच्या निवासस्थानी असलेली ही जागृत देवी आता नव्या मंदिरात विराजमान झाली आहे.

हरिकिशन बजाज यांनी दिलेल्या भूमीवर हे नवीन मंदिर उभारण्यात आले आहे. मूर्ती प्रतिष्ठापनेपूर्वी सलग पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये देवीपाठ, होमहवन आणि दोन दिवसीय नवचंडिका यज्ञाचा समावेश होता. ९ मे रोजी सकाळी सप्रे यांच्या निवासस्थानावरून रेणुका मातेच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत पंचक्रोशीतील आणि दूरवरून आलेल्या हजारो भाविकांनी, भजन-कीर्तनाच्या गजरात, उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. न्यू हायटेक सिटीतील नवनिर्मित मंदिरात पोहोचल्यावर धार्मिक विधीनुसार मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या सोहळ्याला आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी मंत्री मदन येरावार, अहेरीचे माजी पालकमंत्री अमरीशराजे आत्राम तसेच गडचिरोलीचे माजी खासदार अशोक नेते यांनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले व सप्रे आणि बजाज कुटुंबीयांचे अभिनंदन केले. मिरवणुकीत हरिकिशन बजाज, राजा आदित्य बजाज, विक्रमादित्य बजाज, शरद सप्रे, शांताराम सरगर, गिरीश देशपांडे, दिवाकर डेहणकर, हिंमत शिंदे, रणजीत भोसले, विशाल मस्के, तृप्ती भोसले, कुणाल सप्रे, भाग्यश्री सप्रे, शीतल पुरी, प्रवीण खोडे, माधुरी धायरा, प्रफुल्ल गुप्ता, निलेश चौधरी आदी मान्यवर आणि भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विलासनगर येथील पुष्पलता शरद सप्रे यांच्या निवासस्थानी असलेली रेणुका मातेची मूर्ती अत्यंत जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीत आणि दूरवरच्या राज्यांमध्येही प्रसिद्ध होती. दररोज शेकडो भक्त दर्शनासाठी येत असल्याने जागेची अडचण भासत होती. आता हरिकिशन बजाज यांच्या उदार भूमीदानामुळे न्यू हायटेक सिटीमध्ये मातेचे भव्य मंदिर साकारल्याने भाविकांमध्ये प्रचंड आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.

### मंत्रघोषात झाली प्राणप्रतिष्ठा!

रेणुका मातेच्या मूर्ती प्रतिष्ठापनेनिमित्त किन्ही येथे पाच दिवसांचा भव्य धार्मिक सोहळा पार पडला. ५ मे रोजी अकरा ब्राह्मणांच्या उपस्थितीत देवीच्या पाठांना सुरुवात झाली. ६ मे रोजी विधिवत होमहवन करण्यात आले, तर ७ आणि ८ मे रोजी दोन दिवसीय नवचंडिका महायज्ञ संपन्न झाला. ९ मे रोजी सकाळी सप्रे यांच्या निवासस्थानावरून निघालेल्या भव्य मिरवणुकीनंतर, मंत्रोच्चारांच्या गजरात नवीन मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

## दहावीतील गुणवंत


गौरी सोनेकर
९७.६० टक्के


नयन जगदळे
९६.६० टक्के


जान्हवी हांडे
९६.४० टक्के


अनुश्री झाटे
९६.२० टक्के


श्रावणी आत्राम
९६.२० टक्के


दर्शन गुरव
९५.८० टक्के


श्रावणी माहूरकर
९५.६० टक्के


सोनल टांगे
९६.६० टक्के


अनुष्का पतंगे
९६.६० टक्के


तेजस्विनी सोमवंशी
९५.०० टक्के


अक्षदा कमले
९७.८० टक्के


सार्थ भवरे
९६.८० टक्के


प्रथमेश परसोडकर
९६.०० टक्के


दर्शना जाधव
९५.८० टक्के


आशुतोष मैदपवार
९५.६० टक्के


राधा लिंगावार
९५.०० टक्के

# यंदाही दहावीच्या परीक्षेत मुलीच अव्वल

## यवतमाळ जिल्ह्याचा निकाल 91.51 टक्के

## स्टेट बोर्डातून श्रेया वानखडे प्रथम

## सीबीएससीत रश्मी ठवकर प्रथम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी


श्रेया वानखेडे
98.60


तुषार कामळे
98.00


समृद्धी ठाकरे
97.20


प्रेरणा सावळे
96.60



तालुकानिहाय निकालाची टक्केवारी

**यवतमाळ, दि.13:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज, मंगळवारी, दि. 13 मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला. यावर्षी यवतमाळ जिल्ह्याचा निकाल 91.51 टक्के लागला असून यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. सर्वाधिक निकाल नेर तालुक्याचा लागला असून सर्वांत कमी निकाल कळंब तालुक्याचा आहे.

आर्णी येथील श्रेया विष्णू वानखेडे हिला 98.60 टक्के गुण मिळवित ती इयत्ता दहावीत जिल्ह्यातून प्रथम आली आहे. तर, बाभूळगाव येथील प्रताप विद्यालयाची विद्यार्थिनी समृद्धी सुधाकर ठाकरे हिने 97.20टक्के गुण मिळविले आहे. सोबतच 'सीबीएसई'मध्ये यवतमाळ येथील रश्मी ज्ञानेश्वर ठवकर हिने 92.4 टक्के गुण घेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तुषार कामळेला 98 टक्के गुण मिळाले आहे. जिल्ह्यात सरासरी अनेक विद्यार्थ्यांना 92 टक्के गुण मिळाले आहेत. यावर्षी जिल्ह्यातील 34 हजार 612 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्याच्या निकालाची टक्केवारी 91.51 इतकी आहे. दहावीच्या परीक्षेसाठी 20 हजार 157 मुले, तर 18 हजार 105 मुलींनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात 19 हजार 879 विद्यार्थी, तर 17 हजार 941 विद्यार्थिनींनी परीक्षा दिली. शिक्षण मंडळाकडून जाहीर करण्यात आलेल्या निकालात 37 हजार 820 पैकी 34 हजार 612 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी 89टक्के, तर मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 94.30 टक्के आहेत. नेर तालुक्याचा सर्वाधिक 95.32टक्के, तर सर्वांत कमी निकाल कळंब तालुक्याचा 73.83 टक्के इतका लागला आहे. जिल्ह्यात यंदा नेर तालुक्याने दहावीच्या निकालात पहिला क्रमांक पटकावला आहे. उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च महिन्यात इयत्ता दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. दहावीचा निकाल मंगळवारी, (दि.13) दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात आला. जिल्ह्यातील 159 केंद्रांवर 34 हजार 612 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. विद्यार्थ्यांसह पालकांना निकालाची उत्सुकता लागली होती. दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी शिक्षण विभागाने नियोजन केले होते. संवेदनशील केंद्रांवरील पर्यवेक्षकांचे केंद्रही बदलण्यात आले होते. विद्यार्थ्यांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वॉच होता. नियमित अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, हा यामागील प्रमुख हेतू होता. मात्र, 21 फेब्रुवारी रोजी मराठी विषयाचा पहिलाच पेपर व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर दहावीच्या परीक्षेवर जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय भरारी पथकांनी कडक वॉच ठेवला. निकाल लागताच विद्यार्थ्यांना 11वी प्रवेशाचे वेध लागणार आहे. तर काहींनी कोचिंग क्लासेसही लावले आहेत.

## CAPTION असे घडले शंभूराजे...


**यवतमाळ :** सईबाईनंतर त्यांच्या प्रेमाला पोरके झालेल्या शंभूराजेंना स्वराज्य रक्षणाचे धडे देत आऊसाहेबांनी घडविले. साक्षात जगदंबेच्या सावलीत लहानाचा मोठा झालेला सह्याद्रीचा प्रचंड दुर्ग, त्याच्या संगतीत आऊसाहेबांनी शौर्याच्या अलंकाराने स्वराज्यातील मौल्यवान असा शंभूराजेंसारखा दागिना घडविला. छत्रपतींच्या या छाव्याने मोघलांना कडवी झुंज देत, आपल्या रक्ताच्या सिंचनाने धरणीला पावन करीत महाराष्ट्राला स्वाभिमानाचे धडे दिले. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेले स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची आज (१४ मे) जयंती. त्यानिमित्त यवतमाळ येथील प्रा. सोनल प्रफुल्ल देशमुख आणि जय आदित्य कुलकर्णी यांनी अनुक्रमे राजमाता जिजाऊ आणि बाल शंभुराजेंची वेशभूषा साकारली व छत्रपती संभाजी महाराज कसे घडले? हे या चित्रमालिकेतून दर्शवून अनोखे अभिवादन केले.

(छायाचित्र – सान चव्हाण)

## हेमंत कुमार कांबळे यांची जनसंपर्क अधिकारीपदी निवड

**यवतमाळ, दि. 13 :** यवतमाळ वाशीम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांचे यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाकरिता जनसंपर्क अधिकारी म्हणून हेमंत कुमार कांबळे यांची निवड झाली आहे. हेमंत कुमार कांबळे हे प्रसिद्ध साहित्यिक



असून सामाजिक प्रश्नांची त्यांना जाणीव आहे. शेतकरी प्रश्नांवर निर्भीड आंदोलन करणारे आंदोलक म्हणूनही त्यांची ख्याती आहे.

## अॅड. चव्हाण, डॉ. फुफाटे भाजपचे नवे जिल्हाध्यक्ष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. 13:** भारतीय जनता पक्षाने भाजप पक्षाच्या जिल्हा नेतृत्वाची धुरा अॅड. प्रफुल्लसिंह चव्हाण व डॉ. आरती फुफाटे यांच्या खांद्यावर सोपविली आहे. यवतमाळ येथे मंगळवारी झालेल्या पक्षाच्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला.



प्रदेश निवडणूक अधिकारी तथा आमदार चैनसुख संचेती यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्षांची घोषणा करण्यात आली. या बैठकीला भाजपचे माजी आमदार मदन येरावार, नामदार प्राचार्य डॉ. अशोक उईके, माजी खासदार हंसराज अहीर, आमदार राजू तोडसाम, माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी जिल्हाध्यक्ष राजू डांगे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे व महादेवराव सुपारे, महामंत्री राजू पडगीलवार, शहराध्यक्ष शंतनू शेट्ये आदींची उपस्थिती होती. अॅड. चव्हाण यांच्याकडे वणी, यवतमाळ व राळेगाव या तीन विधानसभांचा भार असणार आहे, तर पुसद, दिग्रस व उमरखेड या तीन विधानसभांची जबाबदारी डॉ. आरती फुफाटे यांच्यावर सोपवली आहे.

## पुणे बोर्डातून युगला 96.20 टक्के गुण

**यवतमाळ, दि.13:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत पुणे बोर्डातून क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी पुणे येथील दहावीचा विद्यार्थी युग संतोष झिंजे 96.20टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. युगला खेळात विशेष रुची असून तो बालेवाडी येथील क्रीडा प्रबोधिणीत फुटबॉलचे धडे गिरवीत आहे. आजपर्यंत त्याने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. तो शेतकरी कुटुंबातील असून त्याचे वडील संतोष झिंजे हे श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहे. युगला खेळाइतकीच अभ्यासात पण रुची आहे.



## राजर्षी शाहू महाराज स्कूलचा उत्कृष्ट निकाल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर, दि.13:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज, मंगळवारी, दि. 13 मे रोजी जाहीर झाला. त्यात नेर तालुका जिल्ह्यातून अव्वल आहे. यंदाही मुलांच्या तुलनेत मुलिंनीच बाजी मारली असल्याचे चित्र दिसून येते.

येथील राजर्षी शाहू महाराज इंग्लिश मीडियम स्कूलच्या कु. खुशी सुनील राठोड हिने 95.60टक्के, तर कु. निधी सुनील राठोड हिने 93.80टक्के गुण घेतले. या दोन बहिणींनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. तर, कु. गायत्री रवींद्र सुरजुसे 92.20टक्के, कु. रिद्धी संजय बावणे 91.20टक्के गुण घेत तालुक्यातून मुलींनीच बाजी मारल्याचे निकालातील चित्र आहे. कु. गायत्री एम कोठेकर 89.40टक्के, कु. सलोनी बी. राठोड 87.60टक्के, कु. आर्या के. येळणे 87.20टक्के, कु. रिया एन. ठेंगरी 85.80टक्के, कु. सिद्धी यस बावणे 85टक्के, कु. सुहानी एस. ठाकरे 84.80कु गुण घेत या विद्यार्थिनींनी बाजी मारली. शाळेचा निकाल घलहळ टक्के लागला असून गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षात होत आहे.


खुशी राठोड
९५.६० टक्के


निधी राठोड
९३.८० टक्के


गायत्री सुरदसे
९२.२० टक्के


रिद्धी बावणे
९२.२० टक्के


गायत्री कोठेकर
८९.४० टक्के


सलोनी राठोड
८७.६० टक्के


आर्या येलणे
८७.२० टक्के


रिया ठेंगरी
८५.८० टक्के


सिद्धी बावणे
८५.०० टक्के


सुहानी ठाकरे
८४.८० टक्के

# नागरिकांनो, हेल्मेट, सीटबेल्ट वापरा; जीव वाचवा!

## जिल्हाधिकारी विकास मीना यांचे कळकळीचे आवाहन; रस्ता सुरक्षा समितीची विशेष बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. 13 मे : जिल्ह्यात दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट आणि चारचाकी वाहनचालक व सहप्रवाशांसाठी सीटबेल्ट वापरणे बंधनकारक असून, याबाबत जनजागृती करून विशेष 'ड्राईव्ह'राबवा, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. ते आज, मंगळवारी महसूल भवन येथे जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत बोलत होते.



अनेक अपघातांमध्ये हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न केल्यामुळे प्रवाशांना प्राण गमवावे लागतात किंवा गंभीर दुखापत होते, ही बाब अत्यंत खेदजनक असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले. त्यामुळे, नागरिकांमध्ये याविषयी व्यापक जनजागृती करून त्यानंतर कडक अंमलबजावणी मोहीम हाती घेण्याचे आदेश त्यांनी दिले. या मोहिमेदरम्यान केलेल्या कार्यवाहीचा (किती ठिकाणी तपासणी, किती दंड आकारला) अहवाल समितीच्या बैठकीत नियमित सादर करावा. यासाठी परिवहन विभाग आणि पोलिस विभागाने विशेष पथके नेमावीत. ही पथके रोटेशन पद्धतीने वेगवेगळ्या ठिकाणी नियमितपणे मोहीम राबवतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी केल्या. बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता रूपा गिरासे, कार्यकारी अभियंता विक्रम शिरभाते, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी राजेश देवते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व समितीचे अशासकीय सदस्य उपस्थित होते. परिवहन विभागाने यावेळी प्रशासकीय मान्यता प्राप्त अपघातस्थळावरील कामांच्या सद्यःस्थितीची माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी अपघातांची कारणे शोधून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचेही निर्देश दिले.

### जिल्ह्यात 'जीवनदूत' नेमा

- जिल्ह्यात अनेक ठिकाणी लहान-मोठे अपघात होत असतात. अशावेळी स्थानिक नागरिक आणि युवक अपघातग्रस्तांना तत्काळ मदत करतात. ही बाब लक्षात घेऊन, अशा सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आणि नेहमी मदतीसाठी पुढे येणाऱ्या व्यक्तींना 'जीवनदूत' म्हणून नेमण्यात यावे. यासाठी परिवहन विभागाने तत्काळ प्रस्ताव सादर करावा, असे महत्त्वपूर्ण निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले, जेणेकरून अपघातग्रस्तांना वेळेवर मदत मिळू शकेल.

### अपघातप्रवण स्थळे निश्चित करा

- जिल्ह्यातील संभाव्य अपघातप्रवण स्थळे (ब्लॅक स्पॉट) निश्चित करून तेथे तातडीने सुरक्षात्मक उपाययोजनांची कामे हाती घ्या, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जांब आश्रमशाळेसमोरील दोन धोकादायक वळणे, पारवा येथील दर्ग्याजवळील उताराचे ठिकाण, शरद शेतशिवारातील दातपाडी नाल्यावरील पारवा ते रामनगर रस्त्यावरील धोकादायक वळण या ठिकाणी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.